


# जनमाध्यम

epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शुक्रवार २५ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




# शेतक-यांना भरपाई देण्याच्या घोषणेचा पुनरुच्चार







## मुख्यमंत्र्यांनी केली वाशिम जिल्ह्यातील नुकसानग्रस्त पिक परिस्थितीची पाहणी

## म्हसला, मोहगव्हाण व जउळका येथे पीक-पाणी परिस्थितीची पाहणी

**वाशिम/प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज वाशिम जिल्ह्यातील म्हसला ता. कारंजा, मोहगव्हाण ता. मंगरुळपीर, आणि जउळका ता. मालेगाव येथील शेतक-यांच्या बांधावर जाउन दुष्काळसदृष्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पिक व पाणी परिस्थितीची पाहणी केली. शेतक-यांना भरपाई देण्याच्या घोषणेचा पुनरुच्चार करून मुख्यमंत्र्यांनी शेतक-यांना दिलासा दिला जाईल अशी ग्वाही दिली.

दुष्काळसदृष्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पश्चिम विदर्भातील म्हणजे अमरावती विभागातील पिक पाणी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आज सकाळी अमरावती विमानतळ येथे शासकीय विमानाने आगमन झाले. तेथून ते मोटारीने वाशिम जिल्ह्यातील म्हसला, ता.कारंजा येथील शेतकरी श्री देविदास किशन काळे यांच्या शेतात जाउन शेतातील नुकसानग्रस्त सोयाबीन व तुर पिकाची पाहणी करीत शेतक-यांशी संवाद साधला.

मोहगव्हाण ता. मंगळूरपीर येथील शेतकरी अनिल भगरे, तसेच अब्दुल नईम शेख रहीम यांच्या शेतातील नुकसानाची पाहणी त्यांनी केली. यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. ते म्हणाले, कमी पर्जन्यमानामुळे सोयाबीन, तूर आदी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतक-यांवर हे मोठे संकट आहे. तथापि, शेतकरी बांधवांनी खचून जाउ नये. शासन शेतक-यांसोबत आहे. त्यांना जास्तीत जास्त मदत करण्यात येईल. यासंबंधीची अधिसूचनाही लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल.जउळका ता. मालेगाव येथील शेतकरी श्री संतोष सखाराम डुंबळे यांच्या शेतीच्या बांधावर जाउन दुष्काळसदृष्य परिस्थितीची पाहणी केली. उपस्थित शेतक-यांशी संवाद साधला. यावेळी शेतकरी संतोष यांच्या आई श्रीमती शकुंतलाबाई यांनीही दुष्काळी परिस्थितीची कैफीयत मांडली.या दौ-यात परिसरातील पिक व पाणी परिस्थितीची सविस्तर माहिती घेउन मुख्यमंत्र्यांनी नुकसानग्रस्त शेतक-यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याच्या आपल्या घोषणेचा पुनरुच्चार केला.अत्यल्प पाउसमानामुळे आसमानी संकटात सापडलेल्या नुकसानग्रस्त शेतक-यांना दिलासा दिला जाईल. संकटाच्या काळात शासन शेतक-यांसोबत आहे. त्यांनी कोणतीही चिंता करू नये. झालेल्या नुकसानीचा अंदाज घेउन शासनाकडून आवश्यक मदत प्राधान्याने आणि लवकरात लवकर दिली जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली.आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होउ नये म्हणून आवश्यक नियोजन करण्यात येईल. त्याच प्रमाणे चारा उपलब्धतेसाठीही दक्षता घेतली जाईल. शेतक-यांना शासनाची मदत थेटपणे मिळण्यासाठी लवकरच कार्यवाही सुरु होईल. असेही त्यांनी यावेळी सांगितले.या दौ-यात खासदार संजय देशमुख, खासदार अनुप धोत्रे, आमदार बाबुसिंग महाराज, आमदार सईताई डहाके आमदार श्याम खोडे, आमदार रणधीर सावरकर, आमदार भावना गवळी, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण यांच्यासह प्रशासनातील वरीष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागाचे अधिकारी आणि शेतकरीबांधव उपस्थित होते.



## चालत्या खासगी ट्रॅव्हल्स बसला भीषण आग


**लोणावळा :** मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर गुरुवारी सकाळी पावणेआठच्या सुमारास खासगी प्रवासी बसला (MP ४४ ZB ६७७६)अचानक भीषण आग लागली. पनवेल हद्दीतील किलोमीटर १६ जवळ ही दुर्घटना घडली. सुदैवाने, आग पसरण्यापूर्वीच चालक आणि सर्व प्रवाशांनी प्रसंगावधान राखत गाडीतून खाली उड्डी घेतल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र, या दुर्घटनेत संपूर्ण बस जळून खाक झाली. बसमध्ये १४ प्रवासी होते, मात्र सर्वांची सुखरूप सुटका झाल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. माहिती मिळताच आयआरबी आणि देवदूत यंत्रणेच्या अग्निशमन दलाने धाव घेत आग आटोक्यात आणली. या घटनेमुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.


### सुट्टीची सूचना

आज शुक्रवार दि. २५ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी निमित्त दै. जनमाध्यम कार्यालयाला सुट्टी असल्याने उद्या दि, २६ सप्टेंबर रोजी अंक प्रकाशित होणार नाही. याची नोंद एजंट, जाहिरातदार आणि वाचकांनी घ्यावी. - **व्यवस्थापक**


# स्लीपर बसला आग, 9 जण जिवंत जळाले

**आग लागल्यानंतरही चालकाने बस थांबवली नाही; बसचे 19 चालान कापले, 1.75 लाखांचा दंड**





**मयंक आणि सरोज गुप्ता बसमध्ये प्रवास करत होते. दोघांचा शोध घेत त्यांची मुले सकाळी शवविच्छेदनगृहात पोहोचली. मृतदेह न सापडल्याने ते एकमेकांना मिठी मारून रडू लागले.**



**नोएडा/वृत्तसंस्था :** उत्तर प्रदेशमधील नोएडा येथे बुधवारी रात्री यमुना एक्स्प्रेस-वेवर स्लीपर एसी बसला आग लागल्याने ९ प्रवाशांचा मृत्यू झाला. यामध्ये ८ पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे. बसमध्ये ३५ प्रवासी होते. २० जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले, तर काही प्रवासी खिडक्या फोडून बाहेर पडले.हा अपघात रात्री सुमारे ११:३० वाजता जेवर विमानतळापासून ५०० मीटर अंतरावर झाला. बस दिल्लीच्या काश्मिरी गेटहून रात्री ९:३० वाजता महोबासाठी रवाना झाली होती. एसीमध्ये स्फोट झाल्याची शक्यता आहे. मृतदेह पूर्णपणे जळाले असून त्यांची ओळख पटवणे कठीण आहे. एफआयआरमध्ये प्रवासी सुनील कुमार यांनी सांगितले की, बसमध्ये जळल्याचा वास येत होता. चालक आणि क्लीनर सिगारेट ओढत होते. प्रवाशांनी विरोध केला तेव्हा दोघेही हसू लागले. काही वेळाने बसला आग लागली. आग लागल्यानंतरही चालकाने तातडीने बस थांबवली नाही. प्रवाशांनी काचा फोडल्यानंतर बस थांबवण्यात आली.पोलिसांनी सांगितले की, ही बस मध्य प्रदेशातील राज कल्पना ट्रॅव्हल्सची आहे. बसवर १९ चलाने झाले असून रूपये १.७५ लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. पोलिसांनी चालक पवन आणि वाहक योगेश यांना अटक केली आहे.

# दुष्काळ आढाव्याला आचारसंहितेचा फटका

**नागपूर/प्रतिनिधी :** विधान परिषद निवडणूक आचारसंहितेमुळे दुष्काळ निवारण आणि नियोजनाच्या बैठकांना लोकप्रतिनिधींना उपस्थित राहता येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. निवडणूक आयोगाच्या या भूमिकेमुळे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना पुणे आणि नागपूर विभागाच्या नियोजित आढावा बैठका अखेर रद्द कराव्या लागल्या आहेत.



निवडणूक आयोगाने औरंगाबाद, पुणे व नागपूर विभाग पदवीधर तसेच अमरावती व पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातील निवडणुका जाहीर केल्या आहेत. या निवडणुकांसाठी २९ सप्टेंबर रोजी अधिसूचना प्रसिद्ध होणार असून २३ ऑक्टोबर रोजी मतदान व २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे.निवडणुका जाहीर झाल्याने संबंधित क्षेत्रांत आचारसंहिता लागू झाली आहे. आयोगाच्या नियमांनुसार, आचारसंहितेच्या काळात कोणताही मंत्री किंवा राजकीय पदाधिकारी दुष्काळ निवारण कार्यात किंवा आढावा बैठकांमध्ये सहभागी होउ शकत नाही. संपूर्ण मदत कार्य केवळ शासकीय प्रशासनामार्फतच राबवणे बंधनकारक आहे.राज्यात दुष्काळी परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. या पार्श्वभूमीवर लोकभावना आणि प्रत्यक्ष मदतीची गरज जाणून घेण्यासाठी कृषी विभागाने आढावा बैठकांचे आयोजन केले होते. या बैठकांच्या परवानगीसाठी कृषिमंत्र्यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे लेखी मागणी केली होती. मात्र, आयोगाने या पत्राला कोणताही प्रतिसाद दिला नाही. अखेर कृषी विभागावर या महत्त्वाच्या बैठका रद्द करण्याची वेळ आली.लोकप्रतिनिधींना या बैठकांपासून दूर ठेवल्याने शेतक-यांच्या समस्या आणि स्थानिक पातळीवरील वस्तुस्थिती राज्य सरकारपर्यंत कशी पोहोचणार, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. संपूर्ण यंत्रणा केवळ अधिका-यांच्या हाती सोपवल्याने दुष्काळ निवारणाचे काम कितपत गांभीर्याने आणि तत्परतेने होईल, याबाबत शेतकरी व राजकीय वर्तुळातून शंका व्यक्त केली जात आहे.

# बैठकीत पुन्हा टेबलावर ‘काजू-बदामाचा’थाट



**परभणी/प्रतिनिधी :** नांदेड येथील दुष्काळ आढावा बैठकीत काजू-बदामांवर ताव मारल्याने राज्यभरातून टीकेची झोड उठली होती. हा वाद ताजा असतानाच, आता पुन्हा एकदा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा परभणीच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत पार पडलेल्या बैठकीत तोच शाही थाट पाहायला मिळाला आहे. अधिकाऱ्यांच्या टेबलावर पुन्हा एकदा काजू-बदामाच्या प्लेट्स सजल्याचे समोर आल्याने, राज्यकर्ते आणि प्रशासनातील संवेदना पार वेशीवर टांगल्या गेल्या आहेत का, असा संतप्त सवाल शेतकरी वर्गातून विचारला जात आहे. एकीकडे निसर्गाची अवकृपा, पेरणीचा वाया गेलेला खर्च आणि कर्जाच्या वाढत्या ओझ्याखाली पिचलेला शेतकरी जगण्यासाठी संघर्ष करत असताना, दुसरीकडे मात्र लोकप्रतिनिधींना आणि सनदी अधिकाऱ्यांना सुकामेव्याचा मोह काही आवरताना दिसत नाही.

नांदेड येथील आढावा बैठकीत दुष्काळासारख्या गंभीर विषयावर चर्चा सुरू असताना नेत्यांसमोर काजू आणि बदाम ठेवण्यात आले होते. याप्रकारानंतर प्रचंड संताप व्यक्त झाल्यावर शिवसेना खासदार संजय जाधव यांनी अत्यंत बेजबाबदारपणे बचाव करताना हे प्रशासनाने ठेवले होते, आम्ही मागितले नव्हते. काजू खाल्ले तर काय झाले? शंभर-पन्नास रुपयांचे असतील, आम्ही माणसे नाही का? असा अत्यंत असंवेदनशील सवाल उपस्थित केला होता. या वक्तव्यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनीही तीव्र नाराजी व्यक्तकरत ताशेरे ओढले होते. नांदेडच्या घटनेनंतर लोकप्रतिनिधी धडा घेतील आणि भानावर येतील अशी अपेक्षा होती. मात्र, मुंबईत माहिती, शिक्षण व संवाद अर्थात आयईसी विभागाची आरोग्यविषयक जनजागृती वाढवण्यासाठी बोलावलेल्या उच्चस्तरीय बैठकीत पुन्हा तोच प्रकार घडला. बैठकीला पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर आरोग्य आयुक्त संजय काटकर, आयुक्त(शहरी) डॉ. सुनील भोकरे, संचालक डॉ. विजय कंदेवाड, उपसचिव राजश्री सारंग, उपसंचालक डॉ. भगवान पवार आणि सहायक संचालक डॉ. संजयकुमार जठार यांसारखे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आरोग्य शिक्षणाला अधिक व्यापक स्वरूप देण्याच्या आणि नागरिकांच्या वर्तणुकीत सकारात्मक बदल घडवण्याच्या गप्पा या बैठकीत मारल्या गेल्या.

# अनंत चतुर्दशी दिवशी बाप्पाला निरोप देताना पावसाची हजेरी



**मुंबई/प्रतिनिधी :** एल निनोच्या प्रभावामुळे राज्यातील अनेक भागात पावसाने ओढ दिली असून, दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. यंदा पावसाच्या मोठ्या तुटीमुळे धरणातील पिण्याच्या पाण्याची पातळीही कमी राहिलेली आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे हवामानात बदल होत असून, अनंत चतुर्दशीच्या दिवशी लाडक्या गणरायाला निरोप देताना पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राज्यातील अनेक भागात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी आहे. मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि कोकणातही पावसाची शक्यता आहे. २५ सप्टेंबर रोजी मुंबईच्या अनेक भागांत हलका ते मध्यम स्वरुपाचा पाउस पडू शकतो, तर पुणे शहर आणि घाट परिसरात वादळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

**दोन ते तीन दिवसांत मुसळधार पावसाचा इशारा**

पुढे दोन तीन दिवसांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. मुंबई, ठाणे, पालघर तसेच रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये हलक्या पावसाची शक्यता आहे. उर्वरित मध्य महाराष्ट्रात हलका ते मध्यम पाउस पडू शकेल. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मराठवाडा आणि विदर्भामध्ये पावसाचा जोर अधिक असू शकेल. छत्रपती संभाजीनगर, जालना येथे वा-यांचा वेग ताशी ४० ते ५० किमीपर्यंत पोहोचू शकेल. परभणी, बीड, लातूर, धाराशीव येथेही वा-यांचा वेग अधिक असू शकेल. विदर्भात चंद्रपूर, गडचिरोली येथे नागपूर, यवतमाळ, भंडारा येथे ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दरम्यान, यंदाच्या मान्सूनच्या हंगामात राज्यात सध्या १७ टक्के पावसाची तूट नोंदवण्यात आली आहे, तर संपूर्ण देशाचा विचार केल्यास सरासरीपेक्षा १५ टक्के कमी पाउस झाला आहे. महाराष्ट्रातून नैर्ऋत्य मान्सूनचा परतीचा प्रवास साधारणपणे ५ ऑक्टोबरच्या सुमारास सुरू होण्याची शक्यता आहे. तर १० ऑक्टोबरपर्यंत मान्सून राज्यातील बहुतांश भागांतून माघार घेईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## काँग्रेस मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना घेरणार

**नवी दिल्ली :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत आणि विरोधकांच्या निशाण्यावर आहेत. निवडणूक आयोगाच्या कामकाजावरील एका अहवालानुसार, गेल्या १० महिन्यांत दोन निवडणूक आयुक्तांनी एसआयआर आणि निवडणूक आयोगाच्या काही प्रक्रियांबाबत सुमारे १४ वेळा गंभीर आक्षेप नोंदवले आहेत. यावरून आता नवा वाद सुरू झाला असून काँग्रेसने ज्ञानेश कुमार यांना घेरण्याची तयारी सुरू केली आहे.निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबतच्या एका अहवालामुळे राजकीय वाद निर्माण झाला आहे. त्यानुसार, गेल्या १० महिन्यांत दोन निवडणूक आयुक्तांनी सुमारे १४ वेळा गंभीर आक्षेप नोंदवले आहेत. काँग्रेसने आता या मुद्द्यावर २९ सप्टेंबर रोजी केंद्रीय कार्यकारिणी समितीची बैठक बोलावण्याचा निर्णय घेतला आहे.










जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# वैशाली हत्याकांडातील आरोपी अद्यापही फरार

## पोलिसांचे पथक पुण्याकडे रवाना



**अमरावती/प्रतिनिधीः-**
बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दाभा गावातील वैशाली मेहरे हत्याकांडातील आरोपी पती ललीत मेहरे अद्यापही पोलिसांच्या हाती लागलेला नाही.

आरोपीच्या शोधासाठी बडनेरा पोलीस आणि गुन्हे शाखेची पथके सातत्याने छापेमारी करत आहेत. त्याच्या जुन्या ठिकाणांचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे एक पथक पुण्याकडे रवाना झाले आहे. माहितीनुसार, ललीत मेहरे दाभा गावात मामाच्या घरात पत्नी वैशाली आणि आई सोबत राहत होता. १६ सप्टेंबरच्या रात्री नशेत त्याने पत्नी वैशाली सोबत वाद घालून तिला बेदम मारहाण केली.आईने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता तिलाही मारहाण केली. रोजच्या भांडणाला आणि मुलाच्या आक्रमक वागणुकीला कंटाळून आई त्या रात्री गावातीलच ओळखीच्या व्यक्तीच्या घरी निघून गेली.


याच दरम्यान ललीतने वैशालीला कथितरित्या बेदम मारहाण केली, ज्यात तिचा मृत्यू झाला.धक्कादायक बाब म्हणजे आईला त्यावेळी घरात वैशालीचा मृत्यू झाल्याची कल्पनाच नव्हती. दुसऱ्या दिवशी ललीत पुन्हा आईकडे आला आणि दारू पिण्यासाठी पैसे मागू लागला. आईने नकार दिल्यावर त्याने तिलाही पुन्हा मारहाण केली. मुलाच्या या वर्तनाला कंटाळून अखेर आईने बडनेरा पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध तक्रार दाखल केली. त्यावेळेपर्यंत पोलिसांना किंवा कुटुंबीयांना घरात वैशालीची हत्या झाल्याचे माहिती नव्हती. आईच्या तक्रारीनंतर पोलीस घरी पोहोचले असता या हत्याकांडाचा उलगडा झाला. आता आरोपीला शोधणे पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे.

# मेळघाटात बोगस डॉक्टरांचा पर्दाफाश

## -जिल्हा परिषदेच्या शाळेत सुरू होते आरोग्य शिबिर

### -गिरगुटी येथील घटना

**धारणी/प्रतिनिधीः-**
मेळघाटच्या गिरगुटी गावात परवानगी व आवश्यक वैद्यकीय पात्रता नसताना शिबिराच्या माध्यमातून रुग्णांवर उपचार करणाऱ्या बोगस डॉक्टरांचा आरोग्य विभागाने पर्दाफाश केला. विशेष म्हणजे, जिल्हा परिषदेच्या शाळेत हे आरोग्य शिबिर सुरू होते. याप्रकरणी आरोग्य विभागाने चिखलदरा पोलिसांकडे तक्रार करून कारवाईची मागणी केली आहे. गिरगुटी येथे बेकायदा पद्धतीने वैद्यकीय व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाल्या नंतर संबंधित वैद्यकीय अधिकारी व आरोग्य विभागाच्या पथकाने प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी केली. तपासणीदरम्यान संबंधित व्यक्तीकडे आयुर्वेदिक हेल्थकेअरचा परवाना असल्याचे सांगण्यात आले. मात्र, त्या परवान्याच्या आधारे प्रत्यक्ष



वैद्यकीय उपचार करण्याचा अधिकार असल्याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. तसेच संबंधित व्यक्ती ग्रामपंचायत परिसरात वैद्यकीय व्यवसाय करून रुग्णांकडून उपचाराच्या नावाखाली ८०० ते एक हजार रुपये शुल्क घेत असल्याची माहिती तक्रारीत नमूद करण्यात आली आहे. रुग्णांची तपासणी करण्यासाठी एका मशीनचा वापर केल्या जात असल्याचेही सांगण्यात आले. या मशीनच्या आधारे रुग्णांची तपासणी करून उपचार केले जात असल्याचा आरोप आहे. आरोग्य विभागाच्या तक्रारीनुसार आरोपीकडे आवश्यक वैद्यकीय पात्रता व अधिकृत नोंदणी नसल्याने त्याच्याकडून वैद्यकीय व्यवसाय केला जात असल्यास ही बाब गंभीर आहे.जिल्हा आरोग्य अधिकारी प्रवीण पारिसे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अभिषेक नायडू, डॉ. लोखंडे, रोहन गीते, सलोनी नायर, गजानन सुने, विनोद चव्हाण, मुकुंद गिरी, रवींद्र बेलसरे, दिलीप चर्जन यांनी ही कारवाई केली.या प्रकरणी आज पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. आरोग्य विभागाने काही औषधे जप्त केली. आरोग्य विभाग या प्रकरणात काय कार्यवाही करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# झोपेत महिलेला सर्पदंश

## -तळेगाव ठाकूर येथील घटना

**तिवसा/प्रतिनिधीः-**
तालुक्यातील तळेगाव ठाकूर येथे आज, बुधवार २३ सप्टेंबर रोजी पहाटे सुमारे ४ वाजताच्या दरम्यान गाढ झोपेत असताना एका महिलेला सर्पदंश झाल्याची घटना घडली. सुदैवाने कुटुंबीयांनी तत्काळ हालचाल करून महिलेला रुग्णालयात दाखल केल्याने वेळेवर उपचार मिळाले आणि संभाव्य धोका टळला.प्राप्त माहितीनुसार, तळेगाव ठाकूर येथील मनीषा सतीश बनकर (वय ३७ वर्षे) या पहाटे गाढ झोपेत असताना अचानक त्यांच्या खांद्याला काहीतरी रुतल्यासारखे जाणवले. त्यांना लगेच जाग आली.

संशय आल्याने त्यांनी घराबाहेर असलेले पती सतीश बनकर यांच्याशी संपर्क साधला. सतीश बनकर हे त्यावेळी गणपती



मंडळा जवळ महादेवाचे गाणे म्हणण्यासाठी गेले होते. घटनेची माहिती मिळताच पतीसह मंडळातील कार्यकर्ते तातडीने घरी पोहोचले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी मनीषा बनकर यांना उपचारासाठी तत्काळ तिवसा येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथे डॉक्टरांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना अमरावती येथील इरविन रुग्णालयात रेफर करण्यात आले. जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहे.

## जीएमसीच्या जनसंपर्क अधिकारी पदी डॉ. कल्पना काळे

अमरावती : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अमरावती (जीएमसी) येथे जनसंपर्क अधिकारी पदी डॉ. कल्पना काळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. काळे या सध्या महाविद्यालयात जनऔषधवैद्यकशास्त्र विभागाच्या प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. संस्थेचे अधिष्ठाता डॉ. अनिल बत्रा यांनी या नियुक्तीची अधिकृत घोषणा केली आहे.

# अकॅडमिक शाळेच्या मैदानात तलवार घेऊन फिरणाऱ्या तरुणाला अटक

## -नागपुरी गेट पोलिसांच्या डीबी पथकाची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-**
शहरातील अकॅडमिक शाळेच्या खुल्या मैदानात हातात तलवार घेऊन फिरणाऱ्या १९ वर्षीय तरुणाला नागपुरी गेट पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण (डीबी) पथकाने ताब्यात घेतले. त्याच्याकडून सुमारे ३४.५ इंच लांबीची स्टीलची तलवार जप्त करण्यात आली. ही कारवाई बुधवारी २३ सप्टेंबर रोजी करण्यात आली.

पोलिसांच्या माहितीनुसार, नागपुरी गेट पोलीस ठाण्याचे डीबी पथक हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना एका इसमाकडे तलवार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने दोन पंचांसह अकॅडमिक शाळेच्या खुल्या मैदानात धाव घेतली. तेथे माहितीतील वर्णनाप्रमाणे एक तरुण हातात तलवार घेऊन फिरताना आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव अब्दुल तौफीक अब्दुल रफीक (वय १९, रा. अलीमनगर, गल्ली क्रमांक ३, अमरावती) असे सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले. पंचांसमक्ष आरोपीच्या ताब्यातील स्टीलची तलवार जप्त करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तलवारीची एकूण लांबी ३४.५ इंच, पात्याची लांबी २६ इंच, मुठीची लांबी ८.५ इंच असून पात्याची रुंदी सुमारे २ इंच आहे. जप्त तलवारीची अंदाजे किंमत १ हजार रुपये आहे. या प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई नागपुरी गेट पोलिसांकडून करण्यात येत आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त परिमंडळ-१ यशवंत सोळंके आणि सहायक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली नागपुरी गेटचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके यांच्या नेतृत्वात डीबी पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक विकास मनपिया तसेच पोलीस हेडकॉन्स्टेबल इरफान रायलीवाले, प्रविण ढंगेकर आणि पोलीस अंमलदार इमरान खान, मनीष यादव, मोहनसिंग चौव्हाण, शेखर गायकवाड व आसीफ शेख यांच्या पथकाने केली.

# शिष्यवृत्ती अर्ज निकाली काढण्यासाठी बुधवारपर्यंत मुदत

**अमरावती/प्रतिनिधीः-**
महाडीबीटी १.० ते महाडीबीटी २.० पोर्टल अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यात अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी महाविद्यालयांना बुधवार, दि. ३० सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ मधील प्रलंबित अर्जांची छाननी करणे आणि बिले डाऊनलोड करून ठेवण्यासाठी महाडीबीटी १.० पोर्टल दि. १० ते ३० सप्टेंबर या कालावधीत सक्रिय राहणार आहे. सद्यस्थितीत विद्यार्थ्यांसाठी पुन्हा अर्ज



करण्याची सुविधा बंद ठेवण्यात आली आहे. डेटा स्थलांतराची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महाडीबीटी २.० पोर्टलवर हे अर्ज पुन्हा भरण्यासाठी उपलब्ध केले जातील. दि. १० ते ३० सप्टेंबर दरम्यान महाडीबीटी १.० वर कोणतेही नवीन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. नवीन अर्जांची प्रक्रिया केवळ महाडीबीटी २.० वर चालणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य आणि शिष्यवृत्ती विभाग प्रमुखांनी अर्जांची काळजीपूर्वक तपासणी करून कागदपत्रांतील त्रुटींची तातडीने पूर्तता करून घ्यावी. त्रुटींची पूर्तता न करता अर्ज पुढील स्तरावर पाठवणे चुकीचे असून, त्यामुळे अर्ज नामंजूर होऊ शकतात.दि.३० सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज निकाली निघाले नसल्यास किंवा चुकीच्या अर्जांना मंजुरी दिल्यास विद्यार्थ्यांचे होणाऱ्या नुकसानास संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य पूर्णपणे जबाबदार राहतील, असे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी कळविले आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

## दुष्काळाबाबत मदतीचा आदेश काढणार

मदतीची कारवाई करण्यात येणार आहे. येत्या काळात चाराटंचाई, पाणीटंचाईबाबत उपाययोजना करून अन्नधान्याचीही मदत करावी लागणार आहे. शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या शिक्षणामध्ये खंड पडू नये, यासाठी थेट मदत करण्यात येईल. रब्बीमध्ये काही ठिकाणी उपलब्ध असलेल्या पाण्यावर पिके घेण्याबाबत तपासणी करण्यात येईल. तसेच रब्बी पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल.तसेच, रोजगार उपलब्ध होण्यासाठी जलसंधारणाच्या कामावर भर देण्यात येईल. जलसाठे आटलेले असल्यामुळे यातील गाळ काढणे, जलतारा स्ट्रक्चर निर्माण करणे, दुरुस्ती करणे आवश्यक असलेले तलाव शोधून त्यांची दुरुस्ती करण्यात येईल.

## दुष्काळसदृश परिस्थितीच्या

त्याचा मोठा परिणाम झाला आहे. विशेषतः भातकुली तालुक्यातील भातकुली, निंबा व कवठा बहाळे परिसरात सोयाबीन व कापूस पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे पाहणीदरम्यान निदर्शनास आले.

आमदार संजय खोडके यांनी भातकुली येथील लक्ष्मण भीमराव सरोदे यांच्या नुकसानग्रस्त कपाशी पिकाची तसेच सुनिता राजेश पवार यांच्या शेतातील सोयाबीन पिकाची पाहणी केली. त्यानंतर निंबा येथे तुळशीराम हरिभाऊ सिरसाट यांच्या सोयाबीन पिकाची आणि रवींद्र कुमार सिंघई यांच्या कपाशी पिकाची पाहणी करण्यात आली. कवठा बहाळे येथे संजय अमृतराव सगणे यांच्या शेतातील नुकसानग्रस्त सोयाबीन तसेच प्रदीप अमृतराव सगणे यांच्या कपाशी पिकाचीही पाहणी करण्यात आली.

पाहणीदरम्यान आमदार संजय खोडके यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. दुष्काळसदृश परिस्थितीचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी डिजिटल सर्व्हेसोबतच अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी करावी, तसेच पीक पंचनाम्यांसाठी आवश्यक एसओपीची तातडीने अंमलबजावणी करावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

यावेळी तालुका कृषी अधिकारी भातकुली उत्कर्षा भोसले, उप कृषि अधिकारी प्रमोद खर्चान, अविनाश देशमुख, धीरज मारोडकर, सहायक कृषी अधिकारी अतुल सोळंके, अनुराधा राजुस्कर, प्रमोद कोकणे आदींसह शेतकरी उपस्थित होते.

## शेतीसाठी उजव्या कालव्याचे

तर राहिलेली पिके नष्ट होऊन शेतकऱ्यांच्या हाती येणारे पीक हे नष्ट होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक व्यवहार अडचणीत येणार आहे.त्यामुळे आता पावसाळ्याचे पाण्याची वाट पाहण्यात अर्थ नाही,त्याकरिता उजव्या कालव्याद्वारे पाणी सोडून शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात यावे जेणेकरून शेतकरी गुरुकुंज लिफ्ट एरिगेशन द्वारे आपली पिके वाचविण्याचे प्रयत्न करतील.तिवसा तालुका हा कोरड्या दुष्काळातून वगळण्यात आला आहे. शासन दरबारी मागणी रेटून तिवसा तालुका कोरडा दुष्काळ यादीत समाविष्ट करून शेतकऱ्यांना मदत करावी,अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने डॉक्टर सेल चे जिल्हाध्यक्ष डॉ. सुभाष तंवर,तालुकाध्यक्ष हेमंत बोबडे,विलास वावरे,मंगेश पोल्हाड,आकाश लांजेवार,अंबादास तायडे,अनिल कडव,प्रशांत पांडे,पुरुषोत्तम दाते,सतीश वानखडे आदींनी एका निवेदनातुन तिवसा तहसीलदार मयुर कळसे यांना केली आहे.

## बेलोरा परिसरात दोन बिबट्यांचा

भीती निर्माण झाली आहे.

या घटनेची गंभीर दखल घेत बेलोरा येथील पोलीस पाटील अकलेश डावरे यांनी मोर्शी वनविभागाला याबाबत तातडीने माहिती दिली. माहिती मिळताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली, परंतु पाहणी करून कर्मचारी परत निघून जातात. अशा प्रकारच्या औपचारिक पाहणीमुळे नागरिकांमधील भीती दूर झालेली नाही.

वनविभाग फक्त येऊन पाहणी करून वेळ काढूपणा करत असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांकडून केला जात आहे. या बिबट्यांचा लवकरात लवकर बंदोबस्त करावा आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी बेलोरा ग्रामस्थांकडून केली जात आहे.

## क्रीडा विभागाच्या योजनांचा लाभ

इंडिया, टार्गेट ऑलिम्पिक पोडियम, व्यायामशाळा विकास योजना, क्रीडांगण विकास योजना, खेळाडूंकरिता गौरव व प्रोत्साहन व बक्षिसे, शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान आदी महत्वाच्या केंद्र व राज्य शासनाच्या क्रीडा विभागाच्या योजना राबविण्यात येत आहेत. त्यामुळे गेल्या दशकात क्रीडा क्षेत्राच्या विकासाला गती मिळाली आहे. या योजनांचा लाभ क्रीडा क्षेत्रातील घटकांनी घ्यावा असे देवरे म्हणाल्या. माहिती व जनसंपर्क विभाग गणेशोत्सवा दरम्यान राज्यभर शासकीय योजनांच्या माहितीवर आधारीत ‘लोकसंवाद’ हा संवादात्मक कार्यक्रम राबवित आहे. या कार्यक्रमांतर्गत जिल्हा माहिती कार्यालयाने गुरुवारी श्री बजरंग गणेशोत्सव मंडळात लोकसंवाद कार्यक्रमाचे आयोजन केले. विदर्भ केसरी प्रा. संजय तिरथकर यांनीही या लोकसंवादात सहभाग घेवून कुस्तीपटू म्हणून त्यांचा प्रवास उलगडला. या संवादात सहभागी होवून अमृता व टिना सुगंधी या मायलेकींनी क्रीडा क्षेत्रात मुलींच्या योगदानावर भाष्य केले. टेनी क्वॉईट क्रीडा प्रकारात जिल्हा व राज्य स्तरावर उत्तम कामगिरीचा अनुभव यावेळी टिना सुगंधी यांनी मांडला. बाबुलाल मामर्डे या ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या काळातील खेळ व त्याने शरीरयष्टी सुधारण्यात होणारा लाभ सांगतांना शंकरपटाच्या आठवणींना उजाडा दिला.

तत्पूर्वी, जिल्हा माहिती कार्यालयाचे माहिती अधिकारी रितेश भुयार यांनी लोकसंवाद उपक्रमाविषयी प्रास्ताविकात माहिती दिली व संपूर्ण कार्यक्रमांचे संयोजन केले. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालाचे क्रीडा अधिकारी संतोष विघ्ने आणि तालुका क्रीडा अधिकारी अनिल इंगळे यांनी क्रीडा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या क्रीडा पुरस्कार व युवा पुरस्कार योजना, राज्य व राष्ट्रीय युवा आदान प्रदान कार्यक्रम, राज्य युवा विकास निधी आदींबाबत माहिती दिली. श्री बजरंग गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष डॉ.राजेश जवादे, संयोजक गजानन परिहार, प्रसिद्धी प्रमुख संजय मापले आणि पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## गणेश विसर्जनासाठी अमरावतीत

एक प्लाटून, तसेच ३४२ पुरुष आणि १२७ महिला होमगार्ड बंदोबस्तात सहभागी होणार आहेत. नागरिकांच्या सुरक्षेसाठी शहरात १४ सीआर मोबाइल, १० दामिनी पथके, बीट मार्शल आणि डायल-११२ची वाहने सातत्याने पेट्रोलिंग करणार आहेत. शहरातील महत्त्वाचे चौक, गर्दीची ठिकाणे तसेच मिश्र व संवेदनशील वस्त्यांमध्ये पोलिसांचे फिक्स पॉइंटही तैनात केले जाणार आहेत.

**सोशल मीडियावरही पोलिसांची नजर-** गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान सोशल मीडियावरून अफवा किंवा तेढ निर्माण करणाऱ्या संदेशांचा प्रसार होऊ नये, यासाठी सायबर पोलीस ठाण्याच्या विशेष पथकाकडून सोशल मीडियावर सतत लक्ष ठेवण्यात येणार आहे. मिरवणूक मार्ग आणि विसर्जनस्थळांवर सीसीटीव्ही व व्हिडीओग्राफरच्या माध्यमातून निगराणी ठेवण्यात येणार आहे. मिरवणुकीमध्ये ज्वलनशील पदार्थ, शस्त्रे व काठ्या बाळगणे, आक्षेपार्ह गाणी वाजविणे किंवा आक्षेपार्ह देखावे प्रदर्शित करणे यास मनाई करण्यात आली आहे. सराईत गुन्हेगार, धार्मिक तेढ निर्माण करणारे समाजकंटक तसेच जातीय दंगलीतील आरोपींना ताब्यात घेऊन प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या सूचनाही पोलीस आयुक्तांनी दिल्या आहेत. अमरावतीकरांनी यापूर्वीप्रमाणेच गणेश विसर्जन उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे. जातीय सलोखा, सामाजिक एकोपा आणि शहरातील शांतता अबाधित ठेवण्याचे आवाहन पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी केले आहे.

## अल्पवयीन मुलीवरील लैंगिक

मुलगी रडत असल्याचे शेजाऱ्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर तिच्या आईला माहिती देण्यात आली. मुलीने आईला घडलेला प्रकार सांगितल्यानंतर ११ नोव्हेंबर २०१६ रोजी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. या प्रकरणात न्यायालयासमोर एकूण १२ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. तसेच संबंधित कागदपत्रे व इतर पुरावे न्यायालयासमोर सादर करण्यात आले. सरकारी पक्षाच्या वतीने सहायक सरकारी वकील प्रफुल्ल प्रकाश तापडिया यांनी कामकाज पाहिले व युक्तिवाद केला. न्यायालयासमोर आलेल्या पुराव्यांच्या आधारे आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध झाल्याचे न्यायालयाने नमूद करत पोक्सो कायद्यातील कलम ९(एम) सह कलम १० अन्वये पाच वर्षे सश्रम कारावास आणि पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक २ यशवंत आनंद गोस्वामी यांनी हा निकाल दिला. प्रकरणाच्या पैरवीसाठी एएसआय विनोद कनोजिया आणि अरुण हटवार यांनी सहकार्य केले.

## गणेश विसर्जन मिरवणुकीत

सूचनांबाबतची नाराजी लोकशाही मार्गाने व्यक्त करण्यात आली.

आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पूर्णानगर येथे बाल बजरंग सार्वजनिक गणेश मंडळ, वीर महाराणा गणेश मंडळ, ठाकूरपुरा व विजय सार्वजनिक गणेश मंडळ, माळीपुरा या मंडळांकडून गेल्या अनेक वर्षांपासून गणेशोत्सव साजरा केला जातो. यंदाही विसर्जन मिरवणुकीसाठी मंडळांनी ढोल-ताशे, बँजो आदी वाद्यांची व्यवस्था केली होती. त्यासाठी आगाऊ रक्कमही देण्यात आल्याचे मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र, विसर्जन मिरवणुकीत एकच वाद्य वाजविण्याबाबत पोलिस प्रशासनाकडून सूचना देण्यात आल्याने मंडळांच्या पदाधिकारी व गणेशभक्तांमध्ये नाराजी निर्माण झाली. ध्वनीप्रदूषण नियंत्रणासंदर्भातील शासन व प्रशासनाच्या नियमांचा आदर असून, उच्च न्यायालयाच्या आदेशांचे तसेच पोलिस प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्यात येईल, असे मंडळांनी स्पष्ट केले.

निषेधाचा भाग म्हणून कोणतेही वाद्य न वाजविता काळ्या पट्ट्या बांधून व काळे कपडे परिधान करून गणेशभक्त मिरवणुकीत सहभागी झाले. ऑटो स्टॉप येथून सुरू झालेली मिरवणूक हनुमान चौक, मेन लाईन, आठवडी बाजार, कासतपुरा, माळीपुरा मार्गे पूर्णा नदीकाठावर पोहोचली. तेथे गणेशमूर्तींचे विधिवत विसर्जन करण्यात आले. दरम्यान, मिरवणुकीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी आसेगाव पूर्णा पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. मंडळांनी यापूर्वीच पोलिस ठाण्यात निवेदन देऊन मिरवणुकीदरम्यान आवश्यक पोलीस बंदोबस्त व वाहतूक नियंत्रणाची मागणी केली होती.

## राजाराम जाधव यांच्या दोन

‘माझ्या जीवनातील प्रेरणादायी सप्तश्री’ हा चरित्रात्मक लेखसंग्रह आणि ‘नांदी सामाजिक परिवर्तनाची’ हा काव्यसंग्रह लिहिला आहे. या दोन्ही साहित्यकृतींचा प्रकाशन सोहळा रविवार, दि. २७ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, पंचवटी चौक येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती लेखक राजाराम जाधव यांनी शुक्रवारी (दि. २४) श्रमिक पत्रकार भवन येथे आयोजित पत्र परिषदेत दिली.

या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनय राऊत, यवतमाळचे ज्येष्ठ पत्रकार प्रा. न. मा. जोशी, दै. विदर्भ मतदारचे मुख्य संपादक ॲड. दिलीप एडतकर, दै.हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास मराठे, इंडियन मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. पी. सी. राठोड, श्रीमती विमलाबाई देशमुख महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. अमरसिंग राठोड, चाळीसगाव येथील साहेबराव मोरे आणि एकनाथ गोफणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमात नागपूर येथील इंटेलिजन्स ब्युरोचे सेवानिवृत्त आयुक्त हरिसिंग साबळे यांच्यासह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सपत्नीक सत्कार करण्यात येणार आहे. यामध्ये प्रा. न. मा. जोशी, निंबाजी भगत, रमेश काकडे, प्रदीप गोसावी, वैजनाथ लटके, राजेंद्र पवार, देवेंद्र भुजबळ, अनिता खडसे, प्राचार्य डॉ. संजय खडसे, ज्योती महल्ले, संजय महल्ले आणि एकनाथ गोफणे यांचा समावेश आहे. पत्र परिषदेला लेखक राजाराम जाधव, प्रकाशक संजय महल्ले आणि ज्योती जाधव उपस्थित होते.

## मंगळवारचे ’रोजगार महाकुंभ’

शैक्षणिक संस्थांनी या बदलाची नोंद घ्यावी, असे कौशल्य विकास मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी कळविले आहे.

## नेरपिंगळाईच्या मानाच्या गणपतीची

सेवाभावाचीही परंपरा जपली गेली. लहरी भोंदूजी महाराज मंडळातर्फे सर्व भाविकांसाठी अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मनोज पोटे आणि मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेत हजारो भाविकांना अन्नदान केले. दिवसभर मिरवणुकीत सहभागी झालेल्या भाविकांसाठी हे अन्नदान आधार ठरले. भक्तीबरोबरच माणुसकीची सेवा करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. गणरायाच्या मिरवणुकीदरम्यान नेरपिंगळाईच्या सामाजिक सलोख्याचेही सुंदर दर्शन घडले. अमन ट्रस्ट व मशीदतर्फे गणरायाच्या मूर्तीचे स्वागत करण्यात आले. यावेळी साजिद पठाण, अफसर खाँ पठाण, शेख साजिद जहीरखाँ, शेरखाँ पठाण, मो. खलील, शेख ताहीर, रफीक शेख आणि शेख आहेफाज यांच्यासह अमन ट्रस्टच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गणरायाचे स्वागत केले. या स्वागताने गावातील परस्पर सन्मान, बंधुभाव आणि सामाजिक एकतेची परंपरा अधिक ठळकपणे समोर आली.

विसर्जन मिरवणुकीचे नियोजन शिरखेड पोलीस स्टेशनचे ठाणेदार ईश्वर वर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. मनोज कळसकर, वैभव घोगरे आणि मनोज चौधरी यांनी मिरवणूक शांततेत व सुरळीत पार पडण्यासाठी परिश्रम घेतले. गणेश मंडळांचे कार्यकर्ते, नागरिक आणि पोलीस प्रशासन यांच्या समन्वयामुळे संपूर्ण सोहळा शांततेत पार पडला.

या भक्तिमय सोहळ्यासाठी अतुल खोडस्कर, माजी सभापती सोनाली नवले, माजी सरपंच विलास खाजबागे, नरेंद्र फसाटे, संजय मंगळे, राहुल मंगळे, माजी सरपंच सविता खोडस्कर, ग्रामपंचायत अधिकारी अरविंद आमले, सागर माहोरे, सचिन कोकाटे, पोलीस पाटील राजेश राऊत यांच्यासह सर्व गणेश मंडळांचे कार्यकर्ते आणि ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## घरगुती गॅस सिलेंडरमधून ऑटोमध्ये

वानखडे (वय ५७) आणि शेख मुन्ना शेख शब्बीर (वय २४) हेही रिफिलिंगसाठी घरगुती गॅस सिलेंडरसह आढळून आल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. सर्व आरोपी नांदगाव खंडेश्वर येथील रहिवासी आहेत. कारवाईदरम्यान पोलिसांनी चार ऑटो रिक्षा (१२ लाख रुपये), पाच घरगुती गॅस सिलेंडर (११ हजार २५० रुपये), दोन इलेक्ट्रिक गॅस रिफिलिंग पंप मशीन (१० हजार रुपये), १० रिफिलिंग नळ्या (२ हजार ५०० रुपये), चार नोझल (२ हजार रुपये), वजनकाटा (५ हजार रुपये) आणि इलेक्ट्रिक एक्स्टेंशन बॉक्स (४०० रुपये) असा एकूण १२ लाख ३१ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जप्त केलेले एलपीजी सिलेंडर ज्वलनशील असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने ते स्थानिक गॅस एजन्सीच्या ताब्यात ठेवण्यात आले आहेत. याप्रकरणी नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक सतीश झाल्टे तसेच पोलीस अंमलदार मंगेश लकडे, सचिन मसांगे, हर्षल काळे आणि संजय प्रधान यांच्या पथकाने केली.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, २५ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## आमदार भावना गवळी पाटील यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

# 'वैनगंगा-नळगंगा' प्रकल्पातून जिल्ह्यातील ५ तालुक्यांना पाणी देण्याचे मुख्यमंत्री यांचे आश्वासन!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

केंद्र शासनाने घोषित केलेल्या आकांक्षित जिल्ह्यांच्या यादीत समाविष्ट असलेल्या वाशिम जिल्ह्याचा सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी आणि येथील शेतकऱ्यांना दुष्काळमुक्त करण्यासाठी आमदार भावना गवळी पाटील यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण पाठपुराव्याला अवघ्या काही वेळातच मोठे यश आले आहे.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाची उपवाहिनी मंजूर करून त्याचा लाभ कारंजा तालुक्यासोबतच जिल्ह्यातील उर्वरित मालेगाव, वाशिम, रिसोड, मंगरूळपीर आणि मानोरा या पाचही तालुक्यांना करण्यात यावा, या आमदार भावना गवळी पाटील यांच्या मागणीवर मुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस यांनी तात्काळ सकारात्मक निर्णय घेतला आहे. वाशिम जिल्ह्यात विशेष उपवाहिन्या टाकून या योजनेचा थेट लाभ उर्वरित पाचही



तालुक्यांना दिला जाईल, असे जाहीर आश्वासन मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहे.

आमदार भावना गवळी पाटील यांनी आजच म्हणजेच २४ सप्टेंबर २०२६ रोजी मुख्यमंत्री महोदनांना या संदर्भात अधिकृत पत्र सादर केले होते, ज्यावर मुख्यमंत्र्यांनी तात्काळ हा अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. आमदार भावना गवळी पाटील यांनी पत्रात वाशिम जिल्ह्याच्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीकडे लक्ष वेधत अनेक तांत्रिक मुद्दे प्रामुख्याने मांडले होते. वाशिम जिल्ह्याची भौगोलिक रचना ही गोदावरी व तापी या दोन प्रमुख नदी खोऱ्यांच्या सीमेवर म्हणजेच वॉटर डिव्हाइडवर आहे. या विशिष्ट उंचीवरील रचनेमुळे जिल्ह्यात पडणारे पावसाचे पाणी अत्यंत वेगाने दोन्ही खोऱ्यांमध्ये वाहून जाते आणि जिल्ह्यात पाणी साठवून ठेवण्यासाठी नैसर्गिक मर्यादा येतात. यामुळे मुबलक पाऊस पडूनही वाशिम जिल्हा पूर्णतः कोरडवाहू व टंचाईग्रस्त राहिले असून येथील लाखो शेतकरी दरवर्षी तीव्र जलसंकट आणि आर्थिक विवंचनेला सामोरे जात आहेत. या भौगोलिक समस्येवर मात करण्यासाठी वैनगंगा-नळगंगा मुख्य कालव्यावरून वाशिम जिल्ह्यासाठी विशेष उद्वहन उपवाहिनी तयार करण्याची तांत्रिक गरज त्यांनी पत्रात सुचवली होती.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दिलेल्या या आश्वासनामुळे अबालवृद्धांसह अवघा वाशिम जिल्हा सुखावला असून मालेगाव, वाशिम, रिसोड, मंगरूळपीर, कारंजा आणि मानोरा या पाचही तालुक्यांचा जलदुष्काळ कायमचा पुसला जाणार आहे. जिल्ह्यात उपवाहिन्यांचे जाळे निर्माण झाल्यामुळे पावसाचे वेगाने वाहून जाणारे पाणी रोखता येईल आणि ऐन पावसाच्या खंड काळात सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पिकांच्या संवेदनशील टप्प्यात हक्काचे सिंचन उपलब्ध होईल.

# जलसाठा आटला; भव्य गणेशमूर्तींच्या विसर्जनाचा पेच!

### कारंजा लाडमध्ये प्रशासनापुढे आव्हान; कृत्रिम विसर्जन कुंड उभारण्याची मागणी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

पावसाने दडी दिल्याने कारंजा परिसरातील जलसाठा मोठ्या प्रमाणात घटला असून, शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या अडाण धरणात सध्या केवळ ३० ते ३५ टक्के जलसाठा शिल्लक असल्याचे सांगितले जात आहे. अशा परिस्थितीत गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर यंदा मोठ्या गणेशमूर्तींच्या विसर्जनाचा प्रश्न प्रशासनासमोर उभा ठाकला आहे.

शहरातील अनेक सार्वजनिक गणेश मंडळांनी यंदा १५ ते २० फूट उंचीच्या भव्य गणेशमूर्तींची स्थापना केली आहे. दरवर्षी या मूर्ती अडाण नदीपात्रात विसर्जित केल्या जातात. मात्र यंदा नदीपात्रात पुरेसे पाणी नसल्याने एवढ्या मोठ्या मूर्तींचे विसर्जन नेमके कुठे आणि कसे करायचे, हा प्रश्न मंडळांसह प्रशासनालाही पडला आहे.



**पाणी कमी; विहिरींच्या प्रदूषणाची भीती**

काही ठिकाणी विहिरींमध्ये पाणी उपलब्ध असले तरी मोठ्या आकाराच्या, विशेषतः पीओपीच्या मूर्तींचे विसर्जन विहिरी किंवा मर्यादित जलस्त्रोतांमध्ये केल्यास पाणी दूषित होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. तसेच पाण्याची पातळी कमी असल्याने मूर्तींचे पूर्णपणे विघटन न होता अवशेष शिल्लक राहण्याची शक्यता आहे. यामुळे श्रद्धा, पर्यावरण आणि उपलब्ध जलस्त्रोतांचे संरक्षण यांचा समतोल साधण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.


**प्रशासनापुढे कोणते पर्याय?**

नागरिकांकडून मोठ्या मूर्तींच्या विसर्जनासाठी शहरात २ ते ३ ठिकाणी मोठे कृत्रिम विसर्जन कुंड तयार करण्याची मागणी होत आहे. त्याचबरोबर मोठ्या मूर्ती सुरक्षित ठिकाणी ठेवून योग्य परिस्थिती निर्माण झाल्यानंतर विसर्जन करण्याचा पर्यायही चर्चेत आहे.

दरम्यान, भविष्यात अशा परिस्थितीची पुनरावृत्ती टाळण्यासाठी पुढील वर्षापासून शाडू मातीच्या पर्यावरणपूरक मूर्तींना प्रोत्साहन देण्याबाबत प्रशासन आणि गणेश मंडळांनी सामूहिक निर्णय घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# रिसोड लोणार मार्गावर रेती वाहतूक करणारा टिप्पर पलटी

### रेती अवैध कि वैद्य सर्वसामान्य नागरिकांचा सवाल



■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड तालुक्यात बेकायदेशीरपणे सुसाट वेगाने रेतीची वाहतूक करणाऱ्या एका भरधाव टिप्परचा भीषण अपघात रिसोड लोणार मार्गावर झाल्याची घटना समोर आली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून याला जबाबदार कोण? आसा प्रश्न उपस्थित होतांना दिसत आहे..

रिसोड तालुक्यात ओव्हरलोड रेती भरून अत्यंत वेगाने जाणाऱ्या एका टिप्परचे चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे हा टिप्पर रिसोड लोणार मार्गावरील गिरीराज धाब्याजवळ उलटला. टिप्परमध्ये क्षमतेपेक्षा जास्त (ओव्हरलोड) वाळू भरलेली होती

टिप्पर पलटी झाल्यानंतर त्यामधील सर्व रेती वन ऊद्यान येथील नाली मध्ये पसरली. या अपघातात टिप्परचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सुदैवाने कोन्हती जिवित हाणी झाली नाही.

याच वेळी रिसोड लोणार मार्गावरील मागवाडी येथे एका भरधाव टिप्परने चारचाकी एम एच १४ जे यु ५९३२ स्वीप्टडिझयर या क्रमांकाच्या गाडीला रेती वाहतूक करणा-या क्रमांक एम एच २१ बि एच ५९९९ टिप्परने जोरजोरात धडक दिल्याने चार चाकी वाहनाचे मोठे नुकसान झाले, मात्र यामध्ये कोणती ही जिवित हाणी झाल्या नसल्याचे समजतेय

रेती वाहतूक करणारे टिप्पर गेल्या काही दिवसांपासून भरदिवसा शहरातून भरधाव वेगाने धावत असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहेत.

मात्र या कडे महसुल प्रशासनाकडून अर्थपुर्ण दुर्लक्ष केले जात असल्याचे बोलले जात आहे. रिसोड तालुक्यात रेती वाहतूक करणा-या वर महसूल व पोलीस प्रशासनाकडून काय कार्यवाई होते या कडे नागरिकांचे लक्ष लागले आहेत.

# कारविरहित दिनानिमित्त चिमुकल्यांची सायकल रॅली



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जागतिक कारविरहित दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय हरित सेना, एस.एम.सी. इंग्लिश स्कूल वाशीमच्या वतीने २२ सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांची सायकल रॅली व प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि इंधन बचतीचा प्रभावी संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविला.

वाढते जागतिक तापमान, वाहनांमुळे होणारे वायुप्रदूषण, इंधनाचा वाढता वापर आणि पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास या समस्या आज गंभीर बनल्या आहेत. वाढत्या प्रदूषणाचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होत असून, ओझोन थराच्या संरक्षणासाठीही प्रदूषण कमी करण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर दैनंदिन जीवनात सायकलचा वापर वाढविणे, अनावश्यक वाहनांचा वापर टाळणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करणे आवश्यक असल्याचा संदेश विद्यार्थ्यांनी दिला.

विद्यार्थ्यांनी सायकल रॅली तसेच प्रभात फेरीच्या माध्यमातून 'वाहनांचा कमी वापर करा, प्रदूषण टाळा', 'सायकल चालवा, पर्यावरण वाचवा' अशा घोषणांद्वारे जनजागृती केली.

### दाळंबी तलावासाठी इच्छूक मत्स्यव्यवसाय संस्थांचे अर्ज मागविले

**अकोला :** अकोला तालुक्यातील दाळंबी साठवण तलावाचे जलक्षेत्र ५९.९७ हे. आहे. या तलावाचे मासेमारी हक्क मृद व जलसंधारण विभागातर्फे मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत.

या तलावासाठी नोंदणी करण्यासाठी इच्छूक मत्स्यव्यवाय सहकारी संस्थांनी परिपूर्ण प्रस्ताव ३० दिवसांच्या आत सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), शासकीय दूध डेअरी, मूर्तिजापूर रस्ता, अकोला येथे सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जलाशयाच्या बाधित गावातील १० किमी परिघाच्या परिसरातील स्थानिक प्रकल्पग्रस्त, महिला, अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जाती, जमाती यांचा प्रस्तावात समावेश असणे आवश्यक आहे.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी नगर परिषदेचा पुढाकार; प्रांगणात कृत्रिम विसर्जन तलावाची सोय

■ प्रतिनिधी | रिसोड ■

श्री गणेशोत्सव २०२६ च्या पार्श्वभूमीवर नगर परिषद रिसोड प्रशासनाच्या वतीने शहरातील नागरिकांना घरगुती श्री गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करून पर्यावरण संवर्धनास हातभार लावण्याचे जाहीर आवाहन करण्यात आले आहे. 'माझी वसुंधरा अभियान' आणि 'स्वच्छ सर्वेक्षण २०२६' अंतर्गत जलप्रदूषण रोखण्यासाठी नगर परिषदेने हा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे.

घरगुती गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी (Risod Municipal Council) नगर परिषद प्रांगण, रिसोड येथे सुसज्ज कृत्रिम विसर्जन तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे. विसर्जनाच्या वेळी मूर्तीसोबत येणारे हार, फुले, पत्री इत्यादी पूजा साहित्य थेट पाण्यात न टाकता त्याचे योग्य व्यवस्थापन व्हावे, यासाठी विसर्जन ठिकाणी स्वतंत्र 'निर्माल्य कलश'



ठेवण्यात आले आहेत. संकलित निर्माल्यापासून सेंद्रिय खत तयार केले जाणार आहे. विसर्जनस्थळी भाविकांच्या सोयीसाठी प्रकाश व्यवस्था, स्वच्छता आणि आवश्यक कर्मचारी तैनात ठेवण्यात येणार आहेत. गणरायाला (Ganeshotsav) भावपूर्ण निरोप देताना निसर्गाचे रक्षण करणे हे प्रत्येक सुजाण नागरिकाचे कर्तव्य आहे. त्यामुळे प्लास्टर ऑफ पॅरिस (POP) आणि रासायनिक रंगांमुळे होणारे जलप्रदूषण टाळण्यासाठी भाविकांनी आपल्या लाडक्या बाप्पाचे विसर्जन नगर परिषदेने तयार केलेल्या कृत्रिम तलावातच करावे, तसेच निर्माल्याचे पावित्र्य राखण्यासाठी ते निर्माल्य कलशातच टाकावे.

# स्वच्छता ही सेवा अभियान २०२६ अंतर्गत वाशिम येथे स्वच्छता, आरोग्य व शाश्वत ग्रामीण विकासावर जनजागृती

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अटारी, पुणे यांच्या संचालकांच्या निर्देशानुसार कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथे 'स्वच्छता ही सेवा अभियान २०२६' अंतर्गत 'स्वच्छतेत सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत' या संकल्पनेवर आधारित विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमामध्ये वैज्ञानिक पद्धतीने कचरा व्यवस्थापन, स्वच्छता व आरोग्यविषयक सवयी, जैविक व अजैविक कचऱ्याची योग्य विल्हेवाट, संसाधनांचे पुनर्वापर तसेच स्वच्छ व निरोगी ग्रामीण परिसंस्था याबाबत भागधारकांमध्ये जनजागृती करण्यात आली.



स्वच्छता अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सामूहिक सहभाग व सकारात्मक वर्तनात्मक बदलाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. डॉ. रवींद्र काळे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांनी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत ग्रामीण विकासामध्ये कृषी विज्ञान केंद्रांची भूमिका स्पष्ट केली. स्वच्छ परिसर, शास्त्रीय कचरा व्यवस्थापन आणि आरोग्यदायी जीवनशैली या सुदृढ व सक्षम ग्रामीण समुदायाच्या मूलभूत गरजा असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. डी. एन. इंगोले, विषय विशेषज्ञ (कृषी अर्थशास्त्र) यांनी कृषी व घरगुती कचऱ्याचा कार्यक्षम पुनर्वापर, कंपोस्ट निर्मिती, मूल्यवर्धन आणि 'कचऱ्यातून संपत्ती' या संकल्पनेद्वारे उत्पन्ननिर्मितीच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. मयूर देशमुख, विषय विशेषज्ञ (पशुविज्ञान) यांनी पशुधनातील कचऱ्याचे शास्त्रीय व्यवस्थापन, स्वच्छ पशुगृहे तसेच शेण व कृषी अवशेषांचा कंपोस्ट व सेंद्रिय निविष्ठा निर्मितीसाठी वापर करून संसाधनांचे पुनर्चक्रीकरण व शाश्वत कृषी विकास साधण्याबाबत मार्गदर्शन केले. शुभांगी वाटाणे, गृहविज्ञान विषय विशेषज्ञ यांनी घरगुती स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता, सुरक्षित अन्न हाताळणी, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि आरोग्यदायी गृहपरिसर याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्रातील अधिकारी, कर्मचारी व संबंधित भागधारकांचा सक्रिय सहभाग लाभला.

### हिंदू संस्कृतीचे जतन करणाऱ्या गणेश मंडळांचा सन्मान

■ प्रतिनिधी | अकोला ■

राजराजेश्वर नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अकोला शहरात गणेशोत्सवाची परंपरा स्वातंत्र्यपूर्व काळापासून अविरतपणे सुरू आहे. या परंपरेचे जतन करत अनेक गणेशोत्सव मंडळे देव, धर्म आणि राष्ट्र संवर्धनाचे कार्य निष्ठेने पार पाडत आहेत.

अशा मंडळांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने संस्कृती संवर्धन समिती, अकोला तर्फे दरवर्षी ऐतिहासिक गणेश मंडळांचा सन्मान करण्यात येतो.यंदा समितीने शहरातील तीन मानाच्या आणि ऐतिहासिक गणेश मंडळांची निवड करून त्यांचा गौरव केला.

# मराठा समाज सेवा मंडळाचा गुणगौरव सोहळा उत्साहात




■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक पवन मंगल कार्यालयामध्ये मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने रविवार २० सप्टेंबर रोजी आयोजित गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी मराठा समाजातील सामाजिक, व्यावसायिक, शासकीय सेवेतील अधिकारी, कर्मचारी व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, ट्राफी, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.भाऊसाहेब काळे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार भावनाताई गवळी, माजी जिल्हा परिषद सदस्य पांडूरंग ठाकरे , वाशीम बाजार समितीचे सभापती महादेवराव काकडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चक्रधर गोटे, डॉ. नारायणराव गोटे, डॉ. गोविंद महाकाळ, माजी बांधकाम सभापती सुरेश मापारी, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नारायणराव काळबांडे, अकोला येथील मराठा समाज विकास मंडळाचे कार्याध्यक्ष सहदेवराव शिंदे, नारायणराव बारड, संतोष तांगडे, विठ्ठलराव आरू, घनशाम आरू, जीवन बोरकर, मराठा सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष तान्हाजी कव्हर, उपाध्यक्ष डॉ. दिपक शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर मराठा समाजातील विविध क्षेत्रात दिर्घकाळ व उत्कृष्ट सेवा दिल्याबद्दल ज्येष्ठ नागरिक तथा महिलांचा सत्कार करण्यात आला. तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे विद्यार्थी व शासनाच्या विविध विभागात महत्वाच्या पदावर निवड झालेल्या कर्मचाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# पर्यावरण संवर्धनाचा संदेश अन् १५०० महिलांच्या अथर्वशीर्ष पठणाने भक्तीचा जागर



■ प्रतिनिधी | वाशिम ■

भक्तीला सामाजिक बांधिलकीची जोड, परंपरेला आधुनिकतेची सांगड आणि गणेशोत्सवाला पर्यावरण संवर्धनाची दिशा देत मंत्री पार्क गणेशोत्सव मंडळाचा यंदाचा गणेशोत्सव विविध उपक्रमांनी भक्तिमय आणि समाजोपयोगी ठरत आहे. मागील १६ वर्षांपासून सुरू असलेल्या या परंपरेत यंदाही शाडू मातीपासून साकारलेली तब्बल सात फूट उंचीची, जिल्ह्यातील सर्वात मोठी मूर्ती असल्याचा मंडळाचा दावा असून, गणरायाची दिव्य राजसभा आणि हिंदू संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या विविध प्रतीकांनी सजलेला देखावा भाविकांचे आकर्षण ठरत आहे.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची परंपरा जपत मंडळाकडून शाडू मातीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने दरवर्षी शाडू मातीची मूर्ती निर्मिती कार्यशाळा आयोजित केली जाते. यंदा शहरासह ग्रामीण भागातील ६०० हून अधिक शालेय विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मितीचा अनुभव घेतला. गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश अधिक व्यापक करण्यासाठी मंडळाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

गणरायाच्या भव्य आगमन सोहळ्यात ध्वनिप्रदूषणाला फाटा देत डीजेच्या तालावर होणारी उधळपट्टी टाळण्यात आली. त्याऐवजी ढोल, ताशे, मृदंग, टाळ, वीणा यांसारख्या पारंपरिक वाद्यांच्या मंगलमय निनादात गणरायाचे आगमन करण्यात आले. त्यामुळे भारतीय संस्कृती आणि पारंपरिक वारशाचे दर्शन घडले.

# गणेश मंडळांसमोर पथनाट्यातून कायद्याचा जागर

### पोक्सो, बालविवाह प्रतिबंधक कायदा अन् लोकअदालतीची जनजागृती; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ प्रतिनिधी | वाशिम ■

गणेशोत्सवाच्या उत्साहात कायद्याची जनजागृती करण्याचा उपक्रम वाशिम जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने हाती घेतला आहे. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या कॉमन मिनिमम प्रोग्रामअंतर्गत विविध गणेशोत्सव मंडळांसमोर पथनाट्य सादर करून पोक्सो कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि आगामी १२ डिसेंबर रोजी होणाऱ्या लोकअदालतीची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविली जात आहे. या पथनाट्यांना गणेश मंडळ परिसरात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

कायद्याची माहिती पुस्तकी स्वरूपात देण्याऐवजी मनोरंजनातून ती नागरिकांपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. बालकांचे लैंगिक शोषण रोखण्यासाठी पोक्सो कायद्यातील तरतुदी, बालविवाह प्रतिबंधक कायद्याचे महत्त्व तसेच



लोकअदालतीच्या माध्यमातून वाद सामोपचाराने निकाली काढण्याची प्रक्रिया याबाबत पथनाट्यातून प्रभावीपणे संदेश दिला जात आहे.

या उपक्रमाची सुरुवात १६ सप्टेंबर रोजी देवपेठ येथील महाराष्ट्र गणेशोत्सव मंडळापासून झाली. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी मंत्री पार्क येथील मंत्री पार्क गणेशोत्सव मंडळ, १८ सप्टेंबर रोजी वाशिम तालुक्यातील कोंडाळा झामरे येथील राधाकृष्ण गणेशोत्सव मंडळ आणि १९ सप्टेंबर रोजी आडोळी येथील छत्रपती गणेशोत्सव मंडळासमोर पथनाट्य सादर करण्यात येत आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अनिल सुब्रमण्यम आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव विठ्ठल चौखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. पथनाट्यात विधी स्वयंसेवक सुशील भिमजियाणी, राजकुमार पडघाण, शाहीर उत्तम ओंकार इंगोले, मोतीराम खडसे, माधव डोंगरदिवे, प्रभू कांबळे, शीतल बन्सोड, संध्या सभादिंडे आणि माधव कोंडुजी गायकवाड यांनी भूमिका साकारल्या आहेत. 'जागर पोक्सो कायद्याचा' हे पथनाट्य उपमुख्य लोक अभिरक्षक ॲड. राजेश विसपुते यांनी लिहून दिग्दर्शित केले आहे. बालविवाह प्रतिबंध आणि लोकअदालतीवर आधारित पथनाट्य निवृत्ती सरकटे यांनी लिहून दिग्दर्शित केले आहे. विविध गणेशोत्सव मंडळांच्या परिसरात सादर होत असलेल्या या पथनाट्यांमुळे नागरिकांचे लक्ष वेधले जात असून, कायद्याची माहिती सहज आणि प्रभावी पद्धतीने नागरिकांपर्यंत पोहोचत आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २९९ ■ शुक्रवार, २५ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## दुष्काळाबाबत मदतीचा आदेश उद्याच काढणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**अमरावती जनमाध्यम :** अमरावती विभागात सर्व जिल्ह्यात दुष्काळाची झळ पोहचली आहे. यामुळे पिके संकटात आली आहेत. शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून या भागाचा दौरा केला आहे. शेतकऱ्यांना तातडीने मदत व्हावी, यासाठी दुष्काळाच्या संहितेच्या ट्रिगर एक नुसार देण्यात येणाऱ्या मदतीचा आदेश उद्याच काढण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

वाशिम येथील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा केल्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिय येरेकर, वाशिमचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्यासमवेत अमरावती विमानतळ येथे चर्चा केली. त्यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांना दुष्काळाची मदत करण्यासाठी केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य शासनाकडून तातडीने मदत देण्यात येईल. तसेच केंद्राच्या मदतीसाठी आवश्यक असणारे पंचनामे आदी प्रक्रिया करून मदतीसाठी प्रस्ताव पाठवण्यात येईल.



शेतकऱ्यांना मदतीचा आदेश तातडीने काढणे गरजेचे आहे. यातून काही भाग वगळला गेलेला असण्याची शक्यता असल्याने तिसऱ्या ट्रिगरमध्ये वगळलेल्या भागाचा समावेश करण्यात येईल. सर्वच भागात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ असल्याने मदतीची कारवाई करण्यात येणार आहे.

येत्या काळात चाराटंचाई, पाणीटंचाईबाबत उपाययोजना करून अन्नधान्याचीही मदत करावी लागणार आहे. शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या शिक्षणामध्ये खंड पडू नये, यासाठी थेट मदत करण्यात येईल रब्बीमध्ये काही ठिकाणी उपलब्ध असलेल्या पाण्यावर पिके घेण्याबाबत तपासणी करण्यात येईल. तसेच रब्बी पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल.तसेच, रोजगार उपलब्ध होण्यासाठी जलसंधारणाच्या कामावर भर देण्यात येईल. जलसाठे आटलेले असल्यामुळे यातील गाळ काढणे, जलतारा स्ट्रक्चर निर्माण करणे, दुरुस्ती करणे आवश्यक असलेले तलाव शोधून त्यांची दुरुस्ती करण्यात येईल. सर्वदूर पिकांची परिस्थिती सारखीच असल्यामुळे राज्य शासनाने मदतीचे धोरण आखले आहे. शेतकऱ्यांना करण्यात येणारी ही मदत दिवाळीपूर्वी मिळेल, याचे नियोजन केले जाईल. राज्य शासनाने कर्जमाफी केली असून कर्जाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे. कर्जमाफी मिळालेल्या शेतकऱ्यांना बँकांना नियमाप्रमाणे कर्ज द्यावेच लागेल. त्यासोबतच शेतमालाची शासकीय दराने खरेदी केली जाईल. यासाठी लवकरच नोंदणी सुरू केली जाईल.

जिल्हा शासकीय रुग्णालयात लागलेल्या आगीचा अहवाल सार्वजनिक केला जाणार आहे. अहवालावरून राजकारण होऊ नये म्हणून हा अहवाल सार्वजनिक केला नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## वर्धा जिल्हा मध्यवर्ती बँकेवर राज्य सहकारी बँकेचा प्राधिकृत अधिकारी नेमा

### पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी

**वर्धा जनमाध्यम :** आर्थिक अडचणीतून सावरत असलेल्या वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रशासकीय आणि आर्थिक कारभाराला सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करावी, अशी मागणी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात डॉ. भोयर यांनी २१ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र देऊन बँकेच्या सद्यस्थितीकडे लक्ष वेधले. वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना २१ ऑक्टोबर १९१२ रोजी झाली असून बँकेला ११४ वर्षांचा प्रदीर्घ इतिहास आहे. मात्र २००२ पासून बँक आर्थिक अडचणीत आली. त्यानंतर २०१४ मध्ये बँकेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली असून तेव्हापासून प्रशासकाच्या माध्यमातून बँकेचा कारभार सुरू आहे.

बँकेच्या आर्थिक संकटामुळे जिल्ह्यातील हजारो शेतकरी, शेतमजूर, नोकरदार, व्यापारी आणि कष्टकऱ्यांची रक्कम अडकली होती. बँकेला आर्थिक बळ देऊन बँकिंग परवाना पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाकडे मागणी करण्यात आली होती.



त्याची दखल घेत केंद्र शासनाकडून २२.१७ कोटी रुपये तर राज्य शासनाकडून १३९ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले. त्यामुळे बँकेचा बँकिंग परवाना पुनर्जीवित झाला.

बँकेला सक्षम करण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत असल्या तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ प्रशासकाची आवश्यकता असल्याचे डॉ. भोयर यांनी पत्रात नमूद केले आहे.

**नागपूरच्या धर्तीवर नियुक्तीची मागणी**

नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर मार्च २०२५ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवरही महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याबाबत संबंधित विभागाला निर्देश द्यावेत, अशी मागणी डॉ. भोयर यांनी केली आहे.

दरम्यान, पालकमंत्र्यांच्या मागणीची मुख्यमंत्री फडणवीस यांनी गांभीर्याने दखल घेत सहकार विभागाच्या प्रधान सचिवांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पुढील प्रशासकीय आणि आर्थिक वाटचालीकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## देवळीत सुरक्षा रक्षक भरतीला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### पहिल्याच दिवशी ५३ युवक सहभागी; २६ जणांची निवड

**देवळी जनमाध्यम :** स्थानिक युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी देवळी येथे सुरक्षा रक्षक भरती प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. शिव स्वराज्य सेक्युरिटी अँड मॅन पॉवर सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड आणि एस.एस.एन.जे. महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलच्या संयुक्त विद्यमाने ही भरती आयोजित करण्यात आली आहे.



२१ ते २५ सप्टेंबरदरम्यान सुरू असलेल्या या प्रक्रियेला पहिल्याच दिवशी युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण ५३ युवकांनी भरती प्रक्रियेत सहभाग घेतला. त्यापैकी २६ युवकांची निवड करण्यात आली असून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

निवड झालेल्या उमेदवारांना पुढील २० दिवसांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना सुरक्षा क्षेत्रात रोजगाराची संधी मिळणार आहे.

एस.एस.एन.जे. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनीता सोनारे आणि प्रा. डॉ. रफिक शेख यांच्या हस्ते निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी भरती अधिकारी गोरख जगताप आणि चंद्रशेखर उपस्थित होते.

भरती प्रक्रिया २५ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार असून स्थानिक युवकांनी या रोजगार संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## हिंगणघाटच्या भार्गवीचे डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार

### राजश्री मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएससाठी निवड

**हिंगणघाट जनमाध्यम :** हिंगणघाट येथील ओमप्रशांत काटेखाये व योगिता काटेखाये यांची कन्या तथा नूतन भारत शिक्षण संस्था वडनेरचे अध्यक्ष कृष्णाजी महाजन आणि सचिव संगीता महाजन यांची नात कु.भार्गवी ओमप्रशांत काटेखाये हिची राजश्री मेडिकल कॉलेज बरेली येथे एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.



लहानपणापासून डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगलेल्या भार्गवीने अथक परिश्रम चिकाटी आणि जिद्दीच्या बळावर हे यश मिळविले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीने काटेखाये व महाजन परिवाराचा आनंद द्विगुणित झाला आहे.

भार्गवीच्या यशाबद्दल नूतन भारत शिक्षण संस्था परिवारासह हिंगणघाट येथील नागरिक नातेवाईक आणि मित्रपरिवाराने तिचे अभिनंदन केले आहे. वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात उज्ज्वल वाटचाल करून समाजसेवेचा आदर्श निर्माण करावा अशा शुभेच्छाही तिला देण्यात आल्या.

## नदी स्वच्छतेची चळवळ उभी राहणे काळाची गरज

### वर्धा नदी परिसर स्वच्छ करून रासेयो दिन साजरा

**कोटेश्वर जनमाध्यम :** नद्या म्हणजे केवळ पाण्याचे स्त्रोत नव्हेत तर समाजाच्या जीवनवाहिन्या आहेत. मात्र धार्मिक श्रद्धेच्या नावाखाली नदीत कचरा, निर्माल्य आणि पूजेचे साहित्य टाकले जात असल्याने जलस्त्रोतांचे प्रदूषण वाढत आहे. ही स्थिती बदलण्यासाठी नदी परिसर स्वच्छ ठेवणे ही नागरी चळवळ झाली पाहिजे, असे प्रतिपादन कोटेश्वर देवस्थानचे अध्यक्ष वीरेंद्र देशपांडे यांनी केले.



जागतिक नदी दिवस आणि राष्ट्रीय सेवा योजना दिवसानिमित्त कोटेश्वर येथे वर्धा नदी परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या अभियानात नदीकाठावरील मोठ्या प्रमाणातील कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. यावेळी एनसीसी छात्र सैनिकांनी नशामुक्तीचा संदेश देणारे पथनाट्य सादर केले. तर रासेयो स्वयंसेवकांनी नदी परिसर स्वच्छतेबाबत जनजागृती केली. कॅप्टन मोहन गुजरकर यांनी नद्या स्वच्छ राहिल्या तरच भविष्यातील पाण्याचे स्त्रोत टिकतील, असे सांगत युवकांनी स्वयंस्फूर्तीने जनजागृती करण्याचे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. सुनिता सोनारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला विलास कामडी, प्रल्हाद खुजे, पत्रकार गणेश शेंडे, संतोष तुरक, प्रा. जगदीश यावले, प्रा. वंदना मुनेश्वर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सांगता नदी परिसर स्वच्छ ठेवण्याची सामूहिक शपथ घेऊन झाली.

## २० वर्षांच्या न्याय लढ्याला अखेर यश

### नऊ शिक्षक कर्मचाऱ्यांना न्यायालयाचा दिलासा

**समुद्रपूर जनमाध्यम :** नियमबाह्य नियुक्तीचा ठपका ठेवून सेवा समाप्त करण्यात आलेल्या सरस्वती विद्यालय धोंडगाव येथील नऊ शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना तब्बल २० वर्षांच्या प्रदीर्घ न्याय लढ्यानंतर अखेर न्याय मिळाला आहे. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पदावर पूर्ववत रुजू करून घेण्याचे तसेच सेवा समाप्तीपासूनचे १०० टक्के थकीत वेतन देण्याचे निर्देश दिल्याची माहिती प्रजासत्ताक शिक्षक कर्मचारी संघाचे अध्यक्ष अरुणकुमार हर्षबोधी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

सरस्वती ग्रामीण शिक्षण संस्था बोडखा आणि पाईकमारीच्या वतीने संचालित सरस्वती विद्यालय धोंडगाव येथील मुख्याध्यापक ईश्वर कनारकर, शिक्षक महेंद्र मून, मोरेश्वर पोहदरे, विलास चावट, लिपिक चंद्रकांत दरणे, प्रयोगशाळा परिचर सुधाकर थुटे तसेच शिपाई सुधाकर चौधरी, प्रकाश चौधरी आणि बबलू वटे यांच्या नियुक्त्यांवर तत्कालीन शिक्षणाधिकारी माध्यमिक राम पवार यांनी आक्षेप घेतला होता. शाळा समितीमार्फत नियुक्त्या नियमबाह्य झाल्याचे नमूद करून २००६ मध्ये त्यांच्या मान्यता रद्द करण्यात आल्या. त्यानंतर शाळा व्यवस्थापनाने सर्वांची सेवा समाप्त करून त्यांच्या पदांवर नवीन कर्मचारी नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू केली.

**सेवेत पुनर्नियुक्तीसह १०० टक्के थकीत वेतनाचे आदेश**

या निर्णयाविरोधात कर्मचाऱ्यांनी शाळा न्यायाधिकरण आणि उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. मात्र योग्य न्यायिक मार्गाने जाण्याचे निर्देश मिळाल्यानंतर प्रजासत्ताक कर्मचारी शिक्षक संघाच्या माध्यमातून आंदोलनाची धार तीव्र करण्यात आली. निवेदने, निदर्शने आणि बेमुदत उपोषणाच्या माध्यमातून न्यायासाठी संघर्ष सुरू राहिला.

दरम्यान चार सदस्यीय समितीने चौकशी करून ३१ मे २०१० रोजी तत्कालीन शिक्षण उपसंचालक नागपूर यांच्यामार्फत शासनाला अहवाल सादर केला. या अहवालात शिक्षणाधिकारी आणि शाळा व्यवस्थापनाच्या गैरकारभारामुळे परिस्थिती निर्माण झाल्याचे नमूद करत कर्मचाऱ्यांचा कोणताही दोष नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यांना मूळ पदावर पूर्ववत रुजू करून घेण्याची शिफारस करण्यात आली.

यानंतर शिक्षण सहसचिवांच्या निर्देशानुसार १३ ऑक्टोबर २०१० रोजी कर्मचाऱ्यांना पूर्ववत सेवेत घेण्याचे आदेश देण्यात आले. आदेशाचे पालन न केल्यास शाळेची मान्यता रद्द करण्याचा इशाराही देण्यात आला होता. मात्र शाळा व्यवस्थापनाने या आदेशालाही आव्हान दिले. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी २०१७ मध्ये पुन्हा उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली.

१८ ऑगस्ट रोजी अंतिम सुनावणी झाल्यानंतर न्यायमूर्ती प्रवीण पाटील यांनी २१ सप्टेंबर रोजी निर्णय दिला. त्यानुसार नऊही कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पदावर पूर्ववत रुजू करून घेण्यासोबत सेवासमाप्तीच्या कालावधीतील १०० टक्के थकीत वेतन देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना नियमानुसार सर्व सेवानिवृत्ती लाभ देण्याच्या सूचनाही करण्यात आल्या आहेत. तब्बल दोन दशकांच्या संघर्षानंतर मिळालेला हा निर्णय कर्मचाऱ्यांसाठी मोठा दिलासा ठरला आहे.


### सुट्टीची सूचना

आज शुक्रवार दि. २५ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी निमित्त दै. जनमाध्यम कार्यालयाला सुट्टी असल्याने उद्या दि, २६ सप्टेंबर रोजी अंक प्रकाशित होणार नाही. याची नोंद एजंट, जाहिरातदार आणि वाचकांनी घ्यावी.

\- **व्यवस्थापक**


## दारू विक्रीचा अड्डा चालविणारे दोघे दीड वर्षांसाठी तडीपार

**सेलू जनमाध्यम :** अवैध दारू विक्री सुरूच ठेवणाऱ्या दोन सराईत दारू विक्रेत्यांवर पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. बॉबी संजय खोडे रा. विकास चौक सेलू आणि धिरज सदाशिव ओंकार रा. कोथीवाडा ता. सेलू या दोघांना वर्धा जिल्ह्यातून एक वर्ष सहा महिन्यांसाठी तडीपार करण्यात आले आहे. सेलू पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोघेही अवैधरीत्या दारू विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळत होती. त्यानुसार पोलिसांनी वेळोवेळी छापे टाकून त्यांच्याविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये कारवाई केली. मात्र, कारवाईनंतरही त्यांच्या वर्तणुकीत सुधारणा झाली नाही. अवैध दारू विक्रीचा व्यवसाय सुरूच ठेवल्याने पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध तडीपारीचा प्रस्ताव सादर केला होता.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी २२ सप्टेंबर २०२६ रोजी आदेश जारी करून दोघांना एक वर्ष सहा महिन्यांसाठी वर्धा जिल्ह्यातून तडीपार केले. आगामी सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर अवैध दारू विक्रीला आळा घालण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महाडिक आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सेलूचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तथा ठाणेदार पंकज वाघोडे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे दिनेश कस्तुके आणि सेलू पोलिस ठाण्याचे ज्ञानदेव वनवे यांनी कारवाईत सहभाग घेतला.

## नैसर्गिक शेतीची हाक; विषमुक्त अन्नासाठी वर्ध्यात महा कार्यशाळा

### पद्मश्री सुभाष शर्मा करणार शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**वर्धा जनमाध्यम :** रासायनिक खतांच्या आणि कीटकनाशकांच्या वाढत्या वापरामुळे जमिनीची सुपीकता धोक्यात आली असताना शेतकऱ्यांना पुन्हा निसर्गाच्या वाटेवर नेण्याचा प्रयत्न वर्ध्यात होणार आहे. विषमुक्त अन्न आणि समृद्ध शेतकरी या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून २६ सप्टेंबरला एकदिवसीय नैसर्गिक शेती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

रोटरी क्लब गांधी सिटी वर्धा, प्रकल्प संचालक आत्मा आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने सेवाग्राम रोडवरील चरखा घर येथे सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत ही कार्यशाळा होणार आहे. पालकमंत्री तथा राज्याचे राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे.

पद्मश्री सुभाष शर्मा हे नैसर्गिक शेतीविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. टू ब्रदर्स फार्मचे संचालक सत्यजीत हे आधुनिक कृषी व्यवस्थापनाचे अनुभव मांडतील. आश्रय किसान संस्थेतर्फे औषधी व आयुर्वेदिक वनस्पती लागवडीबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

याशिवाय जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून शासनाच्या रोजगाराभिमुख योजनांची माहिती दिली जाणार आहे. शेतीला उद्योगाची जोड देत शेतकऱ्यांना आत्मनिर्भरतेकडे नेण्याचा या कार्यशाळेचा प्रयत्न आहे. रोटरी क्लबचे अध्यक्ष संदीप कदम, सचिव यशवंत देशपांडे आणि संजय मानमोड़े यांनी शेतकरी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## सेवा संकल्प अभियानांतर्गत आज जिल्हाभर अवयवदान शिबिर

### जिल्हाधिकारी व सीईओंच्या उपस्थितीत होणार शुभारंभ

**शासकीय रुग्णालये, जिल्हा व तालुकास्तरावर आयोजन**

**वर्धा जनमाध्यम :** सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय योजना, सेवांचा लाभ उपलब्ध करून देण्यासोबतच योजनांची जनजागृती करण्यासाठी सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. अभियानांतर्गत एकाच दिवशी दि.२५ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाभर अवयवदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी वान्मथी सी व मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या उपस्थितीत या उपक्रमाचा जिल्हास्तरीय शुभारंभ होईल.

सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध विभागांच्यावतीने विविध लोककल्याणकारी उपक्रम राबविण्यात येत आहे. अभियानात विविध सामाजिक उपक्रमांची देखील जोड देण्यात आली आहे. त्यानुसार या अवयवदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. मृत्यूनंतर अवयवांचे दान केल्यास अनेक गरजूंना ते उपयोगी पडू शकतात. मागणीच्या तुलनेत अवयव कमी उपलब्ध होत असल्याने प्रत्येक गरजू व्यक्तीस अवयव उपलब्ध होत नाही. सामाजिक भावनेतून अवयवदान केल्यास मृत्यूनंतर अनेकांना दिलासा देण्याचे पुण्य प्राप्त होऊ शकते.

दि.२५ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात अवयवदान उपक्रमाचा शुभारंभ होईल.

जिल्ह्यातील सर्व जिल्हास्तरीय, तालुका स्तरावरील सर्व तालुका व उपविभागीय कार्यालयांसह जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर अवयवदानासाठी संमतीपत्र भरून घेण्यात येणार आहे.

या शिबिरांमध्ये सर्व शासकीय, निमशासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच सामान्य नागरिक आपल्या अवयवदानाचे संमती पत्र भरून या सामाजिक उपक्रमात सहभागी होऊ शकतील. जिल्ह्यात जास्तीत जास्त संमतीपत्र भरून घेण्याचा प्रयत्न आहे. अवयवदान ऐच्छिक असले तरी नागरिकांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे व अवयवदानाचे संमतीपत्र भरून द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## दिवाळीनंतर राज्य मंत्रिमंडळात फेरबदल?; अकार्यक्षम मंत्र्यांना डच्चू मिळणार

**जळगाव /प्रतिनिधी-**महायुती सरकारमध्ये मंत्रिमंडळ फेरबदलाची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. शिवसेनेचे आमदार बच्चू कडू यांनी दिवाळीच्या काळात



किंवा दिवाळीनंतर राज्य मंत्रिमंडळात मोठा फेरबदल होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. सरकार स्थापनेच्या वेळी मुख्यमंत्र्यांनी अडीच-अडीच वर्षांचा शब्द दिला होता आणि आता त्याची वेळ आली असल्याचे कडू यांनी म्हटले.जळगाव दौ-यावर असताना प्रसारमाध्यमांशी बोलताना कडू यांनी मंत्रिमंडळ विस्ताराबाबत भाष्य केले. दिवाळीच्या काळात किंवा दिवाळी संपताच राज्यात मंत्रिमंडळ विस्तार आणि मोठा फेरबदल होण्याची दाट शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. सत्तावाटपाच्या वेळी मुख्यमंत्र्यांनी अडीच-अडीच वर्षांचा शब्द दिला होता, आता ती वेळ आली आहे, असा दावा त्यांनी केला. पाचोरा-भडगाव मतदारसंघाचे शिवसेनेचे आमदार किशोर पाटील यांना मंत्रिमंडळात स्थान देण्याची मागणीही कडू यांनी केली. पाटील हे सलग तीन वेळा आमदार झाले असून, त्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळावे, अशी मतदारसंघातील जनता आणि कार्यकर्त्यांची अपेक्षा असल्याचे कडू म्हणाले.

## कंपनीतील भिंत कोसळून 3 कामगारांचा मृत्यू


**पालघर / प्रतिनिधी-** एमआयडीसी असो किंवा इंडस्ट्रीज इस्टेट, येथील कंपन्यांमध्ये काम करत असताना कामगारांची सुरक्षा अतिशय महत्त्वाची



असते. कामगारांच्या सुरक्षेचे नियम पाळणे कंपनीला बंधनकारक असते. मात्र, तरीही कधी कधी अपघाताच्या घटना घडतात. पालघर जिल्ह्याच्या वाडा तालुक्यातील पाली पोशेरी येथील कंपनीत दुर्घटना घडली. कंपनीतील भिंत कोसळून तीन कामगारांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने कंपनी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, बार्शी तालुक्यातील वैराग येथे देखील दोन दिवसांपूर्वी घराची भिंत कोसळून २ महिलांचा मृत्यू झाला होता. पालघर जिल्ह्याच्या वाडा येथील पोशेरीत टीना रबर कारखान्यात अपघाताची दुर्घटना घडली असून मृतांमध्ये दोन महिला तर एका पुरु षाचा समावेश आहे. केशव गुणगुणा, रंजना कोंब आणि मीरा गवळी अशी मृत व्यक्तींची नावे आहेत. या घटनेनंतर वाडा पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून संबंधित घटनेचा तपास करत आहेत. मात्र, या दुर्घटनेमुळे, पालघर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रांमधील कारखान्यांमध्ये काम करणा-या कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## 'वेलकम' फेम मुश्ताक खान यांचे निधन; 56 व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**मुंबई/प्रतिनिधी :**हिंदी चित्रपटसृष्टीतून एक दुःखद बातमी समोर आली आहे. प्रसिद्ध अभिनेते मुश्ताक खान यांचे निधन झाले आहे. वेलकम आशिकी,



मुझसे शादी करोगे आणि हम हैं राही प्यार के यांसारख्या लोकप्रिय चित्रपटांमधून आपल्या अभिनयाची छाप पाडणा-या मुश्ताक खान यांनी वयाच्या ५६व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. मुश्ताक खान गेल्या जवळपास १५ दिवसांपासून मुंबईतील नानावटी रु ग्णालयात दाखल होते. ते कर्करोगाशी झुंज देत होते. सुमारे पाच वर्षांपूर्वी त्यांना कर्करोगाचे निदान झाले होते. मात्र, अलीकडेच हा आजार पुन्हा बळावला होता. त्यानंतर त्यांची प्रकृती सातत्याने खालावत गेली. मुश्ताक खान यांचे व्यावसायिक भागीदार शिवम यांनी आज तकशी बोलताना त्यांच्या निधनाची पुष्टी केली आहे. मुश्ताक खान यांच्या निधनाच्या बातमीने चित्रपटसृष्टीसह त्यांच्या चाहत्यांमध्ये शोककळा पसरली आहे. मुश्ताक खान यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीत प्रामुख्याने सहाय्यक आणि विनोदी भूमिका साकारू न स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. वेलकम चित्रपटातील त्यांचा अंदाज प्रेक्षकांना विशेष आवडला होता. याशिवाय आशिकी, मुझसे शादी करोगे आणि हम हैं राही प्यार के यांसारख्या चित्रपटांमध्येही त्यांनी आपल्या अभिनयाची छाप सोडली.

## 'तुझी जात काय हे कुणालाच विचारू नका'

**मुंबई/प्रतिनिधी :**आयआयटी मुंबईतल्या २२ वर्षीय साहिल वाकोडे या विद्यार्थ्याने आत्महत्या केली. या आत्महत्येनंतर राज्यभरात संताप व्यक्त होतो आहे आणि या घटनेची चर्चा देशभरात रंगली आहे. साहिलच्या आई वडिलांनी प्राध्यापक सूर्यनारायण डुल्ला यांच्यावरच आरोप केले आहेत. दुसरीकडे प्राध्यापक डुल्ला यांचा एक जुना ई मेल व्हायरल झाला आहे. या ई मेलमध्ये त्यांनी कुणाचीही जात समजेल असे प्रश्न कुणीही कुणाला विचारू नका यासंदर्भातलं आवाहन केलं आहे आणि विद्यार्थ्यांना तशा सूचनाही



दिल्या आहेत. सूर्यनारायण डुल्ला यांनी आयआयटीच्या विद्यार्थ्यांना एक ई मेल पाठवला होता. हा ई मेल त्यांनी विद्यार्थी व्यवहार विभागाचे डीन असताना पाठवला होता. एखाद्या विद्यार्थ्याची जात किंवा सामाजिक पार्श्वभूमी समजेल असे प्रश्न कुणीही कुणाला विचारू नका असं आवाहन डुल्ला यांनी या ई मेलमधून विद्यार्थ्यांना आणि सदस्यांना केलं होतं. या ई मेल मध्ये डुल्ला यांनी अशीही सूचना केली होती की, कुठल्याच विद्यार्थ्याने दुस-या सहका-याला, विद्यार्थ्याला, वर्गमित्राला ख्क्क्ष चा नंबर, GATE मध्ये मिळालेले गुण अशी माहिती विचारु नये. तसंच जात किंवा सामाजिक पार्श्वभूमी याबाबतही मुळीच प्रश्न विचारू नयेत ही विशेष सूचना डुल्ला यांनी केली होती.

**IIT चे प्राध्यापक सूर्यनारायण डुल्लांचा दोन वर्षांपूर्वीचा ई मेल व्हायरल**

**प्राध्यापक डुल्ला यांनी मुलांना पाठवलेला मेल व्हायरल-** प्राध्यापक सूर्यनारायण डुल्ला या मेलमध्ये म्हणाले होते, आयआयटी बाम्बे या ठिकाणी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्याला त्याची जात समजेल किंवा त्याची सामाजिक पार्श्वभूमी समजेल असं प्रश्न विचारणं योग्य नाही. तसं केल्यास मुद्दाम किंवा अजाणतेपणीही पक्षपात झाला की काय अशी भावना निर्माण होउ शकते. त्यामुळे जात समजेल असा संदर्भ विचारणं गैर आहे असंही त्यांनी म्हटलं होतं. आयआयटी बाम्बे ही अशी संस्था आहे जिथे सर्वसमावेशक वातावरण आहे. धर्म, जात, सामाजिक किंवा आर्थिक स्थिती हे माहीत न होता सगळे विद्यार्थी एकत्र येउ शकतात. संविधानातील आरक्षणाचं धोरण हे आपण शब्दशः अंमलात आणलं आहे. या आशायचा उल्लेखही डुल्ला यांनी केला होता. तसंच प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना समान संधी आहेत असंही त्यांनी म्हटलं होतं. सूर्यनारायण डुल्लांवर जातीयवाद केल्याचे आरोप होत आहेत. त्याच दरम्यान हा जुना मेल व्हायरल झाला आहे.

# ज्ञानेश कुमार हे सर्वात मोठे देशद्रोही

### ■ राजीनामा न दिल्यास देशव्यापी आंदोलन ■ सीजेपीच्या अभिजीत दिपकेंची घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :** काक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी आता निवडणूक आयोगाचे आयुक्तज्ञानेश कुमार यांच्यावर हल्लाबोल केला आहे. ज्ञानेश कुमार हे सर्वात मोठे देशद्रोही आहेत. त्यांनी तत्काळ राजीनामा द्यायला हवा. भारताच्या लोकशाहीला त्यांनी सर्वात मोठा धोका निर्माण केला आहे. ज्ञानेश कुमार निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त झाल्यानंतर ते ठरवत आहेत की, कोणी मतदान करायचे आणि कोणी करायचे नाही. ही लोकशाही आहे का? त्यांनी पूर्ण लोकशाही उलथवून लावली आहे, असा घणाघाती आरोप करत अभिजीत दिपके यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत देशव्यापी आंदोलनाची हाक दिली आहे.



**४८ तासांत राजीनामा न दिल्यास देशव्यापी आंदोलन**

पुढच्या ४८ तासांत ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा न दिल्यास काक्रोच जनता पार्टी देशव्यापी आंदोलन सुरू करेल. दिल्लीतून आम्ही या आंदोलनाची सुरूवात करू, अशी घोषणा अभिजीत दिपके यांनी केली.अभिजीत दिपके यांनी पुढे बोलताना मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी काय केले याची माहिती दिली. महाराष्ट्र, उत्तर प्रदेशमध्ये दोन कोटींहून अधिक मतदार हटवले आहेत. पश्चिम बंगालमधील ९० लाख लोकांना मतदान करू दिले नाही. दिल्लीत ४७ लाख मतदार वगळले जात आहे. केरळमध्ये २४ लाख, तमिळनाडूत ९७ लाख, कर्नाटकमध्ये १ कोटी, तेलंगणात ७३ लाख मतदार वगळले जात आहेत. सर्व राज्यांची आकडेवारी एकत्र केल्यास १३ कोटींहून अधिक मतदारांचा हक्का हिरावला जात आहे, असा आरोप अभिजीत दिपके यांनी केला.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत विरोधक आणि सत्ताधारी एनडीएमध्ये फक्त दोन टक्क्यांचा फरक होता. १३ कोटी मतदार वगळणे म्हणजे जवळपास १३ ते १४ टक्के मतदान कमी करणे. जर २०२४ च्या निवडणुकीत फक्त दोन टक्क्यांमुळे भाजपाचा पराभव होउ शकला असता, तर ज्ञानेश कुमार मुद्दामहून हे १३ टक्क्यांचे अंतर वाढवत आहेत का? असा सवाल अभिजीत दिपके यांनी उपस्थित केला.

**२०२४ नंतर अनेक मुख्यमंत्र्यांना हरविण्यात आले-**२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत प्रादेशिक पक्षांची एकजुट होत असल्याचे सरकारच्या लक्षात आले. त्यामुळे एक एक करून प्रादेशिक पक्षांच्या मुख्यमंत्र्यांना पराभूत केले गेले. हा योगायोग असू शकत नाही. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींच्या मतदारसंघात ५० हजार मते हटवली गेली, त्यांचा पराभव झाला, तमिळनाडूमध्ये एमके स्टॅलिन, दिल्लीत अरविंद केजरीवाल, केरळमध्ये पिनराई विजयन सत्तेतून पायउतार झाले. एसआयआरमधून तत्कालीन मुख्यमंत्र्यांना कमकुवत केले गेले का? असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला. विरोधकांशी किंवा कोणत्याही राजकीय पक्षाशी आमचे देणेघेणे नाही, असेही अभिजीत दिपके यांनी स्पष्ट केले. पण लोकशाहीमध्ये जर विरोधकांना संपवून टाकले तर ती लोकशाही उरेल का? २०१५ सालीदेखील मध्यप्रदेश, गोवा, कर्नाटकमध्ये रातोरात सरकार उलथवण्यात आले होते. आमदार, खासदार विकत घेउन भाजपाचे मन भरले नाही म्हणून प्रादेशिक पक्षांमध्ये फूट पाडली गेली. शिवसेना, तृणमूल काँग्रेस याचे उदाहरण आहे, असा आरोप आहे.

## ज्ञानेश कुमारांचा राजीनामा हवाच;

### राज ठाकरेंची थेट मागणी

**मुंबई /प्रतिनिधी-** भारताच्या निवडणूक आयोगातील अंतर्गत कामकाजाबाबत एका मोठ्या वृत्तपत्राने महत्त्वाची माहिती समोर आणली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील तीन सदस्यांच्या आयोगातील दोन निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी गेल्या १० महिन्यांत आयोगाच्या विविध निर्णयांवर किमान १४ वेळा लेखी आक्षेप नोंदवल्याचा दावा या वृत्तात करण्यात आला आहे.परंतु, आता या वृत्तानंतर मोठी खळबळ उडाली असून विरोधक आक्रमक झाले आहेत. अशातच आता या प्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांची सुद्धा प्रतिक्रिया समोर आली आहे. सोशल मीडियावर राज ठाकरेंनी भली मोठी पोस्ट करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासह सरकारच्याही राजीनाम्याची मागणी केली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुरु वारी (२४ सप्टेंबर) सोशल मीडिया प्लॅटफार्मवर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात मोठी पोस्ट केली आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे की, इंडियन एक्स्प्रेस वर्तमानपत्राच्या कालच्या मुख्य पानावर निवडणूक आयोगासंदर्भातल्या बातमीने देशांत खळबळ उडवून दिली आहे.

२०२५ च्या अखेरीस, महापालिका निवडणुकांच्या आधी जेव्हा महाराष्ट्रातील विरोधी पक्षांचे नेते आम्ही राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना आणि त्यांच्या सहका-यांना भेटायचो तेव्हाच लक्षात यायचे की



यांना कुठलेच अधिकार नाहीत. हे मी जाहीरपणे अनेकदा बोललो आहे, निवडणूक आयोगाच्या कारभारावर मी आणि माझ्या पक्षाने उघडउघड शंका म्हणा, आरोप म्हणा काहीही म्हणा, पण ते आम्ही केलेत. आम्ही जे बोलत होतो त्याची सत्यता या बातमीत तुम्हाला सापडेल, असे त्यांनी पोस्टच्या सुरु वातीला म्हटले आहे.राज्य निवडणूक आयोग सोडाच जिथे केंद्रीय निवडणूक आयोगातल्या २ आयुक्तांनाच गुंडाळून ठेवले आणि त्यांना अंधारात ठेवून किंवा त्यांच्या मताला अजिबात किंमत न देता जे निर्णय राबवले जात आहेत यावरू न एक गोष्ट स्वच्छ आहे, निवडणूक आयोग स्वायत्त असायला हवा हे आता पुस्तकापुरते मर्यादित आहे. स्वायत्ततेची व्याख्या भारतीय जनता पक्षाच्या अधीन अशी असेल तर तो स्वायत्त आहे, अन्यथा नाही. निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी जे आक्षेप नोंदवले आहेत ते गंभीर आहेत, ते नाकारणे मुख्य निवडणूक आयुक्तांना म्हणजेच ज्ञानेश कुमारांना शक्य नाही, त्यामुळे ते जे वागले यामागचा कर्ताकरविता नक्की कोण होता, आहे इतकं सांगितलं तरी पुरेसं आहे, अशी मागणी ठाकरेंनी केली. सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी या दोन निवडणूक आयुक्तांनी गेल्या १० महिन्यांत १४वेळा निवडणूक आयोगाच्या कारभारावर ऑन रेक?र्ड ताशेरे ओढले आणि तरीही ढिम्मपणे निवडणूक आयोगाला जे करायचं होतं तेच त्यांनी केलं. बरं मुळात सध्या निवडणूक आयोगात एकूण तीन आयुक्त आहेतः एक मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि दोन निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू व विवेक जोशी. यातल्या दोघांनी आक्षेप नोंदवलेत. याचा अर्थ मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे मनमानी करत निर्णय घेत होते असे चित्र समोर येते. पण खरं तर त्यांना ते निर्णय घ्यायला लावले जात होते. बरं हे १४ महिन्यांतले आक्षेप आहेत. ज्ञानेश कुमार यांची नियुक्तीच झाली फेब्रु वारी २०२५ ला म्हणजे आल्या आल्या त्यांनी त्यांच्या ब?सला खुश करायला सुरु वात केली, असेही ठाकरे म्हणाले.

## ज्ञानेश कुमार अमित शहांचे छोटा शकील;

### ■ संजय राउतांची जहरी टीका ■

**मुंबई/प्रतिनिधी :** निवडणूक आयोग आता राहिलेला नाही. मतभेद असणे म्हणजे देशातील १३ कोटी मतदारांची नावे हुकूमशाही पद्धतीने डिलीट करणे, असे होत नाही आणि डिलीट करण्याला दोन निवडणूक आयुक्तांनी विरोध केला आहे, हे सुद्धा लक्षात घेतले पाहिजे. जर आपण बहुमत, लोकशाही मानतो तर तिघांचा निवडणूक आयोग का बनवला. कारण, ज्या गोष्टीवर असहमती आहे, जी गोष्ट चुकीची आहे, त्याला



विरोध व्हावा आणि बहुमताने एखादी गोष्ट मंजूर व्हावी किंवा फेटाळली जावी, यासाठी तिघांचा आयोग बनवला, असे म्हणत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राउत यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर टीकास्त्र डागले आहे. यावेळी त्यांनी ज्ञानेश कुमार हे अमित शहांचे छोटा शकील असल्याचा जहरी टोला सुद्धा लगावला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राउत यांनी गुरु वारी (२४ सप्टेंबर) प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी म्हटले की, अशावेळेला जर दोन निवडणूक आयुक्त संधू आणि विवेक जोशी यांनी १० महिन्यांत १४ वेळा आक्षेप घेतले. फार्म ६ मध्ये जे आक्षेप घेतले त्यामध्ये त्यांनी पंजोबा, खापर पंजोबा विचारले, त्यांना माहीत आहेत का? त्यामुळे हे ज्ञानेश कुमार गृहमंत्री शहा यांचा छोटा शकील आहे. शार्पशूटर लेव्हलची माणसे निवडणूक आयोगावर बसवली आहेत, त्यानुसार ते लोकशाहीची हत्या करत आहेत. आधीचा झुकेगा नही वाला भारत कुठे आहे. अमित शहा पळाले आहेत कुठे तरी. त्यांना फूड प?यझनिंग झाले आहे सांगतात. काय खाल्लं काय माहीत. मला त्यांना काल पाहायला जायचे होते, कारण मी दिल्लीला होतो, पण त्यांनी त्यांना कोंडून घेतले आहे, कुठे तरी, असे म्हणत राउतांनी शहांवर टीका केली.

तर, एक लक्षात घेतले पाहिजे, की धर्मेंद्र प्रधान यांना सुद्धा राजीनामा देण्याची इच्छा नव्हती, त्यांचा राजीनामा घेणार नाही असे मोदी-शहा सांगत होते. मात्र काय झाले? संसदेवर लाखो झुरळं, जनता धडकली तेव्हा राजीनामा घ्यावा लागला. ज्ञानेश कुमार राजीनामा देणार नाहीत म्हणजे काय? आणि ते राजीनामा का देणार नाहीत. निवडणूक पद्धती, ती यंत्रणा भ्रष्ट करू न एक व्यक्ती म्हणते की राजीनामा देणार नाही. या माफियागिरीला संरक्षण देण्यासाठीच संसदेत एक बिल मंजूर केले.

## तुकाराम मुंढेंच्या कारवाईचे दिल्लीत पडसाद; ॲनालॉग पनीरबाबत FSSAI चा मोठा निर्णय!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली जुलै-ऑगस्टदरम्यान राज्यात पनीरच्या नावाखाली विकल्या जाणा-या ॲनालॉग किंवा दुग्धजन्य नसलेल्या पनीरच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर यापूर्वीच राज्य सरकारने एक वर्षासाठी बंदी घातली आहे. आता भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने बिगर-दुग्धजन्य पदार्थांपासून बनवलेल्या उत्पादनांवर पनीर हा शब्द वापरण्यास बंदी घालण्याचा महत्त्वाचा प्रस्ताव मांडला आहे. बाजारात मिळणारे पनीर खरोखरच दुधापासून बनले आहे की वनस्पती तेलापासून, यावरू न ग्राहकांची होणारी दिशाभूल आता थांबणार आहे.

सध्या बाजारात दुधाच्या ऐवजी वनस्पतीजन्य स्निग्ध पदार्थ , पाम तेल किंवा प्रोटीन्सचा वापर करू न ॲनालाग पनीर तयार केले जाते. हे पदार्थ दिसायला, चवीला आणि स्पर्शाला हुबेहूब अस्सल पनीरसारखेच असतात. त्यामुळे सामान्य ग्राहक अशा उत्पादनांनाच खरे दुधाचे पनीर समजून खरेदी करतात.हीच दिशाभूल रोखण्यासाठी FSSAI ने अन्न सुरक्षा आणि मानके (विक्रीवर बंदी आणि निर्बंध) दुरु स्ती नियमावली, २०२६ चा मसुदा २५ सप्टेंबर रोजी जारी केला आहे. या प्रस्तावानुसार, दुधाव्यतिरिक्त इतर घटकांपासून बनवलेल्या उत्पादनांच्या लेबलिंग, मार्केटिंग किंवा नावामध्ये पनीर शब्दाचा वापर पूर्णपणे वर्ज्य असेल.

**ॲनालाग पनीर म्हणजे काय?**

**अस्सल पनीरः** शुद्ध गाईचे किंवा म्हशीचे दूध उकळून, त्यात नैसर्गिक आम्ल (जसे लिंबू किंवा व्हिनेगर) टाकून चक्का वेगळा करू न बनवले जाते.



**ॲनालाग पनीर** (कृत्रिम पर्याय): यामध्ये दुधातील फॅट्स आणि प्रोटीन्सच्या ऐवजी वनस्पती तेल, पाम ऑइल किंवा सोया प्रोटीन्सचा वापर केला जातो.

**FSSAI चे स्पष्ट निर्देशः** डेअरी ॲनालाग श्रेणीअंतर्गत परवाना घेतलेल्या अन्न व्यावसायिकांना त्यांच्या उत्पादनांवर पनीर नाव वापरणे त्वरित बंद करावे लागेल. कृत्रिम किंवा बिगर-दुग्धजन्य पनीरच्या वाढत्या विक्रीमुळे अन्न सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. यापूर्वी जुलै-ऑगस्टदरम्यान महाराष्ट्रात ॲनालाग पनीरच्या उत्पादन, साठवणूक आणि विक्रीवर कडक निर्बंध लादण्यात आले होते. त्यानंतर गुजरातनेही ॲनालाग पनीर, चीज आणि बटरवर अशाच प्रकारचे निर्बंध जाहीर केले.

## हानिकारक वस्तूंचा प्रचार खपवून घेणार नाही

**मुंबई/प्रतिनिधी :** गुजरातमधील एकतानगर येथे आयोजित ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सिनेकलाकारांना हानिकारक उत्पादनांचा प्रचार न करण्याचे कळकळीचे आवाहन केले होते. राष्ट्रपतींच्या या भूमिकेचे जोरदार स्वागत करत आयुक्ततुकाराम मुंढे यांनी सेलिब्रिटींनी आपल्या सामाजिक जबाबदारीचे भान ठेवावे, लोकांच्या आरोग्याशी खेळणा-या, दिशाभूल करणा-या जाहिराती करणा-या सेलिब्रिटींना कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा सज्जड दम भरला आहे. २२ सप्टेंबर रोजी गुजरातमधील एकता नगर (केवडिया) येथे देशातील मानाच्या ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचे वितरण पार पडले. या सोहळ्यात बोलताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी चित्रपट विश्वाला आरसा दाखवणारी भूमिका मांडली. प्रसिद्ध कलाकारांमध्ये देशभरातील कोट्यवधी नागरिकांवर, विशेषतः नव्या पिढीवर आणि तरु णाईवर प्रभाव टाकण्याची मोठी ताकद असते. कलाकारांनी दिलेल्या संदेशांचे समाजात अंधानुकरण होते.जेव्हा कलाकार शिस्तबद्ध जीवनशैली आणि आरोग्याबाबत बोलतात, तेव्हा लाखो तरु ण त्यांच्यापासून प्रेरणा घेतात. त्यामुळे कलाकारांनी स्वतः आरोग्यास हानिकारक असलेल्या गोष्टींचे सेवन करू नये आणि अशा उत्पादनांची जाहिरात किंवा प्रचारही करू नये. जो समाजात प्रकाश पसरवतो तोच खरा स्टार असतो; अंधार पसरवणारा किंवा समाजाला चुकीच्या मार्गावर नेणारा कधीही खरा स्टार होउ शकत नाही, अशा शब्दांत राष्ट्रपतींनी सिनेसृष्टीला अंतर्मुख करणारा संदेश दिला.राष्ट्रपतींच्या आवाहनाचा व्हीडीओ अधिकृतरीत्या शेअर करत एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सेलिब्रिटींना त्यांची सामाजिक व कायदेशीर कर्तव्ये स्पष्टपणे अधोरेखित केली. हा अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा राष्ट्रीय मुद्दा जाहीरपणे उपस्थित केल्याबद्दल मी माननीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा मनापासून आभारी आहे. विविध उत्पादनांची जाहिरात करणा-या तथाकथित सेलिब्रिटींचा जनतेवर मोठा प्रभाव असतो. आपण आपल्या लोकप्रियतेचा वापर कायद्यापासून वाचण्यासाठी इम्युनिटी (संरक्षक कवच) म्हणून करणार आहोत की जबाबदारी म्हणून, हे या कलाकारांनी ठरवले पाहिजे. जर एखादे उत्पादन आरोग्याला घातक असेल, तर केवळ पैशांसाठी त्याचे समर्थन करणे चुकीचे आहे. लोकप्रियता कितीही मोठी असली तरी कोणीही कायद्यापेक्षा श्रेष्ठ नाही.

## 39 हजार कोटींच्या पॅकेजचे काय झाले?

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थिती आणि सत्ताधा-यांकडून सुरू असलेल्या पाहणी दौ-यांवरू न शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्य सरकारवर हल्लाबोल केला आहे.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे नुकतेच झालेले बांधावरचे दौरे आणि आश्वासने केवळ कॅमे-यापुरती मर्यादित असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली. तसेच, गेल्या वर्षी अतिवृष्टीच्या वेळी सरकारने जाहीर केलेल्या ३१ हजार कोटी रु पयांच्या पॅकेजचे नेमके काय झाले आणि त्यातील किती मदत प्रत्यक्ष शेतक-यांच्या पदरात पडली, याचा हिशेब देण्याची मागणी ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत केली.राज्य सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्र सातत्याने नैसर्गिक संकटांचा सामना करत आहे. गेल्यावर्षी मराठवाड्यात अतिवृष्टीने धुमाकूळ घातला होता, तेव्हा जमिनी खरडून गेल्या होत्या. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी ३१ हजार कोटींचे आतापर्यंतचे सर्वांत मोठे पॅकेज जाहीर केले होते. खरडून गेलेल्या जमिनीसाठी हेक्टरी साडेतीन लाख रु पये जाहीर केले होते. माझा सरकारला पहिला प्रश्न हाच आहे की, या ३१ हजार कोटींपैकी खरोखर किती मदत प्रत्यक्ष शेतक-याच्या हातात पोहोचली आहे, याची माहिती महाराष्ट्राला



मिळायला हवी, असा थेट सवाल त्यांनी विचारला.

**पूर्वसूचना असूनही सरकार झोपेत होते का?**

यावर्षी मोसमाच्या सुरु वातीलाच हवामान खात्याने आणि जागतिक संस्थांनी राज्यात दुष्काळ पडू शकतो, असा अंदाज वर्तवला होता. याकडे लक्ष वेधत ठाकरे यांनी सरकारच्या तयारीवर ताशेरे ओढले. दुष्काळाची शक्यता लक्षात घेउन सरकारने तेव्हापासून दुष्काळ निवारण्यासाठी नेमकी कोणती पावले उचलली? आज परिस्थिती अत्यंत भयंकर आहे. आता जोरदार पाउस जरी पडला तरी करपून गेलेल्या पिकांना कोंब फुटणार नाहीत. शेतक-यांच्या हातातून खरिपाचा हंगाम पूर्णपणे गेला असून त्यांच्यावर कर्जाचा डोंगर उभा राहिला आहे. निदान जनावरांच्या चा-याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटावा आणि रब्बी हंगामाला पाणी मिळावे, यासाठी मी देवाकडे प्रार्थना करतो, अशी उद्विग्नता त्यांनी व्यक्त केली.

**दौरे आणि आश्वासने केवळ कॅमे-यापुरती-** मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या दुष्काळी दौ-यावर ठाकरे म्हणाले की, हे दौरे म्हणजे केवळ देखावा आहेत. बांधावर जायचे, रडणा-या शेतक-याला जवळ घ्यायचे आणि आम्ही वा-यावर सोडणार नाही, तात्काळ मदत करू अशी आश्वासने द्यायची, यांचे नुसते फोटो आणि बातम्या येतात. पण प्रत्यक्षात शेतकरी पिण्याचे पाणी मागतोय, त्याच्या पोरांच्या लग्नाचा प्रश्न उभा राहिला आहे आणि खायचे काय असा सवाल तो विचारतोय. या दाहक वास्तवाकडे सरकारचे लक्ष नाही. नुसते दौरे करू न प्रश्न सुटणार नाहीत, असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी केला.

## आदित्य ठाकरेंचा माफी मागण्यास नकार

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेनेचे (ठाकरे) नेते, आमदार आदित्य ठाकरे यांना दिवंगत दिशा सालियन यांचे वडील सतीश सालियन यांनी ५०० कोटी रु पयांची अब्रू नुकसानीची नोटीस दिली होती. सालियन आणि त्यांच्या वकिलांनी १९ सप्टेंबर रोजी मातोश्रीवर जाउन नोटीस सुपुर्द केल्यामुळे वाद उद्भवला होता. त्यानंतर आता



आदित्य ठाकरे यांनी या नोटिशीला उत्तर दिले असून सतीश सालियन यांची माफी मागण्यास किंवा ५०० कोटी रु पयांची नुकसान भरपाई देण्यास त्यांनी नकार दिला आहे. तसेच त्यांना बजावलेली नोटीस निरर्थक आणि कायदेशीरदृष्ट्या असमर्थनीय असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

आदित्य ठाकरे यांच्या वतीने वकील अंशुमन सिन्हा यांनी सतीश सालियन यांच्या नोटिशीला २५ पानी उत्तर दिले आहे. दिवंगत ब?लिवूड अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची माजी मॅनेजर असलेल्या दिशा सालियन मृत्यू प्रकरणी सीबीआयने एफआयआर दाखल केल्यानंतर आदित्य ठाकरे यांनी सोशल मीडियावर मराठी आणि इंग्रजीमध्ये एक पोस्ट शेअर केली होती. या पोस्टनंतर सतीश सालियन यांनी ही नोटीस बजावली होती. आदित्य ठाकरेंच्या वतीने दिलेल्या उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, सोशल मीडियावर लिहिलेल्या इंग्रजी आणि मराठी पोस्टमध्ये सतीश सालियन यांच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे सदर पोस्ट त्यांच्याविरु द्ध बदनामीकारक आरोप ठरू शकत नाही. तसेच दिशा सालियनच्या मृत्यूशी त्यांचा संबंध जोडून दीर्घकाळापासून जे राजकीय आरोप आणि माध्यमातून अपप्रचार होत आहे, त्याला उत्तर म्हणून त्यांनी ही पोस्ट लिहिली होती, असेही आदित्य ठाकरेंच्या उत्तरात नमूद केले आहे.

# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## दोष कुणाचा?

**आयआयटीमध्ये विद्यार्थ्यांना जगातील कठीण प्रश्न सोडवायला शिकवले जाते. गणितातील गुंतागुंत, अभियांत्रिकीतील आव्हाने, संशोधनातील अनिश्चितता या सगळ्यांना सामोरे जाण्याची तयारी येथे केली जाते. पण एखाद्या विद्यार्थ्याला स्वतःचे आयुष्यच एक न सुटणारा प्रश्न वाटू लागते तेव्हा त्याच्यासमोर उभी राहणारी व्यवस्था नेमकी कुठे असते? आयआयटी बॉम्बेत एनर्जी सायन्स अन्ड इंजिनियरिंग विभागातील द्वितीय वर्षात शिकणारा साहिल वाकोडे या विद्यार्थ्याच्या आत्महत्येने हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे. त्याआधी परीक्षेला त्याच्या मोबाइलमध्ये प्रश्नपत्रिका चॅटजीपीटीवर अपलोड करून उत्तरे मिळवण्याचा प्रयत्न केल्याचे संस्थेने नमूद केले होते. संस्थेच्या म्हणण्यानुसार त्याच्याविरुद्ध तत्काळ शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली नव्हती; त्याच्याशी चर्चा आणि समुपदेशन करण्यात आले होते. मात्र, या घटनेनंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन केले, संस्थेच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित झाले आणि नंतर आयआयटी बॉम्बेनेच तपास पूर्ण होण्यापूर्वी अशाप्रकारे निष्कर्ष मांडणे अयोग्य असल्याचे मान्य करत आधीच्या निवेदनाबद्दल माफी मागितली. दरम्यान साहिलच्या कुटुंबीयांनी जातीय भेदभाव, मानसिक छळ आणि दवावाचे गंभीर आरोप केले. या तक्रारीवरून प्रा. सूर्यनारायण दुल्ला यांच्यासह इतरांविरोधात एफआयआर दाखल झाला. दुसरीकडे या प्राध्यापकांच्या समर्थनार्थ संस्थेतील काही शिक्षक आणि अन्य ठिकाणच्या आयआयटीतील विद्यार्थ्यांनी भूमिका घेतली आहे. म्हणजेच आज उपलब्ध चित्रात आरोप आहेत, त्याला संस्थेचा प्रतिवाद आहे आणि तपास सुरू आहे. एफआयआर म्हणजे दोष सिद्ध झालेला नाही; आरोप म्हणजे अंतिम सत्यही नाही. त्यामुळे या प्रकरणात न्याय्य निष्कर्ष तपासातूनच निघायला हवा. पण याच ठिकाणी अधिक मूलभूत प्रश्न उभा राहतो. प्राध्यापक दोषी आहेत का हा तपासाचा भाग आहे. त्यापेक्षा मोठा प्रश्न असा आहे की विद्यार्थ्याला एखाद्या शैक्षणिक किंवा शिस्तभंगाच्या प्रसंगातून जाताना संस्था किती सुरक्षित आधार देते? विद्यार्थ्यांची चूक झाली तर नियम लागू झालेच पाहिजेत. परीक्षा प्रामाणिकपणे घेणे ही संस्थेची जबाबदारी आहे. पण नियमांची अंमलबजावणी आणि मानवी संवेदनशीलता हे परस्परविरोधी असण्याचे कारण काय? विद्यार्थ्याची चूक झाली तर शिक्षा किती? आणि त्या प्रक्रियेत त्याची मानसिक अवस्था कोण तपासणार?**

**साहिलच्या प्रकरणात परीक्षेतील कथित गैरप्रकार हा तपासाचा स्वतंत्र विषय आहे. मात्र एका परीक्षेतील प्रसंगाला एखाद्या आत्महत्येचे एकमेव कारण ठरवणे धोकादायक ठरेल. आत्महत्या ही अनेकदा एकाच घटनेची सरळ परिणती नसते. शैक्षणिक अपयशाची भीती, सततची स्पर्धा, कुटुंबाच्या अपेक्षा, स्वतःकडून असलेल्या अवास्तव अपेक्षा, एकटेपणा, सामाजिक दवाव, मानसिक आरोग्याच्या अडचणी आणि संस्थेतील अनुभव असे अनेक घटक एखाद्या विद्यार्थ्याच्या मानसिक स्थितीवर परिणाम करू शकतात. साहिलबावत यापैकी कोणते घटक निर्णायक होते, हे तपास पूर्ण होईपर्यंत सांगता येणार नाही. आयआयटीसारख्या संस्थेत प्रवेश मिळवणे ही विद्यार्थ्यांसाठी मोठी उपलब्धी असते. पण त्याच उपलब्धीचे रूपांतर कधी कधी सतत स्वतःला सिद्ध करण्याच्या दबावात होते. येथे 'इथे मी योग्य आहे का?' हा प्रश्न गुणपत्रिकेपेक्षा मोठा होऊ शकतो. एक परीक्षा, एक शैक्षणिक चूक किंवा प्राध्यापकांशी झालेला संघर्ष अशी बाहेरून पाहणाऱ्याला क्षुल्लक वाटणारी घटना विद्यार्थ्यांच्या मनात मात्र प्रचंड आकार घेऊ शकते. म्हणूनच प्रश्न फक्त तिथे समुपदेशन केंद्र आहे का, एवढाच नसावा. विद्यार्थी तेथे पोहोचतो का? त्याला तिथे गोपनीयता मिळते का? मदत मागितल्याने त्याच्यावर शिक्का बसणार नाही, याची खात्री आहे का? समुपदेशक उपलब्ध असणे आणि मानसिक आरोग्याची व्यवस्था असणे यात मोठा फरक आहे. शिक्षकांनाही मानसिक आरोग्याला तत्काळ प्रतिसाद देण्याचे प्रशिक्षण मिळायला हवे. कारण एखादा विद्यार्थी अचानक गप्प होणे, वर्ग टाळणे, कामगिरीत मोठी घसरण होणे किंवा सतत भीती व्यक्त करणे, ही लक्षणे नेहमी शिस्तीच्या चौकटीत बसत नाहीत. तक्रार निवारण व्यवस्था ही तर आणखी संवेदनशील बाब आहे. जातीय भेदभाव, छळ अथवा शिक्षक-विद्यार्थी संघर्षावावत तक्रार करण्यासाठी विद्यार्थ्याला त्याच व्यवस्थेकडे धाव घ्यावी लागत असेल जिच्याविरुद्ध तक्रार आहे तर त्याचा विश्वास कसा निर्माण होणार? साहिलच्या घटनेनंतर विद्यार्थ्यांनी मांडलेल्या १८ मागण्यांमध्ये स्वतंत्र चौकशी, विद्यार्थी कल्याण, तक्रार निवारण, आरोग्यसेवा आणि २४ तास मानसोपचारतज्ज्ञ उपलब्धतेचा समावेश आहे. या मागण्यांकडे केवळ आंदोलनामुळे निर्माण झालेला दबाव म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. त्या एका मोठ्या प्रश्नाची लक्षणे आहेत. विद्यार्थ्यांना संस्था त्यांचे गुण, शिस्त आणि कामगिरी यापलीकडे माणूस म्हणून किती पाहते? पालकांशी संवाद, विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधित्वाची भूमिका आणि संकटाच्या वेळी माहिती देण्याची संस्थात्मक पद्धतही तपासली पाहिजे. आयआयटी प्रतिष्ठा संशोधन, रैंकिंग, प्लेसमेंट आणि कठीण प्रवेशपरीक्षेतील निवडक विद्यार्थ्यांवर उभी आहे. पण संस्थेची खरी गुणवत्ता केवळ ती किती हुशार विद्यार्थी तयार करते यावर ठरत नाही. संकटग्रस्त विद्यार्थी दारात आला तर ती त्याला किती सुरक्षित ठेवते, यावरही ठरते. साहिलच्या मृत्यूचा अंतिम अर्थ तपास ठरवेल. कोणावर आरोप सिद्ध होतात किंवा होत नाहीत, हेही कायदा ठरवेल. पण या घटनेने व्यवस्थेला एक प्रश्न आधीच विचारला आहे, विद्यार्थ्यांची चूक पकडण्यासाठी आपल्याकडे व्यवस्था आहे; पण त्याच्या मनातील संकट पकडण्यासाठी आहे का? परीक्षेतील चुकीचे उत्तर दुरुस्त करता येते. गुण कमीजास्त करता येतात. शिस्तभंगाची प्रक्रिया पुन्हा तपासता येते. पण एका विद्यार्थ्याने आयुष्याबाबत आशा गमावली तर ती परीक्षा पुन्हा घेता येत नाही. साहिलच्या मृत्यूची चौकशी एका विद्यार्थ्यापर्यंत थांबता कामा नये; तिने त्या व्यवस्थेच्या आरशात पाहिले पाहिजे, जिथे पुढचा विद्यार्थी मदतीसाठी हात पुढे करेल तेव्हा तो पकडण्यासाठी संस्था तिथे तत्पर असेल.**

# धोरण धरसोडीची शिक्षा भोगतात उत्पादक

**कांद्यासाठी ज्या बाजारपेठा भारत गमावून बसेल, असा इशारा पवार समितीने दिला होता, त्याच बाजारपेठांकडे आता बांगलादेशसारखे देश कांदा निर्यातीसाठी पाहत आहेत. हा योगायोग की धोरणात्मक दुर्लक्षाचा परिणाम, हा प्रश्न सरकारने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.**

भारतीय कांद्याने जागतिक बाजारपेठेत एका दिवसात स्थान निर्माण केले नाही. कांदा पट्ट्यातील उत्पादकांनी अनेक दशके घाम गाळून, व्यापाऱ्यांनी पुरवठा साखळी उभी करून तसेच निर्यातदारांनी परदेशी ग्राहकांशी संबंध निर्माण करून बाजारपेठेत एक वेगळा ठसा उमटविला आहे. सुरक्षित बाजारपेठ निर्माण करायला दशके लागतात आणि ती गमाविण्यासाठी मात्र धोरणातील काही चुकीचे निर्णय पुरेसे असतात. आज बांगलादेश सारखा देश चार-पाच वर्षांपूर्वी भारतीय कांद्यावर अवलंबून असायचा तो आज श्रीलंकेच्या कांदा बाजारपेठेत प्रवेश करण्याचा प्रयत्न करीत आहे. ही घटना केवळ बांगलादेशच्या व्यापारविस्ताराची नाही तर ती भारताच्या निर्यात धोरणाच्या धरसोड वृत्तीवर मारलेली सणसणीत चपराक आहे.

**अनिश्चित धोरण हीच अडचण**

'अपेडा'च्या माहितीनुसार २०२५-२६ मध्ये भारताने सुमारे १५.४८ लाख टन ताजा कांदा निर्यात केला यात मुख्यतः श्रीलंका, मलेशिया, यूएई, नेपाळ, बांगलादेश, कतार व कुवेत हे प्रमुख आयातदार देश होते. याचा अर्थ तेथे भारतीय कांद्यासाठी बाजारपेठ आहे. आपल्याकडे पुरेसे उत्पादन आहे. मालाची गुणवत्ता आहे. निर्यातदार तयार आहेत. मग अडचण नेमकी कुठे येत आहे? खरी अडचण आहे ती धोरणाच्या अनिश्चिततेची! कांद्याचे दर कोसळल्यानंतर महाराष्ट्र सरकारने माजी पणन संचालक सुनील पवार यांच्या अध्यक्षतेखाली २०२३ मध्ये तातडीने कांदा प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन केली होती. समितीला कांद्याच्या दरपरसरणीची कारणमीमांसा करण्याबरोबरच वाहतूक अनुदान आणि कांदा निर्यातीसाठी योग्य उपाययोजना सुचविण्याची जबाबदारी देण्यात आली होती. या समितीने अल्पावधीत केवळ वरवरच्या उपायांवर समाधान मानले नाही. कांद्याचा बाजार हा उत्पादनाइतकाच साठवणूक, देशांतर्गत बाजारपेठ, निर्यात, व्यापार व्यवस्था आणि धोरणात्मक सातत्य यांचा विषय आहे, हे समितीने अधोरेखित केले होते.

**पवार समितीच्या निर्यातविषयक शिफारशी...**

-कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक झाल्यानंतर शेतकऱ्यांकडे साठवणुकीची सुविधा नसते. अशा वेळी कांदा सडण्याची वाट पाहण्यापेक्षा किंवा कवडीमोल भावाने विकण्यापेक्षा शेजारील देशांच्या बाजारपेठा खुल्या कराव्यात, अशी भूमिका समितीने घेतली होती.

-कांद्याचे उत्पादन, देशांतर्गत उपलब्धता, साठा, बाजारभाव आणि आंतरराष्ट्रीय मागणी यांचा अभ्यास करून निर्णय घ्यावा. एकदम निर्यातबंदी आणि नंतर अचानक निर्यात खुली करण्याची पद्धत टाळावी, हा समितीच्या शिफारशींचा महत्त्वाचा संदेश होता.

-परदेशी बाजारपेठ हातची जाऊ देऊ नये, ही पवार समितीची शिफारस आजच्या परिस्थितीत विशेष महत्वाची ठरते.

-नेपाळ, श्रीलंका या देशांशी आर्थिक व्यवहारांबाबत निर्माण होणारी जोखीम कमी करण्यासाठी शेजारील देशांशी स्पर्यात व्यवहार करण्याची शक्यता तपासण्याची शिफारस समितीने केली होती.

-देशाच्या विविध भागांतील मागणी कांदा उत्पादकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि लिलाव प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी समितीने सर्व बाजार समित्यांमध्ये ई-नाम व्यवहार वाढविण्याची शिफारस केली होती.

मग प्रश्न असा पडतो, की समितीने जर योग्य आणि न्याय बाबी समोर आणल्या असतानाः या शिफारशींचे झाले काय? समिती नेमायची, तज्ज्ञांकडून अभ्यास करून घ्यायचा, शिफारशी घ्यायच्या आणि नंतर त्या शिफारशींची अंमलबजावणीच करायची नाही. हे असंच असेल तर तर मग समित्या नेमायच्या तरी कशासाठी? ही केवळ प्रशासकीय उदासीनता नाही तर हा धोरणनिर्मितीच्या प्रक्रियेवरील गंभीर प्रश्न आहे. तीन वर्षांपूर्वी पवार समितीने ज्या वेळी निर्यातीसंदर्भात ही भूमिका मांडली, त्या वेळीच त्यावर अंमलबजावणीची कार्यवाही झाली असती, तर आज भारताच्या निर्यात बाजारपेठेचे संरक्षण करण्यासाठी पुन्हा पुन्हा त्याच प्रश्नांवर बैठका घेण्याची वेळ आली नसती.

कांद्याच्या धोरणात केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे गणित पुरेसे नाही. लासलगावच्या बाजारातील व्यवहार समजणारा तज्ज्ञ, कांदा निर्यात करणारा व्यापारी, शेतकरी उत्पादक कंपनी, कृषी विद्यापीठातील



शास्त्रज्ञ, साठवणूक तज्ज्ञ, लॉजिस्टिक्स तज्ज्ञ आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा अभ्यास करणारे अर्थतज्ज्ञ या सर्वांचा प्रत्यक्ष अनुभव धोरणात उतरला पाहिजे. बाजारपेठ रिकामी ठेवली तर दुसरा कुणीतरी ती भरतो, हा आंतरराष्ट्रीय व्यापारात एक कठोर नियम आहे. ग्राहक तुमची वाट पाहत बसत नाही. तुम्ही आज माल दिला नाही, तर उद्या दुसरा देश देईल. तुम्ही आज निर्यातबंदी केली, तर परदेशी ग्राहक दुसऱ्या देशाशी करार करेल. तुम्ही सहा महिने बाजारातून गायब राहिलात, तर तुमच्या जागी दुसऱ्या देशाची पुरवठा साखळी उभी राहू शकते. आणि एकदा का ग्राहक, आयातदार, वितरक आणि लॉजिस्टिक नेटवर्क दुसऱ्या देशाशी जोडले गेले की ती बाजारपेठ परत मिळविण्यासाठी केवळ निर्यातबंदी उठवणे पुरेसे नसते. पान वास्तवाचा इशारा सुनील पवार समितीने दिला होता. आज बांगलादेश निर्यातीच्या दृष्टीने श्रीलंकेकडे पाहत आहे, ही बाब त्यामुळे अधिक गंभीरपणे घेण्याची गरज आहे.

कांदा धोरण 'आज भाव किती?' यावर नव्हे, तर पुढील पाच वर्षे बाजार कुठे असेल?' यावर ठरले पाहिजे! कांद्याचे उत्पादन चांगले झाले, की सरकारला देशांतर्गत भावाची चिंता. भाव वाढले की ग्राहकांची चिंता. भाव पडले की शेतकऱ्यांची चिंता मात्र प्रश्नांकित, मग निर्यातबंदी. पुन्हा खुली.हो बंद-उपड पद्धत म्हणजे कृषी निर्यात धोरण नव्हे. भाव वाढते की आयात. पुन्हा उत्पादन वाढले की निर्यात शेतकरी आणि निर्यातदार मोजत असतात. आता तरी हा बाजाराशी केलेला प्रयोग आहे आणि या प्रयोगाची किंमत सुनील पवार समितीच्या शिफारशींचे पोस्टमार्टम' नजे तर अंमलबजावणी करायला हवी. या अहवालातील योग्य शिफारशींचे कालबद्ध कृती आराखड्यात रूपांतर झाले पाहिजे. बाजारपेठ गमावण्यापूर्वी धोरण बदलणे हे सरकारचे कर्तव्य आहे पण बाजारपेठ गमावल्यानंतर कारणमीमांसा करण्यासाठी समिती नेमणे हा शहाणपणा नक्कीच नाही. आता प्रश्न कांदा निर्यातीचा एवढाच राहिलेला नाही प्रश्न आहे भारत कृषी निर्यातीत दीर्घकालीन विश्वासार्ह व्यापारी भागीदार राहणार आहे की प्रत्येक हंगामात बदलणाऱ्या धोरणांचा अनिश्चित पुरवठादार? याचे उत्तर दिल्लीतील फाइलमध्ये नव्हे, तर नाशिकच्या कांदा बाज श्रीलंका-बांगलादेशासारख्या परदेशी बाजारपेठांमध्ये दिसेल.

**कुबेर जाधव**
मो.९४२३०७२१०२

# 'मायबाप' सरकार कोठे आहे ?

दुष्काळ का पडला तर 'अल निनो' मुळे (अल निनो च्या जाहिराती तर किती महिन्यापासून लागल्या होत्या, काय तयारी केली होती राज्य सरकारने? त्या हजारी कोटी रुपयांचा नफा कमावणाऱ्या पीक विमा कंपन्या कोठे बिळात जाऊन लपल्या आहेत? कोण जाब विचारणार त्यांना शेतकरी का शासन?)

आयआयटी सारख्या उच्चशिक्षण संस्थेतील विद्यार्थी आत्महत्या का करतात? तर त्यांना अभ्यास, स्पर्धा यांचा ताण सहन होत नाही म्हणून! (एखाद दुसऱ्या विद्यार्थाने आत्महत्या केली असेल तर, ती देखील शोकांतिकाच, समजू शकते. पण वर्षानुवर्षे जवळपास महिन्याला एक विद्यार्थी आत्महत्या करत असेल तर दोष राबवल्या जाणाऱ्या शिक्षण/परीक्षा प्रणालीत आहे याबद्दल काही बोलायचे नाही)

आयआयटी सारख्या (आणि अनेक) शिक्षण संस्थेत समाजातील वंचित घटकातून,रिझर्व्ह कॅटेगरीचे विद्यार्थी आत्महत्या का करतात;असे विचारले की फक्त रिझार्व कॅटेगरी कोठे,जनरल कॅटेगरीचे विद्यार्थी देखील आत्महत्या करतात याची आकडेवारी तोंडावर फेकायची.

(समाजातील वंचित घटकातून आलेल्या विद्यार्थ्यांचे काही वेगळे प्रश्न असतात. कॅम्पसवर जातीयवादाचे विष मनात भिनलेले शिक्षक, स्टाफ,इतर विद्यार्थी यांच्याकडून त्यांना अनेकवेळा मानहानीकारक वागणूक मिळते ज्याचा संबंध त्यांच्या आत्महत्येपर्यंत जातो, याबद्दल काही बोलायचे नाही )

देशात तरुण वयातील नागरिकांमध्ये बेरोजगारी का आहे, तर तरुणांना फक्त डिग्री घेण्यामध्ये रस असतो; शिक्षण व्यवस्था रोजगाराभिमुख नाहीये इत्यादी.

(एका बाजूला खोऱ्याने पैसे कमवण्याच्या एकमेव उद्देशाने शिक्षण सम्राटांना शैक्षणीक संस्था काढू द्यायच्या, त्यातील मलईचा वाटा आपल्याकडे वळवायचा, त्याच शिक्षण सम्राटांना आमदार/खासदार/मंत्री करायचे ; त्यातील शिक्षणाचा दर्जा, ना प्राध्यापक, ना प्रयोगशाळा याबद्दल बोलायचे नाही. देशातील अर्धी लोकसंख्या ३५ वर्षखालील असतांना रोजगारनिर्मितीची धोरणे आखायची नाहीत. सर्व काही मार्केटवर सोपवायचे याबद्दल बोलायचे नाही)

गरिबी, दारिद्र्य का आहे, तर गरीब लोक जास्त मुलांना जन्म देतात म्हणून किंवा गरिबांना शिकायचे नसते,ते आळशी असतात म्हणून.(आर्थिक स्थर उंचावला कि स्त्री पुरुष कमी मुलांना जन्म देतात हे वैश्विक आर्थिक सत्य आहे याबद्दल बोलायचे नाही. किंवा गरीब स्त्री पुरुष दिवसाचे किती तास काबाड कष्ट करतात हे माहित असून नजरेआड करायचे)

शहरांमध्ये, विशेषतः महानगरांमध्ये दरवर्षी,वर्षानुवर्षे पाणी साचून कुटुंबांचे/पायाभूत सुविधांचे/अर्थव्यवस्थेचे शकेडो कोटी रुपयांचे नुकसान होते.हे का होते तर हवामान बदलामुळे पाऊस अति होतोय म्हणून.

(एखाद्या वर्षी असे झाले तर समजू शकते. पण दरवर्षी होत असेल तर त्याची मुळे नागरी नियोजनाचा अभाव, पाणी वाहून जाणाऱ्या प्रवाहात बांधकामांना मंजुरी,लँड माफियांना राजकीय व्यवस्थेने शरण जाणे याबद्दल काही बोलायचे नाही?)

अशा प्रश्नांची यादी आणि त्याची वरील प्रमाणे चिरफाड करता येईल.यांची मुळे जनहित केंद्रस्थानी नसलेल्या शासकीय धोरणांमध्ये किंवा धोरणे आखायला नकार देण्यामध्ये आहेत.शासकीय/राजकीय प्रवक्ते प्रत्येक प्रश्नाला शासन सोडून इतर सर्व किंवा निसर्ग किंवा जागतिक परिस्थिती कारणीभूत आहे असे छाती ठोकून सांगतात. शेवटी असे प्रश्न विचारणाऱ्याला अर्बन नक्षल ठरवतात.

शासन संस्था/सरकार/ त्याच्याकडे असणारे महाकाय वित्तीय स्रोत आणि मुख्य म्हणजे धोरणे/निर्णय घेण्याचा अधिकार यामुळे ती एकमेवाद्वितीय/युनिक एजन्सी असते. नेहमीच राहील. लेट मी रिपीट. शासनाला, राजकीय सत्तेला पर्याय नाही. कधीच नसणार आहे. No Kings. आपण निवडतो म्हणून ते राज्यकर्ते बनतात. ते जन्मतः ग्रेट असतात म्हणून राज्य करतात असे ते नाहीये.

प्रॉब्लेम काय झालाय कि नवउदारमतवादी आर्थिक तत्त्वज्ञानाने शासन व्यवस्थेला (स्टेट) देशातील इतर अनेक एजन्सी मध्ये आणून बसवले आहे. कॉर्पोरेट्स, बँका व वित्तीय संस्था, सार्वजनिक उपक्रम, स्वयंसेवी संस्था यांच्यापैकी एक म्हणजे शासनव्यवस्था!दोष आपला आहे. आपण सारे त्या नॅरेटिव्हला बळी पडलो आहोत.'शासन तरी काय करणार किंवा शासन कुठे कुठे पुरे पडणार' असे आपणच एकमेकाला विचारत असतो.

हा आपला माईंड सेट बदलण्याची गरज आहे. लोकशाहीत सरकार आपण निवडून देतो, त्याने आपल्या भल्यासाठी काम करावे, निधी उपलब्ध करावा, कायदे नियम करावेत, शिस्त लावावी यासाठी 'अहो कारणे आहेत आम्हाला मान्य आहे, तुम्ही काय करणार त्यावर बोला' हे सामान्य नागरिकांनी सांगितले पाहिजे. कारण मायबाप सरकार आपले असते. आपण निवडून दिलेले असते म्हणून. राज्यकर्ते राजे नसतात.

नवउदारमतवादाला छेद द्यायचा असेल तर आपले मायबाप सरकार आपल्याला 'रिक्लेम' करावे लागेल. त्यावर आपला घटनादत्त हक्क प्रस्थापित करावा लागेल. आपले जीवघेणे प्रश्न आपल्या मुलाबाळांना देखील भोगावे लागू नयेत असे वाटत असेल तर या मार्गाला पर्याय नाही.

**संजीव चांदोरकर**

## अनंत चतुर्थीचे महात्म्य

'अनंत' म्हणजे ज्याचा अंत नाही,अशी चैतन्यरूपी शक्ती.'अनंत' हे श्री विष्णूचे नाव आहे.अनंताची पूजा करण्याचे व्रत ज्यांनी घेतले आहे, ते अनंत चतुर्थीच्या दिवशी (भाद्रपद शुक्ल चतुर्थी) अनंताची पूजा करतात. ही पूजा घरातील कर्ता पुरुष करतो. शुक्रवारी २५ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्थी आहे. गेलेले वैभव पुन्हा मिळवण्यासाठी हे व्रत करतात अशी मान्यता आहे. या दिवशी ब्रह्मांडात गणेशतत्त्वही १० टक्के अधिक प्रमाणात प्रक्षेपित होते. गणेशभक्तांना याचा लाभ मिळतो.

अनंतव्रताच्या संदर्भात पौर्णिमायुक्त चतुर्थी अर्थात ज्या दिवशी चतुर्थी तिथीसोबत पौर्णिमा तिथीही येते, अशी चतुर्थी अनंतव्रतासाठी अधिक लाभदायक मानली जाते. श्रीविष्णूंसोबत श्री यमुनादेवी आणि शेषनाग हेही या व्रताचे देवी-देवता आहेत.आपणही या दिवशी श्री गणेशाला भावपूर्ण शरण जाऊन 'श्री गणेशाय नमः ।' किंवा श्रीविष्णूची कृपा प्राप्त करण्यासाठी 'ॐ नमो भगवते वासुदेवाय ।' हा नामजप करणे पुष्कळ लाभदायक आहे.

**आदिती देखणे**

## श्राद्धाचे महत्त्व

प्रत्येक माणसावर देवऋण, ऋषीऋण, समाजऋण, आणि पितृऋण ही चार ऋणे असतात. हिंदू धर्माने घालून दिलेल्या नित्यनैमित्तिक आचार-विचार कर्मातील श्राद्ध हा एक महत्त्वाचा आचार किंवा विधी आहे. भारतीय संस्कृती असे सांगते की, ज्याप्रमाणे माता-पिता तसेच निकटवर्तीय असताना त्यांची सेवासुश्रुषा आपण धर्मपालन म्हणून करतो त्याप्रमाणे त्यांच्या मृत्यूनंतर ही त्यांच्या प्रती आपले काहीतरी कर्तव्य असते. त्या कर्तव्यपूर्तीच्या माध्यमातून पितृऋण फेडण्याची संधी आपल्याला श्राद्धकर्मामुळे मिळत असते. लहानपणी तळहाताच्या फोडाप्रमाणे आपल्याला सांभाळणाऱ्या माता-पित्यांचा मृत्यूनंतरचा प्रवास सुखाचा व्हावा तसेच त्यांना सद्गती मिळावी यासाठी श्राद्धविधी करणे आवश्यक आहे. श्राद्धविधी केला नाही तर पितरांच्या इच्छा अपूर्ण राहतात. श्राद्धविधीमुळे पितरांची त्रासातून सुटका होऊन आपलेही जीवन सुखी होत असते. श्राद्धातील मंत्रांमध्ये पितरांना पुढची गती देण्याची शक्ती असते. श्राद्धामध्ये पितरांना हवीर्भाग म्हणजे घास दिल्यामुळे ते संतुष्ट होतात.

**शंकर पवार**

संवाद

## चुकीची कारवाई

आयआयटी मुंबईतील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटना अत्यंत दुर्दैवी आहेत. कठीण आव्हानांना सामोरे न जाता असे टोकाचे पाऊल उचलणे, हे मानसिक कमकुवतपणाचे लक्षण आहे. जीवनातील अपयशाचा सामना करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये मानसिक कणखरता निर्माण करणे गरजेचे आहे.अशा संवेदनशील परिस्थितीत, परीक्षेत कॉपी करणे सारखे गैरप्रकार कोणत्याही स्तरावर स्वीकारले जाऊ शकत नाहीत. शैक्षणिक गुणवत्तेशी तडजोड करणे प्रामाणिक विद्यार्थ्यांवर अन्याय करणारे आहे. नियम तोडणाऱ्यांवर कारवाई करणे ही संस्थात्मक शिस्त टिकवण्यासाठी आवश्यक असते.परंतु, गैरप्रकार रोखणाऱ्या प्राध्यापकांवरच उलट कारवाई झाली, तर भविष्यात कोणीही शिक्षक विद्यार्थ्यांना चुकीच्या गोष्टींसाठी टोकू शकणार नाही. शिक्षकांचे हात बांधले गेले, तर परीक्षेतील आणि वर्गातील शिस्त पूर्णपणे कोलमडून पडेल.विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन नक्कीच व्हावे, पण शिस्तीच्या नियमांमध्ये कोणतीही सूट असू नये. या घटनेला इतर कंगोरे असू शकतात पण पूर्ण चौकशी झाल्याशिवाय प्राध्यापकावर कारवाई करणे चुकीचे आहे.

**प्रणाली कोचरेकर**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# पालकमंत्र्यांनी घेतला जिल्ह्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीचा आढावा

## दुष्काळसदृश्य परिस्थितीत अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने काम करावे.- पालकमंत्री संजय राठोड यांचे निर्देश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २४ :** जिल्ह्यात पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेली दुष्काळसदृश्य परिस्थिती तसेच पिकांच्या स्थितीबाबत पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी गुरुवार, (दि.२४) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आढावा बैठक घेतली. यावेळी दुष्काळसदृश्य परिस्थितीत कृषी, महसूल, ग्रामविकास, सिंचन, पशुसंवर्धन आदी सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने काम करावे, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.



या बैठकीत पालकमंत्र्यांनी जिल्ह्यातील कापूस, सोयाबीन पीक पेरणी, पावसाची स्थिती, पिकांची सद्यस्थिती, पावसाच्या खंडामुळे पिकांवरील परिणाम, शेतपिकाचे नुकसान, पीक कापणी, पीक विमा, सिंचन प्रकल्पातील पाणीसाठा, जलतारा, बंधाऱ्यांची स्थिती, पशुधन, चारा उपलब्धता, नळ पाणीपुरवठा योजना, पाणी टंचाई आराखडा, कमी पाणी लागणाऱ्या पिकांबाबत प्रचार-प्रसार, शेतकऱ्यांसमोरील अडचणी याबाबत सविस्तर आढावा घेवून उपाययोजनांवर चर्चा केली. बैठकीस आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, राज्यमंत्री इंद्रनिल नाईक, खासदार संजय देशमुख, आमदार बाळासाहेब मांगुळकर, आमदार किसन वानखेडे, आमदार राजू तोडसाम, आमदार संजय देरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल खत्री, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, विविध विभागाचे प्रमुख, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील पीक परिस्थितीचा आढावा घेताना पालकमंत्री संजय राठोड यांनी दुष्काळसदृश्य परिस्थितीत सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने काम करावे. पीक कापणी वेळेत करावी. जलसंधारणाची कामे पूर्ण करावीत. एलनिनो संकटाच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामात कमी पाणी लागणाऱ्या पिकांची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित व मार्गदर्शन करावे. त्यासाठी बीबियाणे तयार ठेवावे. तसेच याबाबतचा आराखडा तयार करून निधी मागणीचा प्रस्ताव सादर करावा. ज्या योजना ९० टक्के पूर्ण झाल्या परंतु निधी अभावी अपूर्ण आहेत अशा योजनांचा आराखडा सादर करावा. जनसुविधेतील कामांऐवजी दुष्काळसदृश्य परिस्थिती निवारणाच्या कामांना प्राधान्य देण्याचा निर्णय मंत्रिमंडळात झाला असून त्यानुसार काम करावे. जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पातील पाण्याचा अपव्यय होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. यावर्षी जिल्ह्यात ९५ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे. पावसाच्या खंडामुळे सोयाबीन, कापूस पिकाची स्थिती नाजूक असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी या बैठकीत दिली. या बैठकीतील सूचना आणि पीक परिस्थितीबाबत पुन्हा आढावा बैठक घेण्यात येईल, अशा सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या. या बैठकीत आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, आमदार राजू तोडसाम, आमदार किसन वानखेडे, आमदार संजय देरकर यांनी महत्त्वपूर्ण सूचना केल्या. त्यानुसार गांभीर्याने कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल खत्री यांनी अधिकाऱ्यांना दिले.

# भोसा प्रभागात अवैध दारू-अंमली पदार्थांचा सुळसुळाट?

## नागरिकांचा जिल्हाधिकारी, एसपींकडे धाव,कारवाई न झाल्यास भव्य मोर्चाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २४ :** यवतमाळ नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र. १७, भोसा परिसरात अवैध हातभट्टी दारू तसेच अंमली पदार्थांची विक्री होत असल्याच्या तक्रारींनी गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकारामुळे परिसरातील सामाजिक वातावरण बिघडत असून युवक, अल्पवयीन मुले, महिला व लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.




या पार्श्वभूमीवर नगरसेवक भारत दिगांबर ब्राम्हणकर व नगरसेविका तबस्सुम मनवर शाह यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी आणि पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांना निवेदन देत कठोर कारवाईची मागणी केली.निवेदनानुसार, भोसा परिसरात अवैध दारू विक्रीसोबत गांजा, पावडर व इतर अंमली पदार्थांच्या विक्रीबाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त होत आहेत. पोलिसांकडून अधूनमधून कारवाई होत असली तरी संबंधित अवैध व्यवसायावर कायमस्वरूपी नियंत्रण आलेले नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे केवळ दिखाऊ अथवा तात्पुरती कारवाई न करता अवैध व्यवसाय करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षकांनी विशेष पथकाच्या माध्यमातून परिसराची तपासणी करून अवैध दारू व अंमली पदार्थांविरोधात विशेष मोहीम राबवावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली. दरम्यान, प्रशासनाने तातडीने दखल घेऊन अपेक्षित कारवाई न केल्यास प्रभागातील नागरिकांच्या वतीने संपूर्ण प्रभागातून भव्य मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे आता प्रशासन या गंभीर तक्रारींकडे किती गांभीर्याने पाहते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात

### अध्वर्यूची राष्ट्रीय सॉफ्टबॉलमध्ये दमदार एंट्री..!

**राज्यस्तरीय कामगिरीच्या जोरावर ३९व्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड**

**यवतमाळ :** सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि मैदानावरील प्रभावी कामगिरीच्या जोरावर यवतमाळचा युवा सॉफ्टबॉलपटू अध्वर्यू पवन कोटांगळे याने राष्ट्रीय स्तरावर झेप घेतली आहे. छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या सब-ज्युनिअर राज्यस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीच्या आधारावर त्याची ३९व्या सब-ज्युनिअर राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धा-२०२६ साठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे. राष्ट्रीय स्पर्धा २७ ते ३० सप्टेंबरदरम्यान छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. अध्वर्यू हा यवतमाळ जिल्हा सॉफ्टबॉल संघटनेचा खेळाडू असून, पाटीपुरा येथील वामनदादा कर्डक सॉफ्टबॉल मैदानावर तो नियमित सराव करतो. तो नाथाळ इंग्लिश मीडियम हायस्कूलमध्ये इयत्ता सातवीत शिक्षण घेत आहे. त्याच्या राष्ट्रीय निवडीबद्दल जिल्हा सॉफ्टबॉल संघटनेचे सचिव डॉ. प्रा. विकास तोणे, प्रा. नरेंद्र फुसे यांच्यासह प्रशिक्षक, क्रीडा अधिकारी, शिक्षक, पालक व क्रीडाप्रेमींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.





### समाजभान जागविण्यासाठी विद्यार्थ्यांना विचारमंच..! समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन

**पांढरकवडा :** समाजातील बदलते वास्तव, सामाजिक प्रश्न आणि नागरिकांची जबाबदारी यांचा चिकित्सक अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा, या उद्देशाने शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केळापूर (पांढरकवडा) येथे समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन उत्साहात पार पडले. प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला वाहतूक उपशाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश तायडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रमाकांत खंडारे व विजयराव काकडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. ठाणेदार संतोष मनवर व सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पेंढारकर यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक जबाबदारी, शिस्त, कायदा व सुव्यवस्था याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी पोस्टर व गीत गायन स्पर्धाही घेण्यात आली. पोस्टर स्पर्धेचे परीक्षण डॉ. शेंडे, डॉ. योगेश उगले व डॉ. फुटाणे यांनी केले. समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. उल्हास राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सूत्रसंचालन अप्सरा चव्हाण व आकांक्षा पवार यांनी केले, तर सुहानी सिडाम यांनी आभार मानले.



### दिव्यांगासाठी राखीव ५ टक्के निधीचा योग्य वापर करा..! दिव्यांग क्रांती संस्थेची मागणी

**झरी, दि. २४ :** ग्रामपंचायतींच्या स्वउत्पन्नातील दिव्यांगांसाठी राखीव ५ टक्के निधीचा नियमानुसार वापर करून दिव्यांगांना प्रत्यक्ष लाभ द्यावा, अशी मागणी दिव्यांग क्रांती संस्था महाराष्ट्र राज्याच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबत संस्थेने जिल्हा परिषद प्रशासनाला निवेदन देऊन दिव्यांगांसाठी घरकुल, रोजगार, आवश्यक साधने, सार्वजनिक सुविधा तसेच शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. तसेच ग्रामपंचायतींकडील ५ टक्के निधी, पंचायत समितीचा दिव्यांग निधी आणि आमदार स्थानिक विकास निधीतून दिव्यांगांसाठी आवश्यक विकासकामांना निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

निधीचा योग्य वापर होत आहे की नाही, याची नियमित तपासणी करून पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना वेळेत लाभ मिळावा, अशी अपेक्षा संस्थेने व्यक्त केली आहे. जिल्हाध्यक्ष सागर इंगोले ,ओम प्रकाश राठोड ,निलेश सागणे राकेश कापनवार,संभाजी पारशिवे,अभिनव आकिनवार इत्यादी उपस्थित होते.

# अवैध बांधकामांना अभय कुणाचे? पुसद नगरपरिषदेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह..!

## जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याची तयारी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २४ :** शहरातील विविध भागांत परवानगी पेक्षा अधिक तसेच विनापरवानगी बांधकामे सुरू असल्याच्या तक्रारींमुळे पुसद नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मुख्य बाजारपेठ, राज्य मार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते श्रीरामपूर ग्रामपंचायत हद्दीपर्यंत, मोतीनगर, शंकरनगर, देशमुखनगर, जिल्हा ग्रामीण रुग्णालय परिसर, मुखरे चौक, न्यायमंदिर रोड, बीएसएनएल कार्यालय परिसर तसेच वसंतराव नाईक चौक ते बसस्थानक मार्गावर मोठ्या प्रमाणात बांधकामे होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.



या बांधकामा मध्ये मंजूर आराखड्या पेक्षा अधिक बांधकाम तसेच बांधकाम नियम व अटींचे उल्लंघन होत असल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. याबाबत नगर परिषदेकडे वारंवार तक्रारी करूनही केवळ नोटिसा बजावून पुढील कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित अधिकारी आर्थिक हितसंबंधामुळे दुर्लक्ष करीत असल्याचेही तक्रारदारांचे म्हणणे आहे. मात्र, या आरोपांची स्वतंत्र पुष्टी झालेली नाही. एकीकडे रस्त्यावरील हातगाड्या व छोट्या व्यावसायिकांच्या अतिक्रमणांवर तत्परतेने कारवाई केली जाते, तर दुसरीकडे कोट्यवधींच्या व्यावसायिक बांधकामांकडे दुर्लक्ष का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. सामान्य नागरिकांना घराच्या असेसमेंटपासून बांधकाम परवानगीपर्यंत कठोर नियम लागू केले जात असताना मोठ्या बांधकामांना वेगळा निकष का, असा संतप्त प्रश्नही विचारला जात आहे. या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते व नागरिक जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करून आंदोलनाचा इशारा देण्याच्या तयारीत आहेत. संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी अनधिकृत बांधकामांची तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# शेतीच्या प्रत्येक पायरीवर शेतकऱ्याचीच परीक्षा!

## खत-औषधा पासून पाईप-स्प्रिंकलर पर्यंत दर आणि पक्क्या बिलाचा प्रश्न

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**राळेगाव, दि. २४ :** यवतमाळ जिल्ह्याची ओळख शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून केली जाते. शेतीवरच ग्रामीण अर्थव्यवस्था अवलंबून असताना अन्नदात्या शेतकऱ्यालाच शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे चित्र आहे.




खत, बियाणे, कीटकनाशके, मजुरीपासून शेती साहित्याच्या खरेदीपर्यंत वाढता खर्च आणि बाजारभावाची अनिश्चितता यामुळे 'शेतकऱ्याचा वाली कोण?' असा सवाल आता शेतकरी वर्गातून उपस्थित होत आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, काही ठिकाणी खत व कृषी औषधे उधारीवर घ्यावी लागत असल्याने दुकानदार सांगतील त्या दराने खरेदी करण्याची वेळ येते. बाजारातील दरांची तुलना करण्याची संधीही अनेकदा मिळत नसल्याची तक्रार आहे. त्यामुळे कृषी निविष्ठांचे दर स्पष्ट असावेत, अधिकृत पक्के बिल मिळावे आणि संबंधित विभागाने विक्री प्रक्रियेची नियमित तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. राळेगाव शहरातील हार्डवेअर दुकानांमध्ये स्प्रिंकलर, पाईप, फिटिंग, पंपाचे साहित्य व अन्य कृषी उपयोगी साधने खरेदी करण्यासाठी शेतकरी येतात. मात्र, काही शेतकऱ्यांकडून दराबाबत स्पष्टता नसणे आणि खरेदीनंतर बिलासाठी पाठपुरावा करावा लागत असल्याच्या तक्रारी करण्यात येत आहेत. शेती साहित्य चोरीला गेल्यास त्याच्या खरेदीचा पुरावा म्हणून बिल महत्त्वाचे ठरते. त्यामुळे 'पैसे आमचे, माल आमचा; मग बिल मागताना संकोच का?' असा सवाल शेतकरी करीत आहेत. उत्पादन खर्च वाढत असताना शेतमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी अधिक तीव्र होत आहे. प्रशासनाने केवळ कागदोपत्री उपाय न करता कृषी निविष्ठा व साहित्य विक्रीतील तक्रारींची चौकशी करून योग्य दर, पक्के बिल आणि सन्मानाची वागणूक मिळेल, याची खात्री करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# क्रीडा स्पर्धेच्या नावाखाली आदिवासी विद्यार्थी मूलभूत सुविधांपासून वंचित..?

## हर्षी आश्रमशाळेतील धावण्याच्या स्पर्धेत शूज अभावी विद्यार्थ्यांच्या पायाला दुखापती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २४ :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, पुसद यांच्या वतीने हर्षी येथील शासकीय आश्रमशाळेत आयोजित केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. धावण्याच्या स्पर्धेसाठी योग्य ट्रॅक, पादत्राणे आणि तत्काळ प्रथमोपचाराची व्यवस्था अपुरी असल्याने काही विद्यार्थ्यांना खडबडीत मैदानावर धावताना पायाला दुखापती झाल्याची बाब समोर आली आहे.



त्यामुळे विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित स्पर्धेच्या नियोजनावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या स्पर्धेत पुसद प्रकल्पांतर्गत विविध शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. व्हॉलीबॉल, हँडबॉल, कबड्डी, खो-खो यांसह गोळाफेक, भालाफेक, १०० व २०० मीटर धावण्यासारख्या वैयक्तिक क्रीडा प्रकारांचे आयोजन करण्यात आले. मात्र धावण्याच्या स्पर्धेपूर्वी मैदान व ट्रॅकची सुरक्षितता तपासणे, दगड-गिट्टी अथवा इतर अडथळे दूर करणे आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुरक्षा उपाय करणे अपेक्षित होते. विशेषतः धावण्याच्या स्पर्धेत शूज किंवा योग्य पादत्राणांची व्यवस्था नसल्याने विद्यार्थ्यांना खडबडीत मैदानावर धावावे लागल्याचा आरोप आहे. त्यामुळे काही विद्यार्थ्यांच्या पायात खडे घुसल्याने जखमा व दुखापती झाल्याचे सांगण्यात येत आहे. स्पर्धास्थळी तत्काळ उपचारासाठी सक्षम वैद्यकीय पथक व आवश्यक प्रथमोपचार साहित्य सज्ज असणेही गरजेचे होते. स्पर्धांसाठी शासनाकडून हजारो रुपयांचा खर्च होत असताना, ज्या विद्यार्थ्यांसाठी हा निधी खर्च केला जातो, त्यांनाच मूलभूत सुविधा का मिळत नाहीत? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. विद्यार्थ्यांना सुरक्षित मैदान, आवश्यक क्रीडा साहित्य, शूज, पिण्याचे पाणी, वैद्यकीय पथक आणि प्रथमोपचाराची सुविधा उपलब्ध करून देणे ही आयोजकांची जबाबदारी आहे. या प्रकाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन स्पर्धेच्या नियोजनाची चौकशी करावी, विद्यार्थ्यांच्या दुखापतींची माहिती घ्यावी आणि भविष्यात अशा स्पर्धांमध्ये सुरक्षा प्रोटोकॉल काटेकोरपणे लागू करावेत, अशी मागणी होत आहे.

# गोव्याच्या साहित्यभूमीत यवतमाळच्या अवनींच्या लेखणीचा ठसा!

## 'द हिडन पॉवर ऑफ मॅरिड वूमन'चे दिमाखात प्रकाशन, ॲमेझॉनवर 'नंबर १ बेस्टसेलर'चा मान

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २४ :** यवतमाळच्या साहित्यविश्वासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी कामगिरी सौ. अवनी अथर्व करंदीकर (देवयानी तांबेकर) यांनी केली आहे. गोव्यात आयोजित भव्य पुस्तक प्रकाशन सोहळ्यात त्यांच्या 'द हिडन पॉवर ऑफ मॅरिड वूमन' या पुस्तकाचे दिमाखात प्रकाशन झाले. विशेष म्हणजे प्रकाशनानंतर अल्पावधीतच या पुस्तकाने ॲमेझॉनच्या डिजिटल व्यासपीठावर 'नंबर १ बेस्टसेलर'चा मान मिळविल्याने अवनी यांच्या लेखणीची देशपातळीवर दखल घेतली जात आहे.



इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ ऑथर्सतर्फे गोव्यातील प्रसिद्ध हॉटेल रेनेसां येथे हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. देशभरातील लेखक, साहित्यिक आणि विचारवंतांच्या उपस्थितीत आयसीएचे संस्थापक मि. इन्स्पायरिंग जतिन यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी अवनी करंदीकर यांच्या साहित्यिक योगदानाची दखल घेत त्यांना विशेष प्रावीण्य प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विवाहित महिलांच्या सुप्त शक्ती, कुटुंब व समाजातील त्यांची भूमिका तसेच आत्मशोधाचा प्रवास या विषयांना पुस्तकातून प्रभावीपणे मांडण्यात आले आहे. बदलत्या काळातील स्त्रीच्या संघर्ष, क्षमता आणि आत्मविश्वासाला साहित्यिक अभिव्यक्ती देण्याचा प्रयत्न या लेखनातून दिसून येतो. या सोहळ्यास अवनी यांचे वडील तथा गोदावरी अर्बनचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर आणि आई सौ. सुषमा तांबेकर उपस्थित होते. गोव्याच्या साहित्यभूमीतून उमटलेला हा यवतमाळच्या कन्येच्या लेखणीचा ठसा सध्या विशेष चर्चेचा विषय ठरत आहे

# उपपदार्थांतून इंधननिर्मिती; नॅचरल शुगरची 'ग्रीन' झेप!

## युनिट-२ मध्ये अत्याधुनिक बायो-सीएनजी प्रकल्पाचे उद्घाटन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २४ :** साखर उद्योगातील उपपदार्थांचा केवळ अवशेष म्हणून वापर न करता त्यातून आर्थिक मूल्य आणि पर्यावरणपूरक इंधननिर्मिती करण्याच्या दिशेने नॅचरल शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेडच्या युनिट-२ने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. गुंज-सवना येथे अत्याधुनिक बायो-सीएनजी प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले.



नॅचरल शुगरचे संस्थापक अध्यक्ष कृषिरत्न बी. बी. ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. उसाचे चिपाड, मळी आणि वेस्ट कंपोस्ट यांसारख्या उपपदार्थांचा बायोगॅस तंत्रज्ञानाद्वारे उपयोग करून बायो-सीएनजी निर्मिती केली जाणार आहे. त्यामुळे साखर उद्योगाला केवळ साखरेच्या उत्पन्नावर अवलंबून न राहता उपपदार्थांमधून अतिरिक्त मूल्यनिर्मितीचा मार्ग खुला होणार आहे. दरम्यान, २०२६-२७ या ११व्या गळीत हंगामाच्या प्रारंभानिमित्त २१ सप्टेंबर रोजी बॉयलर अग्निप्रदीपन सोहळाही पार पडला. मागील हंगामात सर्वाधिक ऊस तोडणी व वाहतूक करणारे कंत्राटदार सुदर्शन धोंडबाराव शिंदे यांच्या हस्ते, बी. बी. ठोंबरे यांच्या उपस्थितीत शास्त्रोक्त पद्धतीने बॉयलर पूजन करण्यात आले. कार्यक्रमास कार्यकारी संचालक कृषिभूषण पांडुरंग आवाड, संचालक हरिभाऊ टेळे, श्रीपाद ठोंबरे यांच्यासह संचालक, अधिकारी, कर्मचारी आणि ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बायो-सीएनजी प्रकल्पामुळे शेतकरी, उद्योग आणि पर्यावरण या तिन्ही घटकांना जोडणाऱ्या नव्या अर्थकारणाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

# नापिकीच्या फेऱ्यात युवा शेतकऱ्याचा अंत,विष्णू सुरोशे यांची आत्महत्या..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २४ :** महागाव तालुक्यातील हिवरा (संगम) येथे सततची नापिकी, अपुरा पाऊस आणि वाढत्या आर्थिक विवंचनेमुळे ३२ वर्षीय अल्पभूधारक युवा शेतकरी विष्णू रामराव सुरोशे यांनी विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी उघडकीस आली.



या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सुरोशे यांच्याकडे केवळ दोन एकर कोरडवाहू शेती होती. याच शेतीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून होता. यंदा पावसाने दडी मारल्याने कापसाचे पीक हातातून जाण्याच्या स्थितीत आले होते. त्यामुळे आर्थिक संकट वाढल्याने ते काही दिवसांपासून विवंचनेत असल्याचे सांगण्यात येते. २२ सप्टेंबर रोजी 'शेतात जातो' असे सांगून घराबाहेर पडलेले सुरोशे परतले नाहीत. कुटुंबीयांनी शोध घेतला. अखेर २४ सप्टेंबर रोजी कलगाव येथील भवानकर यांच्या शेतातील विहिरीत त्यांचा मृतदेह आढळला. महागाव पोलिसांनी पंचनामा करून मृतदेहाचे शवविच्छेदन केले. त्यानंतर हिवरा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलिस व महसूल प्रशासनाकडून पुढील तपास सुरू आहे.

# शेंबाळ पिंप्री, ढाणकीला 'अपर तहसील'चा दर्जा!

**पुसद, दि. २४ :** पुसद तालुक्यातील शेंबाळपिंप्री आणि उमरखेड तालुक्यातील ढाणकी येथे अपर तहसीलदार कार्यालय सुरू करण्यास राज्य शासनाने अखेर मान्यता दिली आहे. महसूल विभागाने २२ सप्टेंबर रोजी याबाबत शासन निर्णय जारी केला. शेंबाळपिंप्री कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात खंडाळा, बेलोरा व शेंबाळपिंप्री ही तीन महसूल मंडळे, तर ढाणकी कार्यालयात ढाणकी, निंगपूर, दराटी व बिटरगाव या चार मंडळांचा समावेश राहणार आहे. त्यामुळे दुर्गम भागातील नागरिकांना महसूल कामांसाठी पुसद व उमरखेडची वारंवार धाव घेण्याची गरज कमी होणार आहे. नव्या कार्यालयांना महाराष्ट्र जमीन महसूल संहितेनुसार अधिकार मिळणार असले तरी निवडणूक व संजय गांधी निराधार योजने सह तालुकास्तरीय कामकाज मूळ तहसील कार्यालयाकडेच राहणार आहे.

# शेतकऱ्यांच्या बँकेला राजकीय बदनामीच्या खेळात ओढू नका!

## पोही सेवा संस्थेतील कर्जप्रकरणावर बँकेचा नावनिहाय खुलासा, कागदपत्रे अपूर्ण, थकीत कर्जदार आणि कर्जाची मागणीच नसल्याची धक्कादायक वस्तुस्थिती

**अमरावती/का.प्र.**

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकऱ्यांची बँक आहे; त्यामुळे काही कर्जप्रकरणांचा आधार घेऊन संपूर्ण बँकेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचा प्रयत्न योग्य नाही. पोही सेवा सहकारी संस्थेतील कर्जवाटपाबाबत करण्यात आलेल्या आरोपांना बँकेने २३ सप्टेंबर २०२६ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अचलपूर यांच्याकडे दिलेल्या खुलाशातून कागदोपत्री उत्तर दिले आहे.

बँकेने खुलाशात सीमा विजय मते, बबीता वामनराव बदरके आणि आकाश राजकुमार मते यांच्या कर्जप्रकरणाचा उल्लेख केला आहे. कर्जमंजुरीनंतर सर्व्हे क्रमांक २२२ संदर्भातील फेरफाराची तपासणी करण्यात आली. संबंधित जमीन श्रीराम गणपत मते यांच्याकडून प्राप्त झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर आणि श्रीराम मते यांचे कर्ज प्रलंबित असल्याने सीमा मते व आकाश मते यांना वाटप झालेले कर्ज रद्द करण्यात आल्याचे बँकेने स्पष्ट केले आहे.दुसरीकडे चैतन वामनराव बदरके, अक्षय वामनराव बदरके, बंधू मनोजी बदरके आणि सागर दिलीप अडाऊ यांनी कर्जधोरणानुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली नसल्याने त्यांचे प्रस्ताव परत करण्यात आल्याचे बँकेने नमूद केले आहे.

याहून महत्त्वाचे म्हणजे राहुल दिगंबर गाठे यांनी संस्थेकडे कर्जाची मागणीच केलेली नसल्याचे, तर अमोल बदरके आणि स्वप्नील रामभाऊ माकोने हे थकीत कर्जदार असल्याचे बँकेच्या खुलाशात स्पष्ट करण्यात आले आहे.

म्हणूनच कर्जमंजुरी, कागदपत्रांची पूर्तता, थकीत कर्ज आणि सी-बिल यांसारख्या नियमबद्ध प्रक्रियांना राजकीय रंग देऊन शेतकऱ्यांच्या बँकेची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न किती योग्य? हा प्रश्न आता शेतकरी सभासदांसमोर आहे.

बँकेने नावांसह, कागदपत्रांसह आणि प्रक्रियेच्या आधारे आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे राजकीय धुरळ्यापेक्षा कागदपत्रांतील वस्तुस्थितीच महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांची बँक ही कोणाच्या वैयक्तिक राजकीय हिशेबासाठी वापरण्याचे व्यासपीठ नाही.

### सी-बिलबाबतही गैरसमजाला जागा नाही

नियमित शेतकरी सभासदांकडून बँक सी-बिल घेत नाही. नवीन सभासदाने इतर बँकेचे कर्ज नसल्याचा दाखला दिल्यास त्यांच्याकडूनही सी-बिल घेतले जात नाही. मात्र असा दाखला सादर न केल्यास रिझर्व्ह बँकेच्या सूचनांनुसार सी-बिल मागविण्याची प्रक्रिया करणे बँकेला आवश्यक असते.

# शिक्षक मंडळींनी दाखवली संवेदनशीलता आणि तत्परता

**अचलपूर/वार्ताहर**



शहरातील श्री भक्त बिहारी संस्थान येथून प्रसिद्ध अमिनाथ संस्थांन पर्यंत स्व.रतनकुमारजी चौधरी यांच्या कुटुंबियांकडून भव्य दिव्य पारंपरिक फुलडोल महोत्सव शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते .टक्कर चौक परिसरात राष्ट्रीय हायस्कूल मधील विद्यार्थिनीचे लेझिम पथक आकर्षणाचे केंद्र ठरले .यावेळी टक्कर चौक परिसरात नागरिक ,भाविक भक्त,महिला मंडळी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.यादरम्यान ट्रॅफिक जाम मध्ये अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयाकडे एका रुग्णाला उपचारासाठी घेऊन जाणारी एक रुग्णवाहिका असल्याची माहिती अचलपूर पोलिस स्टेशनचे अधिकारी,फुलडोल शोभायात्रेतील सदस्य आणि राष्ट्रीय विद्यालयाचे शिक्षकांना मिळाली. त्यानंतर तत्काळ अचलपूर पोलिस स्टेशनचे अधिकारी, सदस्य आणि राष्ट्रीय विद्यालयाचे शिक्षक वर्गाने तत्काळ तो रस्ता मोकळा करून दिला.रस्त्यावर असलेली वाहने बाजूला करून दिली .यामुळे ती रुग्णवाहिका अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयाकडे रवाना झाली .अचलपूर पोलिस स्टेशनचे अधिकारी,फुलडोल शोभायात्रेतील सदस्य आणि राष्ट्रीय विद्यालयाचे शिक्षक - मंडळींनी दाखवलेली संवेदनशीलता आणि तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# भाजपा किसान मोर्चा मेळघाट जिल्ह्याची संघटन बैठक

**अचलपूर/वार्ताहर**



भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा, मेळघाट जिल्हा (अमरावती ग्रामीण) यांच्या वतीने नुकतेच शासकीय विश्रामगृह, परतवाडा येथे महत्त्वपूर्ण संघटन बैठक यशस्वीरीत्या पार पडली.आगामी काळातील पक्षाचे कार्य अधिक प्रभावीपणे राबविणे तसेच शेतकरी बांधवांचे प्रश्न तळागाळापर्यंत पोहोचविण्या साठी किसान मोर्चाची संघटनात्मक बांधणी आणखी मजबूत करण्याच्या उद्देशाने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीला मार्गदर्शक म्हणून भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश महामंत्री संतोष देशमुख, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश सचिव आप्पाजी पाटील ,भाजपा चे जिल्हा महामंत्री सुधीर रसे , भाजपा किसान मोर्चा मेळघाट चे जिल्हाध्यक्ष माधव अवघड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांनी आपल्या भाषणामध्ये मार्गदर्शना दरम्यान उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित करताना किसान मोर्चा हा पक्षाचा महत्त्वाचा आधारस्तंभ असून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठीचे कार्य तळागाळापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी जिल्हाध्यक्ष माधव अवघड यांनी किसान मोर्चाच्या माध्यमातून आत्तापर्यंत करण्यात आलेल्या कामाचा आढावा मांडला. तसेच आगामी काळातील किसान मोर्चाचे कामकाज, संघटनात्मक बांधणी आणि कार्यकारिणीबाबत मार्गदर्शन केले.या बैठकीतील महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक ठराव मंजूर झाले आहे.ज्यामध्ये सध्या संपूर्ण मेळघाट व अमरावती ग्रामीण भागात गंभीर दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

बैठकीमध्ये आगामी काळात कर्जमाफी, दुष्काळी परिस्थिती व त्यावरील उपाययोजना, संघटनात्मक पक्षीय बांधणी, 'मन की बात', वीज वितरण, एसटी महामंडळ, विविध बँकांशी संबंधित तक्रारी तसेच शेतकरी व जनतेशी निगडित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस मेळघाट जिल्हा अमरावती ग्रामीण भागातील किसान मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यामध्ये अंकुश घुलक्षे ,नरेश जोशी ,मनोहर मुरकुटे ,अमोल धिवधोंडे ,शितलसिंग ठाकूर ,रावसाहेब लव्हाळे ,प्रितमकुमार सारंग, बिसराम झमलकर ,संदीप पाटील,मुकेश म. अलोणे,आशिष प्र. पाटील ,विकास दा. पवार ,मंगेश के. खेरडे ,आर. के. उघडे ,रूपेश जोशी,राहुल नवलकर , सौरभ चव्हाण , विलास धोंडे , गणेश जावरकर ,विलासराव चौधरी , उमेश हांडे , आरती गुरमाळे , पुष्पाताई फुकटे ,डॉ. वनश्री मु. देशपांडे उपस्थितीत होत्या .प्रास्ताविक डॉ. वनश्री देशपांडे तर बैठकीच्या शेवटी आभारप्रदर्शन आरती गुरमाळे यांनी केले.

# दर्यापूर-अंजनगाव सुर्जी मार्गावर रात्री ८.३० नंतर बससेवा बंद

## प्रहारचा अतिरिक्त बसफेरीचा आग्रह, आंदोलनाचा इशारा

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**



दर्यापूर-अंजनगाव सुर्जी या प्रमुख मार्गावर रात्री ८.३० वाजताची शेवटची बस गेल्यानंतर कोणतीही एसटी बस उपलब्ध नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत असल्याचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. याबाबत प्रहार जनशक्ती पक्षाचे उपजिल्हा प्रमुख शंभू श्रीकृष्ण मालठाणे यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या दर्यापूर आगार व्यवस्थापकांना निवेदन देऊन अतिरिक्त बसफेरी सुरू करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, दर्यापूर मतदारसंघातील अंजनगाव सुर्जी हे प्रमुख शहर असून या शहराशी दर्यापूर तसेच परिसरातील १२ ते १५ गावांचा दैनंदिन संपर्क आहे. या मार्गावरून दररोज विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक व कामगार मोठ्या संख्येने प्रवास करतात. मात्र रात्री ८.३० ची बस गेल्यानंतर दर्यापूरहून अंजनगाव सुर्जीकडे येण्यासाठी कोणतीही नियमित एसटी बस उपलब्ध नसते.विशेषतः दर गुरुवारी दर्यापूर शहरात आठवडी बाजार भरत असल्याने अंजनगाव सुर्जी व परिसरातील व्यापारी मोठ्या संख्येने दर्यापूर येथे जातात. बाजारातील व्यवहार आटोपण्यास उशीर झाल्यास ८.३० ची शेवटची बस निघून गेलेली असते.

त्यामुळे व्यापारी व इतर प्रवाशांना खासगी वाहनांना हात दाखवून किंवा अधिकचे भाडे देऊन अंजनगाव सुर्जी गाठावे लागते.

रात्रीच्या वेळेस महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच ग्रामीण भागातील प्रवाशांना खासगी वाहनांवर अवलंबून राहणे गैरसोयीचे व असुरक्षित ठरू शकते. या मार्गावरील १२ ते १५ गावांतील नागरिकांनाही याचा मोठा फटका बसत आहे. एसटी ही सर्वसामान्य नागरिकांची परवडणारी व सुरक्षित सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असल्याने रात्रीची बसफेरी उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.या समस्येवर व्यवहार्य पर्याय म्हणून अमरावतीहून सुटणारी शेवटची बस अंजनगाव सुर्जी आगारात रात्री मुक्कामी ठेवून, दुसऱ्या दिवशी सकाळी अंजनगाव सुर्जी-दर्यापूर मार्गावर सोडण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. उपलब्ध बसच्या वेळापत्रकात आवश्यक ते नियोजन करून ही सुविधा सुरू केल्यास हजारो प्रवाशांना दिलासा मिळू शकतो.

या मागणीचा सकारात्मक विचार करून प्रवाशांना दिलासा द्यावा, अन्यथा प्रहार संघटनेच्या वतीने एसटी बसवर चढून आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

# मोर्शी तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती

## मदतीकरिता तहसीलदारांमार्फत जिल्हाधिकारी यांना निवेदन

**मोर्शी/वार्ताहर**



तालुक्यात निर्माण झालेल्या गंभीर दुष्काळसदृश परिस्थितीची तातडीने पाहणी करून कोरडा दुष्काळ जाहीर करावा व शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण जनतेला तातडीने विशेष आर्थिक मदत व सवलती देण्याबाबत तहसीलदारां मार्फत जिल्हाधिकारी यांना निवेदन आजाद समाज पार्टी (कांशीराम)च्या वतीने देण्यात आले.

मोर्शी तालुक्यातील शेतकरी आज नैसर्गिक संकटासोबतच आर्थिक संकटाच्या विळख्यात सापडलेला आहे. खरीप हंगामात अपेक्षित पाऊस न पडणे, पावसामध्ये मोठे खंड पडणे, पिकांना आवश्यक त्या वेळी पाणी उपलब्ध न होणे आणि परिणामी पिकांची झालेली दयनीय अवस्था यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.शेतकऱ्यांनी कर्ज काढून, उधारी करून, घरातील पैसा खर्च करून बियाणे, खते, औषधे व मजुरीचा खर्च केला. मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे त्यांच्या संपूर्ण हंगामावर संकट आले आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यांसह विविध खरीप पिकांच्या उत्पादनावर मोठा परिणाम होत असून अनेक शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन मिळण्याची शक्यता कमी झाली आहे.

सरकारी कार्यालयांमध्ये बसून केवळ कागदावरील पर्जन्यमानाची आकडेवारी पाहून परिस्थिती सामान्य असल्याचे गृहीत धरणे हा शेतकऱ्यांवरील अन्याय ठरेल. खरी परिस्थिती पाहायची असेल तर अधिकाऱ्यांनी शेताच्या बांधावर जाऊन पिकांची अवस्था पाहावी. शेतकऱ्यांच्या डोळ्यातील चिंता आणि त्यांच्या शेतातील उभ्या पिकांची परिस्थिती शासनाने प्रत्यक्ष पाहणे आवश्यक आहे.दुष्काळ हा केवळ पाऊस कमी पडण्याचा विषय नाही; त्याचा परिणाम शेती, पशुधन, पिण्याचे पाणी, रोजगार, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि संपूर्ण कुटुंबाच्या उपजीविकेवर होतो. त्यामुळे मोर्शी तालुक्यातील प्रत्येक गावाची वस्तुनिष्ठ पाहणी करून पर्जन्यमान, जमिनीतील ओलावा, पिकांची स्थिती, जलसाठे, भूजल पातळी आणि प्रत्यक्ष पीकनुकसान यांचा एकत्रित विचार करून तातडीने अहवाल तयार करण्यात यावा.

मोर्शी तालुक्यातील सद्यस्थितीची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून, उपलब्ध शासकीय निकषांनुसार दुष्काळसदृश परिस्थितीचे मूल्यांकन करावे, पात्रता आढळल्यास मोर्शी तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्यासाठी शासनाकडे तातडीने प्रस्ताव पाठवावा, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत, पीकविमा नुकसानभरपाई, कर्जविषयक सवलती, वीजबिल सवलत, पाणी व चारा याबाबत तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी आजाद समाज पार्टी (कांशीराम)च्या वतीने जोरदार मागणी करण्यात येत आहे.याचे नेतृत्व आजाद समाज पार्टी (कांशीराम) मोर्शी तालुका अध्यक्ष अक्षय पांडे यांनी केले.

# विहिर बांधकामाच्या पैशांसाठी तिवसा पं. स. अडीच तास ठिय्या

## तिवसा तालुक्यातील ९० शेतकऱ्यांचे सुमारे ३ कोटी शासनावर थकीत, शेतकरी ३ वर्षांपासून रोहयो अंतर्गत विहीर बांधकामाचे देयकेपासून वंचित

**तिवसा/वार्ताहर**



अस्मानी आणि सुलतानी संकटातून कोरड्या दुष्काळाचा सामना करतांना शेतकऱ्यांना सरकारच्या चुकीच्या धोरणांचा सुद्धा सामना करावा लागतो आहे. तब्बल ३ वर्षांपासून एकट्या तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या रोहयो अंतर्गत उभारण्यात आलेल्या विहिरीच्या बांधकामाचे तब्बल ३ कोटी शासनाकडे थकीत असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. आधीच कोरड्या दुष्काळाचा झळा शेतकऱ्यांना सोसाव्या लागत असतांना आता उसनवारी, कर्जबाजारी आणि सोनेविकून अन्नधान्य विकून उभारण्यात आलेल्या विहिरीच्या बांधकामाचे पैसे निघत नसल्याने संतप्त शेतकऱ्यांसह सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे यांच्या कॅबिनपुढे अडीच तास ठिय्या आंदोलन केले आहे.

तिवसा तालुक्यातील असे ९० शेतकरी असून, त्यामध्ये विहिरीसह गुरांचे गोठे बांधकाम करणाऱ्या शेतकरी लाभार्थ्यांच्या समावेश आहे.यामध्ये वर्ष २०२४ -२५ मधील ४ लाख ४७ हजार, वर्ष २०२५ - २६ मधील १कोटी ८७लाख १०हजार, वर्ष २०२६ - २७ मधील ६७लाख ५६हजार यामध्ये पंचायत समिती स्तरावरील तब्बल १ कोटी ३१लाख ७५ हजार १४४ रुपये शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहिती यावेळी पंचायत समिती गटविकास अधिकारी यांनी दिली आहे. यासंदर्भात रोहयो उपजिल्हाधिकारी यांच्यासह जिल्हाधिकारी अमरावती, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती, उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक रोहयो यांना पंचायत समिती कार्यालयाकडून निधीच्या विनंतीचे पत्र पाठवण्यात येणार असल्याचे लेखी आश्वासन देण्यात आले.

येत्या ८ दिवसात तालुक्यातील ९० शेतकऱ्यांना रोहयो अंतर्गत विहिरी, गुरांचे गोठे किंवा इतरही योजनेतील बांधकामाचे पैसे शेतकऱ्यांना मिळाले नाही.

तर, सरकार आणि प्रशासन यांना झोपेतून जागे करण्यासाठी पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या भजनाचा कार्यक्रम आयोजित करणार असल्याचा इशारा यावेळी प्रशांत कांबळे यांनी दिला आहे. त्याशिवाय, शेतकऱ्यांना त्यांच्या सहकुटुंब घेऊन पंचायत समिती आवारातच येत्या काळात दसरा आणि दिवाळी साजरी करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले आहे.

यावेळी अमोल मरसकोल्हे, उषा घोम, नथुजी बेलसरे, पन्नालाल कोचर. ज्योती गावंडे, शंकर उईके, सुनील टापरे, रामदास निस्ताने, प्रमोद बंड, अशोक कुरळकर, दिलीप तिखे, अनिल बेलसरे, शिवम तिथे, गजानन जाधव, दिलीप वाघ, हर्षा वनवे, विठ्ठल डमके, संदीप वानखडे, रवी काकडे, जगदीश साबळे, उत्तमराव येरणे, महेश ढेंगे, माया वाघ, विजय कुरळकर, कैलास पुरी, भूषण गाठे, प्रभाकर भोयर, बाबाराव राऊत, शफिक शहा, दिनेश वानखडे, दिनेश मनवर यांच्यासह अनेक शेतकऱ्यांची उपस्थितीती होती.

# संक्षिप्त

## अरूणोदय इंग्लिश स्कूलमध्ये वृक्षरूपी गणपती संकल्पना



**अमरावती-** व्ही.एम.व्ही. परिसरातील अरुणोदय इंग्लिश स्कूल व ज्यू. कॉलेज ऑफ सायन्स येथे वृक्षगणपतीचे पूजन उत्साहात पार पडले. गणपतीचे पूजन अरूणोदय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. वसंत लुंगे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला अरूणोदय शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ. भारती लुंगे, प्राचार्या विशाखा नाफडे, उपप्राचार्या सीमा कुथे, अरुणोदय इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका शिल्पा पाजनकर, उपमुख्याध्यापिका निता काळमेघ, कार्यालयीन अधीक्षिका रेखा राऊत उपस्थित होते.वृक्षाला जीवनपयोगी साहित्यांनी सजवून गणपतीचे रूप देऊन त्याची पूजाअर्चा व आरती करण्यात आली. वर्ग १० वीच्या विद्यार्थ्यांनी गणपतीच्या विविध अंगाचे व प्रतिकांचे महत्व सांगितले. समाजाला पर्यावरणाचे महत्व या संकल्पनेतून पटवून देण्याचा प्रयत्न करून झाडे लावा व झाडे जगवा जेणे करून वसुंधरेचे आपण जतन करू असे उद्गार याप्रसंगी डॉ. वसंत लुंगे यांनी काढले.

## बीएमडी तपासणी शिबिराला प्रचंड प्रतिसाद; १९५ रुग्णांची बीएमडी चाचणी



**अमरावती-** डॉ. हेडगेवार हॉस्पिटलमध्ये आयोजित बीएमडी नि:शुल्क तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिरात १९५ रुग्णांची बीएमडी तपासणी करण्यात आली . गणेशोत्सवात आयोजीत या शिबिरात रुग्ण तपासणी अस्थिरोग तज्ञ व सर्जन डॉ.अभिलाष पोहोकार आणि डॉ.मंगेश नवले यांनी केली. त्यांना डॉ . अवंतिका कोटेवार आणि डॉ . वर्षा केसवानी यांनी सहकार्य केले . शिबिराविषयी रुग्णांनी समाधान व्यक्त केले आणि असेच शिबिर वरचेवर आयोजित करावेत, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. सन फार्मा कंपनीचे संदिप कुमार आणि गोपाल भागवतकर तसेच हॉस्पिटलच्या आरती करवले , सोनाली पेंढारकर , ज्ञानश्वरी जुमळे , प्रतिक भस्मे , राहुल लोंढे , धनश्री चव्हाण यांच्यासह कर्मचारी वर्गाने शिबिरासाठी परिश्रम घेतले.

## अभिनव देशमुखची लंडनमध्ये भरारी



**चांदूर रेल्वे-** तालुक्यातील पत्रकार निशिकांत कदम (देशमुख) यांच्या मुलाने लंडन सारख्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठात घवघवीत यश संपादन करून तालुक्याचा नावलौककि वाढवला आहे. अभिनव देशमुख यांनी लंडन विद्यापीठ, रॉयल हॉलोवे अँड बेडफोर्ड न्यू कॉलेज मधून अप्लाइड डेटा सायन्स आणि सायबर सिक्युरिटी या विषयात गुणवत्तेसह विज्ञान पदव्युत्तर (मास्टर ऑफ सायन्स) पदवी प्राप्त केली आहे. त्यांचा पदवीदान सोहळा १४ डिसेंबर २०२६ रोजी लंडन येथे पार पडणार आहे.सायबर सिक्युरिटी सारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि आधुनिक काळाची गरज असलेल्या क्षेत्रात मेरीट सह पदवी मिळवल्याबद्दल अभिनवचे सर्व स्तरातून कौतुक आणि अभिनंदन होत आहे.या यशाबद्दल पत्रकार संघ, सामाजिक,शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनव देशमुख तसेच देशमुख परिवाराचे अभिनंदन करत असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## 'जागतिक ओझोन दिना' निमित्त लेख लेखन स्पर्धा



**चांदुर रेल्वे-** वनस्पतिशास्त्र विभागाने 'ओझोन थराच्या संवर्धनात वनस्पतिशास्त्रज्ञाची भूमिका' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी लेख लेखन स्पर्धा आयोजित केली होती. संवर्धन धोरणे, प्रदूषे णाचा प्रभाव आणि नैसर्गिक आपत्तींसारखे ज्वलंत मुद्दे यांचा समावेश करून विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या लेखांपैकी सर्वोत्तम लेखाची निवड प्रकाशनासाठी करण्यात आली. या कार्यक्रमाचे संचालन वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख डॉ. मिनल जे. केचे यांनी केले. राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर आणि समन्वयक प्रा. एस. ए. वाणी यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाबद्दल त्यांचे अभिनंदन केले. यावेळी वनस्पतिशास्त्र विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. संपदा पाथरकर आणि डॉ. पी. आर. सरदार उपस्थित होते.

## शनिवारी 'संक्षिप्त घरयादी' बाबत प्रशिक्षण

**अमरावती-** जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्याच्या पूर्वतयारीसाठी जिल्ह्यात संक्षिप्त घरयादी आणि गणना गट तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. हे काम अधिक प्रभावीपणे करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे शनिवारी, २६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता अर्धदिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.संक्षिप्त घरयादी हा जनगणनेचा एक अत्यंत मूलभूत दस्तऐवज असल्याने त्यात कोणत्याही त्रुटी राहू नयेत, यासाठी हे विशेष प्रशिक्षण आयोजित केले आहे. जनगणना संचालनालयाचे (मुंबई) सहाय्यक संचालक प्रविण भगत आणि ऋषीकेश पाथरे हे उपस्थित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणार आहेत.

जिल्ह्यातील सर्व ग्रामीण व शहरी क्षेत्रातील चार्ज जनगणना अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी, नायब तहसीलदार, कार्यालय अधीक्षक, जनगणना लिपिक, तांत्रिक सहाय्यक तसेच महानगरपालिकेचे शहर जनगणना अधिकारी आणि झोनचे सर्व चार्ज अधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे. जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी अमरावती, संतोष काकडे यांनी सर्व संबंधितांना प्रशिक्षण आदेश जारी केले असून, या प्रशिक्षणास सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# निवडणूक आयोग स्वायत्त असायला हवा?

**राज्य निवडणूक आयोग सोडाच जिथे केंद्रीय निवडणूक आयोगातल्या २ आयुक्तांनाच गुंडाळून ठेवले आणि त्यांना अंधारात ठेऊन किंवा त्यांच्या मताला अजिबात किंमत न देता जे निर्णय राबवले जात आहेत यावरून एक गोष्ट स्वच्छ आहे निवडणूक आयोग स्वायत्त असायला हवा हे आता पुस्तकापुरते मर्यादित आहे.**




इंडियन एक्स्प्रेस वर्तमानपत्राच्या कालच्या मुख्य पानावरच्या या मथळ्याखालच्या '14 times in 10 months, two Election Commissioners objected on record to poll panel steps बातमीने देशांत खळबळ उडवून दिली आहे. २०२५ च्या अखेरीस, महापालिका निवडणुकांच्या आधी जेंव्हा महाराष्ट्रातील विरोधी पक्षांचे नेते आम्ही राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना भेटायचो तेंव्हाच लक्षात यायचे की यांना कुठलेच अधिकार नाहीत. हे मी जाहीरपणे अनेकदा बोललो आहे, निवडणूक आयोगाच्या कारभारावर मी आणि माझ्या पक्षाने उघडउघड शंका म्हणा आरोप म्हणा काहीही म्हणा, पण ते आम्ही केलेत. आम्ही जे बोलत होतो त्याची सत्यता या बातमीत तुम्हाला सापडेल.

राज्य निवडणूक आयोग सोडाच जिथे केंद्रीय निवडणूक आयोगातल्या २ आयुक्तांनाच गुंडाळून ठेवले आणि त्यांना अंधारात ठेऊन किंवा त्यांच्या मताला अजिबात किंमत न देता जे निर्णय राबवले जात आहेत यावरून एक गोष्ट स्वच्छ आहे निवडणूक आयोग स्वायत्त असायला हवा हे आता पुस्तकापुरते मर्यादित आहे. स्वायत्ततेची व्याख्या भारतीय जनता पक्षाच्या अधीन अशी असेल तर तो स्वायत्त आहे, अन्यथा नाही. निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी जे आक्षेप नोंदवलेत ते गंभीर आहेत, ते नाकारणे मुख्य निवडणूक आयुक्तांना म्हणजेच ज्ञानेश कुमारांना शक्यच नाही, त्यामुळे ते जे वागले यामागचा कर्ताकरविता नक्की कोण होता, आहे इतके सांगितले तरी पुरेसे आहे.

सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी या दोन निवडणूक आयुक्तांनी गेल्या१० महिन्यांत १४ वेळा निवडणूक आयोगाच्या कारभारावर ऑन रेकॉर्ड ताशेरे ओढले आणि तरीही ढिम्मपणे निवडणूक आयोगाला जे करायचे होते तेच त्यांनी केले. बरे मुळात सध्या निवडणूक आयोगात एकूण तीन आयुक्त आहेत: एक मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि दोन निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू व विवेक जोशी. यातल्या दोघांनी आक्षेप नोंदवलेत. याचा अर्थ मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे मनमानी करत निर्णय घेत होते असे चित्र समोर येते. पण खरे तर त्यांना ते निर्णय घ्यायला लावले जात होते. बरे हे १४ महिन्यातले आक्षेप आहेत. ज्ञानेश कुमार यांची नियुक्तीच झाली फेब्रुवारी २०२५ ला म्हणजे आल्या आल्या त्यांनी त्यांच्या बॉसला खुश करायला सुरुवात केली.

इतर २ आयुक्तांनी जे आक्षेप नोंदवले तो थोडक्यात नोंदवतो,मतदार नोंदणी, नावे वगळणे आणि मतदारयादीच्या सॉफ्टवेअरशी संबंधित काही आदेश आयोगाच्या मंजुरीशिवाय निघाल्याचे त्यांनी लेखी म्हटले आहे.

'फॉर्म ६' (एसआयआर) मध्ये अर्जदाराचे किंवा त्याच्या कुटुंबीयांचे नाव मागच्या एसआयरमध्ये होते का असे विचारले. हे विचारण्याचा अधिकार आयोगाला नाही त्यासाठी कायद्यात बदल करावा लागेल असे या दोघांचे म्हणणे होते.

स्थानिक निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांची शक्ती पूर्ण कमी करून यादीत बदल करायचे नाही करायचे याचा निर्णय जवळपास काढून टाकला गेला आणि यादीत बदल करण्यासाठी सॉफ्टवेअरमध्ये स्थानिक निवडणूक अधिकाऱ्याला जवळजवळ कुठलेच अधिकार उरले नाहीत.

गोव्यात स्थानिक अधिकाऱ्यांनी कागदपत्रे तपासून ९७ जण पात्र असल्याचे ठरवले; पण सॉफ्टवेअरमध्ये त्यांची नावे परत समाविष्ट करण्याची सोय वेळेत उपलब्ध झाली नाही. परिणामी अंतिम यादीत त्यांची नावे आली नाहीत. अधिकारी मतदार पात्र आहे म्हणतो,तरी संगणकामुळे त्याचे नाव यादीत येत नसेल, तर जबाबदार कोण?

पश्चिम बंगालमध्ये अधिकाऱ्यांनी समाविष्ट केलेल्या मतदारांविरुद्ध आयोगाच्या वतीने अपील दाखल करण्याचा अधिकार कोणी दिला. (फक्त माहिती म्हणून पण पश्चिम बंगालमध्ये १६.१० लाख अपील केली गेली. ती सगळी आयोगाने केली असे सरसकट म्हणणार नाही पण ती मोठ्या प्रमाणावर केली असण्याची शक्यता आहे आणि ते देखील कुठलेही अधिकार नसताना)

असे इतर आक्षेप आहेत. याचा अर्थ काय मतदार याद्यांमध्ये हवे तसे फेरफार केले गेले, आणि स्थानिक निवडणूक नोंदणी अधिकारी ते राज्य कोणालाच कोणते अधिकार ठेवले नाहीत. जिथे इतर निवडणूक आयुक्तांनाच विचारले नाही तिथे बाकीच्यांचे काय? ज्ञानेश कुमार हे फेब्रुवारी २०२५ ला मुख्य निवडणूक आयुक्त झाले तेंव्हापासून, बिहार, आसाम, केरळ, तामिळनाडू, पुदुचेरी आणि पश्चिम बंगाल या राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका झाल्या. आणि महाराष्ट्रात तर महापालिकांसकट इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या. या सगळ्यातले निकाल आपण बघितले आणि महाराष्ट्रात ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या वेळेस इथला राज्य निवडणूक आयोग कसा दिल्लीकडे डोळे लावून बसतो हे तर आम्ही पाहिले आणि त्याचे परिणाम पण सोसले.

थोडक्यात काय तर, 'मॅच फिक्सिंग' सुरु होते महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसकट सगळे पक्ष बोलत होते जे पुराव्याने सिद्ध झाले आहे. ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याशिवाय आता पर्याय नाहीच आणि त्यांच्या मागच्या बोलवत्या धन्याची पण चौकशी व्हायला हवी. अर्थात ती कोण करणार हा प्रश्नच आहे कारण सगळेच गुडघ्यात वाकलेत. पण चौकशी व्हायला हवीच.

दोन्ही निवडणूक आयुक्त पाठीचा कणा ताठ ठेऊन आक्षेप नोंदवत होते याबद्दल त्यांचे अभिनंदन. यांच्याकडून प्रेरणा घेऊन असेच अनेक अधिकारी आता बोलायला सुरुवात करतील हे नक्की. आणि मुख्यतः एक्स्प्रेस समूहाचं मनापासून अभिनंदन. त्यांनी दाखवलेली पत्रकारिता खरंच वाखाणण्याजोगी आहे.

महापालिका निवडणुका झाल्यांनतर सुद्धा महाराष्ट्र सैनिक वेळोवेळी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर आक्षेप नोंदवत होते. आमचे काम सुरु होतेच आणि इतर विरोधी पक्षांचे पण सुरु होते. आता माझी सगळ्या विरोधी पक्षांना विनंती आहे या खुलाश्यानंतर तुमच्या लक्षात आले असेल की पहिली लढाई ही निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात आहे ती अधिक ताकदीने एकजुटीने करावी लागेल. आयोगाला हाताला धरून एसआयआर आणि मतदार याद्या यात घोटाळे करून भाजपने निवडणुका कशा जिंकल्या हे आता दिसलेच आहे. आता यातला पुढचा टप्पा आहे तो म्हणजे ईव्हीएम विरोधातला. स्वायत्त नसलेला निवडणूक आयोग आणि ईव्हीएम ही दोन अस्त्र आहेत या भाजप सरकारची. आता सगळ्या विरोधी पक्षांनी ईव्हीएमच्या ऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका व्हायला पाहिजेत यासाठी जन आंदोलन उभे केले पाहिजे.

मुख्य निवडणूक आयुक्तांचा राजीनामा हा तर व्हायलाच हवा पण या असल्या कणाहीन निवडणूक आयोगाला हाताशी धरून जे सरकार निवडून आले त्या सरकारने राजीनामा द्यायला हवा. आम्ही बहुमताने निवडून आलोत असे सांगणाऱ्या सरकारच्या निवडीनंतर रस्त्यावर कुठेही जल्लोष दिसला नव्हता यातच सगळे स्पष्ट होत आहे. हेच मी केव्हापासून सांगतोय.

त्यामुळे जर निवडणूक आयोग अपेक्षेप्रमाणे स्वायत्त झाला तर आणि तरच सत्ताधाऱ्यांना जमिनीवर आणता येईल हेच अंतिम सत्य आहे हे सगळ्यांनी लक्षात घ्या नाहीतर ही लढाई अंतहीन आहे.

**राज ठाकरे**

(ता.क. :- भाजप धार्जिणे पत्रकार नेहमी विचारतात की तुमच्या सभेला गर्दी होते मग मते कुठे जातात. आज त्यांना उत्तर मिळाली असतील की आमची मते कोण चोरते आणि त्यांना कशी आणि कोणाची मदत मिळते.)

# रशियातील निवडणुकीचा अन्वयार्थ!

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या युनायटेड रशिया पक्षाने ड्यूमाच्या (पार्लमेंटचे कनिष्ठ सभागृह) निवडणुकीत दणदणीत विजय मिळवला आहे. १८ ते २० सप्टेंबर असे तीन दिवस मतदान घेण्यात आले. ड्यूमाच्या एकूण ४५० पैकी ३५५ जागा जिंकून युनायटेड रशियाने तीन चतुर्थांशपेक्षा जास्त बहुमत मिळवले आहे. पक्षाने ३४३ जागांचा जुना विक्रम मोडीत काढला आहे. या पाशवी बहुमतामुळे घटनादुरुस्तीसाठी पक्षाला इतर कोणत्याही पक्षाची गरज लागणार नाही. २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर आक्रमण केल्यानंतर झालेली ही पहिलीच संसदीय निवडणूक होती.

**जनतेचा कौल की दहशतीचा विजय?**

सत्ताधारी पक्षाचा दावा आहे की, जनता अध्यक्ष पुतिन यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. १९९९ पासून पुतिन सत्तेवर आहेत. मात्र विरोधकांचा आरोप आहे की, ही निवडणूक मुक्त वातावरणात झालीच नाही.युद्धाला विरोध करणाऱ्या 'याब्लोको' पक्षाला निवडणूक लढवण्यास बंदी घालण्यात आली होती. युक्रेनविरोधात लढणाऱ्या ४९ माजी सैनिकांना युनायटेड रशियाने उमेदवारी दिली होती आणि ते आता ड्यूमात जाणार आहेत.सरकारने रशियन नागरिकांना सैनिकांच्या समर्थनार्थ मतदान करण्याचे आवाहन केले होते. विशेष म्हणजे, रशियाने युद्धात बळकावलेल्या युक्रेनच्या प्रदेशातही मतदान घेण्यात आले, ज्याचा ब्रिटन, ऑस्ट्रेलिया आणि कॅनडाने संयुक्त निवेदन काढून निषेध केला आहे.या निवडणुकीत ५९ टक्के मतदान झाल्याचे सांगण्यात येते. युनायटेड रशियानंतर कम्युनिस्ट पक्षाला ४०, एलडीपीआरला २५ आणि न्यू पीपल्स पार्टीला २० जागा मिळाल्या.

**लोकशाहीचा देखावा**

पुतिन यांचे अनेक राजकीय विरोधक एकतर तुरुंगात आहेत, अज्ञातवासात आहेत किंवा त्यांचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. मुख्य विरोधक अलेक्सी नवलनी यांचा २०२४ मध्ये आर्क्टिक तुरुंगात मृत्यू झाला.युरोपियन युनियनच्या अधिकाऱ्याने टीका केली आहे की, टीकाकारांना गप्प बसवून आणि आंतरराष्ट्रीय निरीक्षकांना बंदी घालून घेतलेल्या निवडणुकीला काही अर्थ उरत नाही.२००३ पासून युनायटेड रशिया ड्यूमात बहुमतात आहे. २०२१ मध्ये त्यांनी ३२४ जागा जिंकल्या होत्या. यंदा जरी आकडा वाढला असला, तरी त्यात रशियातील एकूण जनमताचे प्रतिबिंब नाही. सामान्य रशियन माणसाला युक्रेन युद्धातून लवकर बाहेर पडायचे आहे, पण त्याचा आवाज या निकालात दिसत नाही.हा विजय पुतिन यांचे हात बळकट करणारा असला, तरी तो लोकशाहीचा विजय आहे का, हा खरा प्रश्न आहे.

**अभय गोखले**

# 'निवडणूक आयोगाला जेलमध्ये पाठवा!'

## उद्धव ठाकरेंच्या आक्रोशाकडे दुर्लक्ष का करायचे?

उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या कारभारावर केलेली प्रखर टीका ही केवळ राजकीय संताप म्हणून झटकून टाकण्याची गोष्ट नाही, असे वाटते. शिवसेनेतील फूट, शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्हाबाबत निवडणूक आयोगाचा निर्णय, त्यानंतरची सर्वोच्च न्यायालयातील लढाई आणि आता निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर उपस्थित होत असलेले प्रश्न या संपूर्ण घटनाक्रमाकडे एकत्रितपणे पाहिले तर उद्धव ठाकरे यांच्या मनातील आक्रोश समजून घेणे आवश्यक आहे. शिवसेना हा केवळ एक राजकीय पक्ष नव्हता; तो बाळासाहेब ठाकरे यांनी उभा केलेला राजकीय वारसा होता. त्या पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह उद्धव ठाकरे यांच्या हातातून निघून जाणे हा त्यांच्या राजकीय प्रवासातील मोठा धक्का होता. निवडणूक आयोगाने घेतलेल्या त्या निर्णयाला उद्धव ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले असून प्रकरण अद्याप न्यायालयीन प्रक्रियेत आहे. त्यामुळे अंतिम न्यायालयीन निर्णय येण्यापूर्वी कोणाला दोषी ठरवणे योग्य नाही; पण त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केलेले प्रश्नच चुकीचे ठरत नाहीत. उलट,सर्वोच्च न्यायालयात या निर्णयाच्या प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत, त्यामुळे या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज अधिक वाढते.

माझ्या दृष्टीने उद्धव ठाकरे यांच्या वक्तव्याचे समर्थन म्हणजे त्यांच्या प्रत्येक आरोपाला न्यायालयाचा निकाल मानने नव्हे; तर त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना दाबून न टाकता त्यांची पारदर्शकपणे चौकशी झाली पाहिजे, याचे समर्थन होय. निवडणूक आयोग ही लोकशाहीतील अत्यंत महत्त्वाची संस्था आहे आणि म्हणूनच तिच्यावर प्रश्न उपस्थित झाले तर प्रश्न विचारणाऱ्यालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याऐवजी त्या प्रश्नांची उत्तरे देणे अपेक्षित आहे. जर निवडणूक आयोगाची प्रक्रिया स्वच्छ आणि पारदर्शक असेल, तर प्रश्नांची भीती कशाला? कागदपत्रे समोर ठेवा, निर्णयामागचे निकष स्पष्ट करा, कोणते पर्याय विचारात घेतले ते सांगा आणि जनतेच्या




मनातील शंका दूर करा. आज उद्धव ठाकरे अत्यंत कठोर शब्द वापरत आहेत.'निवडणूक आयोगाला जेलमध्ये पाठवा' अशी मागणी करत आहेत. तुरुंगवास हा अर्थातच आरोपांवर होत नाही; त्यासाठी कायदेशीर प्रक्रिया, तपास आणि न्यायालयीन निर्णय आवश्यक आहे. पण त्या कठोर विधानामागचा प्रश्न मात्र दुर्लक्षित करता येणार नाही. कारण ज्यांच्या राजकीय पक्षाचे नाव आणि चिन्ह एका निर्णयामुळे बदलले, ज्यांना त्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयाची दारे ठोठावावी लागली, त्या व्यक्तीने त्याच संस्थेच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केला तर त्यामागची वेदना समजून घेण्याची संवेदनशीलता लोकशाहीत असली पाहिजे.

उद्धव ठाकरे यांच्याशी कोणाचे राजकीय मतभेद असू शकतात; त्यांच्या नेतृत्वावर टीका केली जाऊ शकते; त्यांच्या राजकीय निर्णयांवर प्रश्न विचारले जाऊ शकतात. पण एखाद्या नेत्याचे राजकीय नुकसान झाले म्हणून त्याचा प्रत्येक प्रश्न खोटा ठरतो, असा लोकशाहीत कोणताही नियम नाही. आज उद्धव ठाकरे प्रश्न विचारत आहेत, उद्या तो प्रश्न कोणत्याही पक्षाचा नेता किंवा सामान्य मतदार विचारू शकतो. म्हणूनच हा विषय केवळ उद्धव ठाकरे विरुद्ध निवडणूक आयोग असा पाहणे मला चुकीचे वाटते. हा प्रश्न आहे मतदाराच्या विश्वासाचा. निवडणूक आयोगाने स्वतःवरील विश्वास टिकवण्यासाठी अधिक पारदर्शकता दाखवली पाहिजे. आरोप खोटे असतील तर पुराव्यांसह खोडून काढा; निर्णय योग्य असतील तर त्यामागची कारणे जनतेसमोर मांडा; आणि कुठे अनियमितता आढळली तर कायदेशीर प्रक्रिया सुरू करा. लोकशाहीत प्रश्न विचारणाऱ्याचा आवाज दाबणे सोपे असते; पण प्रश्नांची उत्तरे देणे ही खरी कसोटी असते. उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेबाबत सहानुभूती याच कारणासाठी आहे. त्यांनी गमावलेले पक्षनाव,चिन्ह आणि त्यानंतरची न्यायालयीन लढाई ही त्यांच्या राजकीय आयुष्यातील साधी घटना नाही. त्यातून निर्माण झालेली वेदना आणि त्यातून निर्माण झालेले प्रश्न समजून घेतले पाहिजेत. माझे समर्थन व्यक्तीपूजेचे नाही; ते प्रश्न विचारण्याच्या अधिकाराचे, पारदर्शकतेच्या मागणीचे आणि मतदाराच्या विश्वासाचे समर्थन आहे.

निवडणूक आयोग कोणत्याही पक्षाचा मित्र किंवा शत्रू नसावा; तो मतदाराच्या मताचा निष्पक्ष संरक्षक असला पाहिजे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या कठोर शब्दांना केवळ राजकीय भाषण म्हणून हसण्यापेक्षा त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची तथ्यात्मक तपासणी झाली पाहिजे. कारण शेवटी प्रश्न उद्धव ठाकरे जिंकले की हरले हा नाही; प्रश्न असा आहे की मतदाराचा विश्वास जिंकला जातोय का? सत्ता येते-जाते, पक्ष बदलतात, नेते बदलतात; पण लोकशाहीवरील विश्वास गेला तर त्याची किंमत संपूर्ण समाजाला मोजावी लागते. म्हणूनच उद्धव ठाकरे यांनी आज उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर मिळालेच पाहिजे आणि ते उत्तर राजकीय प्रतिआरोपांनी नव्हे, तर कागदपत्रांनी, नियमांनी, पारदर्शक चौकशीने आणि सत्याने दिले पाहिजे.

**ॲड. धनंजय देशमुख**

मो. ९२८४३८२१०२

जागतिक फार्मासिस्ट दिन

# आरोग्य यंत्रणेचे 'बॅकस्टेज हिरो' म्हणजे फार्मासिस्ट!

'आरोग्य हीच खरी संपत्ती आहे' असे म्हटले जाते. कोणत्याही देशाच्या प्रगतीचा पाया तिथल्या नागरिकांच्या आरोग्यावर अवलंबून असतो. आजच्या आधुनिक युगात वैद्यकीय क्षेत्र वेगाने प्रगती करत आहे. फार्मासिस्ट हे आरोग्य सेवा प्रणालीचे 'अनोळखी नायक' (अनसंग हिरो) आहेत. वैद्यकीय विज्ञान क्षेत्रातील त्यांच्या याच अमूल्य योगदानाचा गौरव करण्यासाठी दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी जगभरात 'जागतिक फार्मासिस्ट दिन' मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय फार्मास्युटिकल फेडरेशन 'द्वारे २५ सप्टेंबर १९१२ रोजी एफआयपी' ची स्थापना करण्यात आली. २००९ मध्ये इस्तंबूल, तुर्की येथे झालेल्या कौन्सिलच्या बैठकीत, हा स्थापना दिवस दरवर्षी 'जागतिक फार्मासिस्ट दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. फार्मासिस्टच्या कार्याबद्दल



लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना सन्मान देणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. फार्मासिस्टची भूमिका केवळ काउंटरवर औषधे विकण्यापुरती मर्यादित नसते.फार्मासिस्ट हे डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील असा मजबूत दुवा आहे, जो आरोग्याचा मार्ग अधिक सुकर करतो. डॉक्टरांनी रुग्णाला लिहून दिलेली औषधांचे अचूक मार्गदर्शन करणे,औषधांच्या सुरक्षिततेबद्दल आणि आजारांच्या प्रतिबंधात्मक उपायांबद्दल रुग्णाला जागरूक/समुपदेशन करणे, नवीन आजारांवर प्रभावी आणि जीवनरक्षक औषधे शोधणे,त्यांचे योग्य मिश्रण करणे आणि त्यांची निर्मिती करणे,महामारीच्या अत्यंत कठीण काळात, जेव्हा सर्व काही बंद होते, तेव्हा फार्मासिस्टनी आपली दुकाने अहोरात्र खुली ठेवून लोकांपर्यंत औषधे पोहोचवणे आणि लाखो लोकांचे प्राण वाचवणे (उदा .कोरोना काळ) इ कार्यात योगदान असते. एम्पॉवरिंग फार्मासिस्ट फॉर हेल्दीयर फ्युचर्स (आरोग्यदायी भविष्यासाठी फार्मासिस्टचे सक्षमीकरण) यावर्षी ही थीम राबवण्यात आली, ज्याचा उद्देश सुरक्षित औषध वापराला प्रोत्साहन देणे आणि जागतिक आरोग्य यंत्रणा अधिक मजबूत करणे हा आहे.

बदलत्या जीवनशैलीमुळे आज नवनवीन आजार डोके वर काढत आहेत. अशा परिस्थितीत केवळ डॉक्टरांवरच संपूर्ण ताण असणे योग्य नाही. जर फार्मासिस्टचे योग्य सक्षमीकरण केले, तर आरोग्य व्यवस्थेचा ताण कमालीचा कमी होऊ शकतो.आरोग्य साक्षरता वाढवणे: आजही ग्रामीण भागात आरोग्याविषयी पुरेशी जनजागृती नाही. सक्षम फार्मासिस्ट गावागावांत रुग्णांना योग्य सल्ला देऊन त्यांचे आरोग्य सुधारू शकतात. चुकीच्या औषधोपचाराला आळा: अनेकदा रुग्ण स्वतःच्या मनाने किंवा मेडिकल स्टोअरमधून चुकीची औषधे (सेल्फ मेडिकेशन) घेतात. फार्मासिस्ट सक्षम आणि जागरूक असतील, तर ते रुग्णांना या धोक्यांपासून वाचवू शकतात. प्राथमिक आरोग्य सेवा: किरकोळ आजारांवर (उदा. सर्दी, खोकला, प्रथमोपचार) योग्य सल्ला देण्याचे अधिकार आणि प्रशिक्षण फार्मासिस्टना दिल्यास प्राथमिक आरोग्य यंत्रणा अधिक मजबूत होईल.फार्मासिस्टना अधिक सक्षम करण्यासाठी -

फार्मसीच्या अभ्यासक्रमात तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि नव्या वैद्यकीय संशोधनांचा समावेश असावा. त्यांना वेळोवेळी डिजिटल हेल्थ टूल्सचे प्रशिक्षण दिले पाहिजे.जेव्हा एक फार्मासिस्ट सक्षम होतो, तेव्हा संपूर्ण समाज सुरक्षित होतो. फार्मासिस्टच्या सक्षमीकरणामुळे रुग्णांना वेळेवर, स्वस्त आणि अचूक औषधोपचार मिळतील. औषधांच्या अतिवापरामुळे (उदा. अँटीबायोटिक्सचा गैरवापर) निर्माण होणारे धोके टळतील. डिजिटल फार्मसीच्या माध्यमातून दुर्गम भागातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा पोहोचवणे सोपे होईल.

फार्मासिस्ट हे समाजाच्या उत्तम आरोग्याचे खरे रक्षक आहेत. ते आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा वापर करून रुग्णांचे जीवन सुकर करतात. आरोग्यदायी भविष्याचे स्वप्न पूर्ण करायचे असेल, तर फार्मासिस्टकडे केवळ 'औषध विक्रेते' म्हणून न पाहता 'आरोग्य रक्षक' म्हणून पाहिले पाहिजे. त्यांच्या ज्ञानाचा, कौशल्याचा आणि अनुभवाचा योग्य वापर करून त्यांना सक्षम करणे, हेच सुदृढ आणि निरोगी भारताच्या निर्मितीचे गमक आहेत म्हणूनच, जागतिक फार्मासिस्ट दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी या आरोग्य दूतांचे आभार मानू आणि आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक फार्मासिस्ट भगिनी बांधवांना मानाचा मुजरा करू या !

**डॉ विनोद पवार**

मो.९४२३४३३४५३



# गणेश विसर्जनासाठी मनपाची पर्यावरणपूरक तयारी

## शहरातील चार प्रमुख ठिकाणी १८ कृत्रिम टँक; झोननिहायही विसर्जनाची सुविधा

■ प्रतिनिधी | अकोला ■

गणेशोत्सवाच्या अंतिम टप्प्यात गणेशमूर्ती विसर्जनासाठी अकोला महानगरपालिका प्रशासन सज्ज झाले आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसह घरगुती गणपतींचे विसर्जन सुरळीत आणि पर्यावरणपूरक पद्धतीने व्हावे, यासाठी शहरातील चार प्रमुख ठिकाणी एकूण १८ कृत्रिम टँक उभारण्यात आले आहेत.



सिटी कोतवालीजवळील मुख्य गणेश घाट येथे सात, हरिहरपेठ येथील इदगाहजवळ पाच, निमवाडीतील लक्झरी बसस्थानकाच्या मागे चार, तर हिंगणा येथे दोन कृत्रिम टँकची व्यवस्था करण्यात आली आहे. या टँकमध्ये प्लास्टर ऑफ पॅरिस तसेच शाडू मातीपासून तयार करण्यात आलेल्या चार ते पाच फुटांपर्यंतच्या गणेशमूर्तींचे विसर्जन करता येणार आहे.

याशिवाय शहरातील विविध भागांत झोननिहाय नगरसेवक, सामाजिक संस्था व सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातूनही कृत्रिम विसर्जन टँकची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी मनपाकडून स्वच्छता, पाण्याची सुविधा तसेच विसर्जनानंतर गणेशमूर्ती घेऊन जाण्यासाठी ट्रॅक्टरची व्यवस्था करण्यात आली आहे.

पूर्व झोनमध्ये छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण, सातव चौक-जेठारपेठ चौक, छत्रपती शिवाजी महाराज पार्क, देशमुख फैल, छत्रपती संभाजी राजे उद्यान, जवाहरनगर, टी.व्ही.एस. डेल्टा-नेहरू पार्क चौक, श्री विश्वकर्मा मंदिर, मोठी उमरी, संगम ग्राउंड तसेच स्वराज्य गणेशोत्सव मंडळासमोरील परिसरात विसर्जनाची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

पश्चिम झोनमध्ये रेणुकानगर, डाबकी रोड येथील श्री बाभळेश्वर मंदिराजवळ, उत्तर झोनमध्ये आकोट फैल चौकातील हनुमान मंदिराजवळ, तर दक्षिण झोनमध्ये छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, केशवनगर, खडकी आणि श्री सिद्धेश्वर मंदिर परिसर, मलकापूर येथे कृत्रिम विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली आहे. गणेश विसर्जनादरम्यान जलप्रदूषण टाळण्यासाठी सार्वजनिक मंडळे आणि घरगुती गणपतींचे विसर्जन मनपाने उपलब्ध करून दिलेल्या कृत्रिम टँकमध्येच करण्याचे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे. पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जन करून गणेशोत्सवाची सांगता करण्याचे आवाहनही मनपाकडून करण्यात आले आहे.

# म्हातारीला कारने चिरडल्या प्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता

■ प्रतिनिधी | अकोला ■




गीता नगर बायपास परिसरात दिनांक १४ मार्च २०२४ रोजी सकाळी साडेसहा ते सात वाजण्याच्या सुमारास घडलेल्या अपघातप्रकरणी आरोपी सोहराव खान रुस्तम खान यांची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. या घटनेत सुलोचना डिगंबर नरवाडे या वृद्ध महिलेचा गंभीर दुखापतीनंतर उपचारादरम्यान मृत्यू झाला होता.

प्रकरणातील माहितीनुसार, स्विफ्ट डिझायर क्रमांक एमएच-३०-एएफ-१७३२ या वाहनाने गीता नगर बायपास परिसरातून वृद्ध महिला सुलोचना दिगंबर नरवाडे यांना काही अंतर फरफटत नेल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र सात दिवसांनी उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेची नोंद जुने शहर पोलीस स्टेशन येथे झाल्यानंतर पोलिसांनी प्रकरणाचा तपास सुरू केला. सदर प्रकरणाचा तपास तपास अधिकारी मीना देशमुख यांनी केला. तपासाअंती प्रकरणी दोषारोपपत्र न्यायालयासमोर आले आणि चौथे प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी पी. डी. पाटील यांच्या न्यायालयात त्याची सुनावणी झाली.

सुनावणीदरम्यान अभियोजन पक्षाने आपली बाजू मांडत संबंधित पुरावे व साक्षीदार न्यायालयासमोर सादर केले. दुसरीकडे, आरोपीच्या वतीने विधीज्ञ संजय कमल अशोक देशमुख व सहविधीज्ञ शोएब शेख यांनी प्रभावीपणे बाजू मांडत अभियोजन पक्षाच्या पुराव्यांची व साक्षीदारांच्या कथनांची कायदेशीर छाननी केली. बचाव पक्षाने मांडलेल्या विविध कायदेशीर बाबी, उपलब्ध पुरावे तसेच साक्षीदारांच्या जबाबांचा न्यायालयाने विचार केला. अभियोजन पक्षाकडून आरोपीविरुद्धचा आरोप कायदेशीररीत्या सिद्ध होत नसल्याचा बचाव पक्षाचा युक्तिवाद न्यायलयीन सुनावणीदरम्यान करण्यात आला.

संपूर्ण प्रकरणातील उपलब्ध पुरावे व न्यायालयीन नोंदींचा विचार केल्यानंतर न्यायालयाने आरोपी सोहराव खान रुस्तम खान यांची निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. संजय कमल अशोक देशमुख आणि ॲड. शोएब शेख यांनी प्रभावी कायदेशीर बाजू मांडली आणि आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

# राष्ट्रीय आयुर्वेद दिनानिमित्त पातूरमध्ये भव्य आयुर्वेद जनजागृती रॅली

## ‘आयुर्वेदाचा स्वीकार करा – निरोगी जीवन जगा’चा संदेश



■ प्रतिनिधी | पातूर ■

राष्ट्रीय आयुर्वेद दिनानिमित्त दि. २१ सप्टेंबर रोजी वंदनाताई जगन्नाथराव धोने ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालय, पातूर येथील स्वास्थ्यवृत्त व योग विभागाच्या वतीने भव्य आयुर्वेद जनजागृती रॅली काढण्यात आली. आयुर्वेदाचे महत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे, निरोगी जीवनशैलीचा प्रसार करणे तसेच रोगप्रतिबंधाबाबत जनजागृती करणे हा रॅलीचा प्रमुख उद्देश होता. महाविद्यालयाच्या परिसरातून रॅलीचा उत्साहात शुभारंभ झाला. यावेळी प्राध्यापक, वैद्यकीय शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी हातात घेतलेले आयुर्वेद, योग, आरोग्यसंवर्धन, रोगप्रतिबंध, पर्यावरण संवर्धन आणि निरोगी जीवनशैलीचे संदेश देणारे आकर्षक फलक नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते. ‘आयुर्वेदाचा स्वीकार करा, निरोगी जीवन जगा’, ‘निरोगी व्यक्ती, निरोगी समाज, निरोगी पृथ्वी’ अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. योग्य आहार-विहार, दिनचर्या, ऋतुचर्या, योग तसेच आयुर्वेदिक जीवनशैलीचा अवलंब केल्यास आरोग्य संवर्धनास मदत होते.




श्री गायत्री माता गणेशोत्सव मंडळ
भारती प्लॉट बाळापूर नाका जूने शहर अकोला

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा थाटात पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■



महानगरात परंपरागत रूपाने गणेशोत्सव व श्री च्या मिरवणुकीचे कुशलतेने सुयोग्य संचालन व नियंत्रण करणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने गतवर्षी देखावे साकार केलेल्या व गणेशोत्सव मंडळ आखाडे व मिरवणुकीत भोजन व जलपान देणाऱ्या संस्थांचा पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. बुधवारी स्थानीय हॉटेल ग्रीनलँड सभागृहात सार्वजनिक गणेशोत्सव।मंडळाचे अध्यक्ष अड.मोतीसिह मोहता यांच्या अध्यक्षतेत संपन्न या पुरस्कार वितरण सोहळ्यात मंचावर गो सन्मान अभियानाचे राज्य प्रभारी महंत मनीष महाराज चंद्रपूर राज्यसह प्रभारी महंत त्र्यंबक गिरी महाराज, काँग्रेसचे महानगर अध्यक्ष महेंद्र गवई, नगरसेवक निलेश देव, मंडळाचे कार्याध्यक्ष हरीश आलीमचंदानी, उपाध्यक्ष मनोहर पंजवानी, केशवराव पातोड, मनोज खंडेलवाल, महासचिव सिद्धार्थ शर्मा, एड सुभाषसिंह ठाकुर, विजय तिवारी, सचिव संतोष पांडे, नीरज शाह, मंगेश काळे, जयंत सरदेशपांडे, दिलीप खत्री आदी मान्यवर उपस्थित होते. गणरायाच्या आरतीने या कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला.

जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे दत्ता दयाराम सुर्वे, डिगांबर दयाराम सुर्वे व गजानन दयाराम सुर्वे रा. मु.पो. लाठी, पो. शेलू खुर्द (बाजार), ता. मंगरूळपीर, जि. वाशीम हे ईक्वीटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, शाखा वाशिम यांचे कडून रु. ९९,९९,०००/- ( नव्यान्नव लाख रुपये फक्त) रकमेचे कर्ज घेत असून सदरहू कर्ज हे खालील मालमत्ता बँकेकडे गहाण ठेऊन घेत आहेत. त्या मालमत्तेचे वर्णन - मौजे शेलू खुर्द (बाजार), ता. मंगरूळपीर, जि. वाशिम येथील सर्वे क्र. ४०/१, प्लॉट क्र. ०३ मधील दक्षिणेकडील जागा क्षेत्रफळ १८२.९० चौ मी. म्हणजेच १९६८ चौ फुट या सदर प्लॉटवर बांधलेल्या 'श्री गजानन कॉम्प्लेक्स' या इमारतीमधील तळमजल्यावरील दुकान क्र. १, २ आणि ३ एकूण क्षेत्रफळ (super built up area) १३३.८३ चौ.मिटर म्हणजेच १४४० चौ. फुट व सदर प्लॉट क्र. ०३ मधील १००% अविभाजीत हिस्स्यासह ज्याच्या चतु:सीमा पूर्वेस - प्लॉट क्र. ०३ मधील उर्वरित जागा; पश्चिमेस - प्लॉट क्र. २; उत्तरेस - लोखंडे यांचा प्लॉट क्र. ०४; दक्षिणेस – लेआऊट रोड या प्रकारे आहेत. सदर प्लॉट हा वि. उपविभागीय अधिकारी, मंगरूळपीर यांनी रा.मा.क्र. एन.ए.पी.-३४/शेलू खुर्द ६/१९९९-२००० या प्रकरणातील आदेश दि. २४/०७/२००१ नुसार निवासी प्रयोजनार्थ बिनाशेतीकडे परावर्तीत केलेला आहे. येणेप्रमाणे सदरहू वरील वर्णनाच्या व चतु:सीमेच्या आतील मिळकती संबंधी इतर कुणासही कसल्याही प्रकारचा अधिकार, हक्क, हित संबंध, बोजा, गहाण किंवा काहीही वाद असल्यास त्यांनी आमच्याकडे सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसाचे आत लेखी हरकत संबंधित कागदपत्रांसह दयावी. वरील मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास सदर मालमत्ता ही बिन बोजा व बिन भानगडीची असल्याचे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कुणाची काहीही हरकत व उजर आमचे पक्षकारावर लागू व बंधनकारक राहणार नाही. करीता ही जाहीर नोटीस.

अकोला, दि. २४/०९/२०२६

ॲड. एस. डी. तायडे
जगदंबा नगर, खामगांव रोड,
शेगांव. मो. ९७३०८२९९२८

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १५३४/२०२६ — प्रोसेस नं.११७९७/२०२६
चौ.ता. २६/१०/२०२६ — दिनांक : १६/०९/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती विमल मुरलीधर वानखडे, वय अं. ७१ वर्ष, धंदा- घरकाम, २. सौ. राजश्री रविंद्र गोतमारे, वय अं. ५१ वर्षे, धंदा - घरकाम, रा. शिव नगर, पाण्याच्या टाकीजवळ, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला. ३. सौ. जयश्री निलेश फाटे, वय अं. ४८ वर्षे, धंदा - घरकाम, रा. अंजनगाव सुर्जी, पो. अंजनगाव, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती. ४. मोहन मुरलीधर वानखडे, वय अं. ४७वर्षे, धंदा - मजुरी, क्र. १व ४ रा. शिव नगर, पाण्याच्या टाकीजवळ, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला. ५. सौ. गायत्री नितीन जुमळे, वय अं. ४५ वर्षे, धंदा - घरकाम, रा. भारती प्लॉट, जुने शहर, बाळापूर रोड, अकोला, ता. जि. अकोला. ६. सौ. भाग्यश्री संदिप ढवळे, वय अं. ४३वर्षे, धंदा - घरकाम, रा. राठोड पंच बंगल्याजवळ, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मुरलीधर सखाराम वानखडे
**पत्ता :-** रा. शिव नगर, पाण्याच्या टाकीजवळ, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मुरलीधर सखाराम वानखडे यांचे दि. २१/०५/२०२४ रोजी आयकॉन हॉस्पीटल, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २६/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# ‘श्री गणेशा आरोग्याचा’ : गणेश मंडळांच्या परिसरात आरोग्य शिबिरे



■ प्रतिनिधी | अकोला ■

गणेशोत्सवाचे औचित्य साधून अकोला जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाच्या वतीने जिल्ह्यात 'श्री गणेशा आरोग्याचा २०२६' अंतर्गत ठिकठिकाणी आरोग्य शिबिरे घेण्यात येत आहेत.

या अभियानाच्या माध्यमातून गणेशोत्सवाला सामाजिक आरोग्यसेवेची जोड देण्यात आली आहे.

## ‘लोकसंवाद’च्या माध्यमातून आरोग्यविषयक मार्गदर्शन

या विशेष अभियानांतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्त सहकार्याने अकोला जिल्ह्यातील विविध मोठ्या गणेश मंडळांच्या परिसरात भव्य आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, जिल्हा माहिती कार्यालयातर्फे ‘लोकसंवाद’ कार्यक्रमाद्वारे जिल्हा आरोग्य यंत्रणेच्या सहकार्याने गणेश मंडळांच्या परिसरात आरोग्यविषयक जनजागृती करण्यात येत आहे. गणेशोत्सवाच्या काळात दर्शनासाठी नागरिक आणि भाविक मोठ्या संख्येने एकत्र येतात. हीच संधी साधून लोकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवणे, त्यांची मोफत आरोग्य तपासणी करणे, तज्ज्ञ डॉक्टरांचे वैद्यकीय मार्गदर्शन मिळवून देणे आणि विविध शासकीय आरोग्य योजनांची माहिती नागरिकांना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

# जीनियस चेस अकॅडमीच्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■



विवेक वर्धिनी विद्यालय, भांबेरी येथे १६ सप्टेंबर रोजी झालेल्या तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत जीनियस चेस अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध वयोगटांत अव्वल क्रमांक पटकावले. या कामगिरीच्या जोरावर अकॅडमीच्या अनेक विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

१४ वर्षे वयोगटात राज भारसाकळे याने प्रथम, प्रणव परघमोर याने द्वितीय, कौशिक पवार याने तृतीय, तर उत्कर्ष बाजोड याने पाचवा क्रमांक मिळविला. १७ वर्षे वयोगटात चिन्मय उंबरकार प्रथम, प्रणव विखे द्वितीय, विरान्त वानखडे तृतीय, तर उत्कर्ष भोजने याने पाचवा क्रमांक पटकावला.

१९ वर्षे वयोगटात मोहित भैय्या याने प्रथम, हर्षल परघरमोर याने तृतीय, तर अंश भैय्या याने पाचवा क्रमांक मिळविला.

मुलींच्या १४ वर्षे वयोगटात स्वरा रहाटे हिने प्रथम, विधी साखरकर हिने द्वितीय, तर मनस्वी तराळे हिने पाचवा क्रमांक मिळविला. तालुकास्तरीय स्पर्धेत विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यात जीनियस चेस अकॅडमीच्या खेळाडूंनी सातत्यपूर्ण कामगिरी करत आपले वर्चस्व अधोरेखित केले. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी जीनियस चेस अकॅडमीचे संस्थापक-प्रशिक्षक बाळासाहेब बोदळे सर, गुरुजन तसेच आई-वडिलांना दिले.

# तांदळी फाट्यावर पकडलेल्या संशयितांना चौकशीविना सोडल्याचा आरोप!

## पिकअपमध्ये कु-हाड व इतर साहित्य आढळल्याचा ग्रामस्थांचा दावा

■ प्रतिनिधी | पातूर ■

बाबुळगाव महामार्गावरील तांदळी फाट्याजवळ संशयास्पद परिस्थितीत पिकअप वाहनासह आढळलेल्या चार व्यक्तींपैकी दोघांना ग्रामस्थांनी पकडून पातूर पोलिसांच्या ताब्यात दिल्यानंतर, पोलिसांनी त्यांची पुरेशी चौकशी न करता सोडून दिल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तांदळी फाट्याजवळ एक पिकअप वाहन व चार व्यक्ती संशयास्पद अवस्थेत आढळून आल्या. ग्रामस्थांनी त्यांची विचारपूस केली असता समाधानकारक माहिती मिळाली नसल्याने संशय अधिक बळावला. त्यानंतर ग्रामस्थांनी वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये कुऱ्हाड व मोटारपंप असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. दरम्यान, चौकशी सुरू असतानाच चारपैकी दोन व्यक्तींनी घटनास्थळावरून पळ काढल्याची माहिती समोर आली. उर्वरित दोन व्यक्तींना ग्रामस्थांनी पकडून पातूर पोलिसांच्या स्वाधीन केले.

### दोन संशयितांना पोलिसांच्या ताब्यात दिल्यानंतरही कारवाईबाबत संभ्रम



### पोलिसांच्या ताब्यात दिले, मग पुढे काय?

ग्रामस्थांनी पकडून दिलेल्या दोन्ही संशयितांची पोलिसांनी सखोल चौकशी करणे, पिकअप वाहनाची कागदपत्रे तपासणे, वाहनातील साहित्याची मालकी व त्याचा स्रोत पडताळणे तसेच परिसरातील अलीकडील चोरीच्या घटनांशी काही संबंध आहे का, याचा तपास करणे अपेक्षित असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मात्र, संशयितांना योग्य चौकशी व पडताळणी न करता सोडून देण्यात आल्याचा आरोप होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या आरोपाबाबत पोलिस प्रशासनाची अधिकृत भूमिका स्पष्ट झालेली नाही.

### चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर संशय वाढला

पातूर शहर व परिसरात अलीकडच्या काळात चोरी व घरफोडीच्या घटना घडत असल्याच्या पार्श्वभूमीवर तांदळी फाट्यावरील ही घटना गांभीर्याने घेण्याची मागणी होत आहे. पिकअप वाहन कोणाच्या मालकीचे होते? वाहनातील कुऱ्हाड व इतर साहित्य कुठून आणण्यात आले होते? घटनास्थळावरून पसार झालेले दोघे कोण होते? तसेच ताब्यात घेतलेल्या दोघांची नेमकी चौकशी काय करण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे पोलिसांनी जनतेसमोर स्पष्ट करावीत, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

### ‘संशयित सोडले तर चोरीचा तपास कसा लागणार?’

चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये आधीच असुरक्षिततेची भावना असताना ग्रामस्थांनी संशयित व्यक्तींना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्यानंतरही त्यांच्यावर कायदेशीर प्रक्रिया झाली का, याबाबत स्पष्टता नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. संशयित व्यक्ती दोषी आहेत की निर्दोष, हे तपासातून स्पष्ट होणे आवश्यक आहे; मात्र त्यासाठी प्राथमिक चौकशी, वाहन व साहित्याची पडताळणी आणि आवश्यक कायदेशीर प्रक्रिया होणे गरजेचे आहे, अशी भूमिका ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

### पोलिसांनी अधिकृत माहिती द्यावी

तांदळी फाट्यावरील या घटनेबाबत पोलिसांनी अधिकृत माहिती जाहीर करून दोन संशयितांना ताब्यात घेतल्यानंतर कोणती चौकशी करण्यात आली, त्यांना सोडण्यात आले असल्यास त्यामागील कारण काय होते आणि घटनास्थळावरून पसार झालेल्या दोघांचा शोध घेतला जात आहे का, हे स्पष्ट करावे, अशी मागणी होत आहे. दरम्यान, उपलब्ध छायाचित्रांमध्ये ग्रामस्थांनी संशयित व्यक्तींना पकडल्याचे दिसून येत असले तरी संशयितांविरुद्ध कारवाई करायची असल्यास ती पोलिसांनी कायदेशीर पद्धतीने करणे आवश्यक आहे. तांदळी फाट्यावरील या प्रकरणाचा सखोल तपास होऊन सत्य परिस्थिती समोर येणार का आणि पोलिस प्रशासन या आरोपांबाबत काय स्पष्टीकरण देते, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २८५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# दत्ता मेघेंचा ३६ वर्षांचा वारसा पुसला; सावंगी मेडिकल कॉलेजवर 'अदानी'ची मोहर

## गावागावातून रुग्ण आणणारी सेवा आता टिकणार का, सामाजिक उपक्रमांचे काय होणार

**वर्धा/जनमाध्यम**

गरीब आणि मध्यमवर्गीय रुग्णांना परवडणारी आरोग्यसेवा मिळावी या उद्देशाने माजी खासदार तथा शिक्षणमहर्षी दत्ता मेघे यांनी १९९० मध्ये सावंगी मेघे येथे उभारलेल्या मेडिकल कॉलेजच्या इतिहासाला आता नवे वळण मिळाले आहे. तब्बल ३६ वर्षे दत्ता मेघे यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संस्थेचे नाव आता अदानी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च असे करण्यात आले आहे.या नामांतराला विद्यापीठ अनुदान आयोगाने म्हणजेच यूजीसीने मंजुरी दिल्याची माहिती समोर आली आहे.




अदानी समूहाने सुमारे दीड वर्षापूर्वी मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयाचे कामकाज हाती घेतले होते. मात्र संस्थेच्या अधिकृत नावात दत्ता मेघे यांचे नाव कायम होते. आता यूजीसीच्या मंजुरीनंतर कागदोपत्रीही दत्ता मेघे यांचे नाव हटले आहे. विशेष म्हणजे दत्ता मेघे यांच्या निधनानंतरच्या पहिल्याच गणेशोत्सवात नामांतराचा आदेश समोर आल्याने या निर्णयाची वर्ध्यात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

दत्ता मेघे यांनी केवळ मेडिकल कॉलेज उभारले नव्हते तर ग्रामीण भागातील रुग्णांना आरोग्यसेवा मिळावी यासाठी गावागावांत बससेवा सुरू केली होती. रुग्णांना गावातून सावंगी रुग्णालयात आणणे आणि उपचारानंतर पुन्हा त्याच गावात सोडणे अशी व्यवस्था त्यांच्या काळात होती. वर्धा जिल्ह्यासोबतच त्यांच्या लोकसभा मतदारसंघात समाविष्ट अमरावती जिल्ह्यातील तालुक्यांमधील नागरिकांनाही या सेवेचा लाभ मिळत होता.

पत्रकारांसाठीही दत्ता मेघे यांनी रुग्णालयात विशेष आरोग्य योजना राबविली होती. त्यामुळे मेडिकल कॉलेजचा विस्तार हा केवळ वैद्यकीय शिक्षणापुरता न राहता सामाजिक आरोग्यसेवेच्या दृष्टीनेही झाला होता.आता संस्थेचे नाव बदलले असले तरी दत्ता मेघेंच्या कार्याची दिशा कायम राहणार का. ग्रामीण रुग्णांसाठीची बससेवा आणि सवलतीच्या आरोग्यसेवेची परंपरा पुढे सुरू राहणार का. पत्रकारांसाठीच्या योजनांचे काय होणार. अशा अनेक प्रश्नांनी वर्ध्यात चर्चा सुरू झाली आहे.

अदानी समूह आर्थिकदृष्ट्या बलाढ्य आहे. त्यामुळे संस्थेच्या नावाबरोबरच भविष्यातील कार्यपद्धतीतही बदल होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. नाव बदलले, आता रुग्णसेवेचा चेहराही बदलणार का, हा खरा प्रश्न आहे.

## शेळया राखणाऱ्या वडीलाचे स्वप्न अधुरेच राहिले
# अरमानची वयाच्या १५ व्या वर्षी अखेरची झूंज

**सेलू/जनमाध्यम**

हातात पुस्तकं घेऊन उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या अरमान युसुब शाह या अवघ्या १५ वर्षीय विद्यार्थ्याची कर्करोगाशी सुरू असलेली आठ दिवसांची झुंज अखेर संपली. नागपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना बुधवारी सायंकाळी त्याची प्राणज्योत मालवली. अरमानच्या निधनाने श्री क्षेत्र घोराड परिसरावर शोककळा पसरली असून कुटुंबीयांसह शिक्षक आणि मित्रपरिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



अरमान हा घोराड येथील यशवंत विद्यालयात दहावीत शिकत होता. त्याला गळ्याचा कर्करोग झाला होता. सुरुवातीला सावंगी येथे उपचार करण्यात आले. प्रकृती गंभीर झाल्यानंतर त्याला नागपूर येथील जामठा परिसरातील नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये दाखल करण्यात आले. गेल्या आठ दिवसांपासून त्याच्यावर उपचार सुरू होते. त्याच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी यासाठी कुटुंबीयांकडून आशा आणि प्रार्थना सुरू होत्या. मात्र बुधवारी नियतीने त्याच्यावर घाला घातला.

अरमान अभ्यासू शांत आणि मनमिळावू स्वभावाचा होता. शिक्षक आणि मित्रांमध्ये तो विशेष लाडका होता. शिक्षण पूर्ण करून मोठे होण्याचे त्याचे स्वप्न होते. मात्र वयाच्या अवघ्या १५व्या वर्षी त्याचा जीवनप्रवास थांबला.अरमानचे वडील शेळ्या राखून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी मुलाच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. मुलाने शिकून कुटुंबाचा आधार बनावे हे आई वडिलांचे स्वप्न होते. मात्र अरमानच्या निधनाने त्यांच्या या स्वप्नांचाही करुण अंत झाला.

संत केजाजी महाराज मंदिर परिसरात वास्तव्यास असलेल्या अरमानच्या कुटुंबावर अचानक आलेल्या या दुःखामुळे परिसरातील नागरिक हळहळले आहेत. कालपर्यंत मित्रांसोबत खेळणारा आणि हसणारा अरमान आता केवळ आठवण बनला आहे. त्याच्यावर गुरुवारी मुस्लिम समाजाच्या परंपरेनुसार अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## संक्षिप्त

### अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**समुद्रपूर**-जनावरे चारण्यासाठी गेलेल्या व्यक्तीला अज्ञात मोटारसायकलने मागून धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाल्याची घटना लाडणपूर परिसरात घडली. मधुकर किसना मेश्राम असे जखमी व्यक्तीचे नाव असून त्यांच्यावर नागपूर येथील एम्स रुग्णालयात उपचार सुरू होते.मिळालेल्या माहितीनुसार २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास मधुकर मेश्राम हे जनावरे चारण्यासाठी गेले होते. त्यावेळी लाडणपूर परिसरात अज्ञात वाहनाने त्यांना मागून धडक दिली. अपघातात ते गंभीर जखमी झाले. सुरुवातीला त्यांना समुद्रपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने सेवाग्राम येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आले. त्यानंतर डॉक्टरांनी नागपूर येथील एम्स रुग्णालयात रेफर केले. या प्रकरणी समुद्रपूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू प्रकरणाची नोंद असून घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

### दुचाकी अपघातात जखमीचा मृत्यू

**हिंगणघाट**-दुचाकीवरील नियंत्रण सुटून रस्त्यालगतच्या नालीत पडल्याने गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान नागपूर येथे मृत्यू झाला. राजेश कृष्णाजी पावडे वय ५४ वर्षे रा. निशाणपुरा हिंगणघाट असे मृताचे नाव आहे.२२ ऑगस्ट रोजी रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास राजेश पावडे हे खासगी कामानिमित्त विठोबा चौक येथे दुचाकीने गेले होते. घरी परतताना नाधबोज चौकाजवळ भेडे गुरुजी यांच्या घरासमोर त्यांच्या दुचाकीवरील नियंत्रण सुटले. दुचाकी रस्त्यालगतच्या नालीत पडल्याने ते गंभीर जखमी झाले. उपचारासाठी विविध रुग्णालयांत दाखल केल्यानंतर २४ ऑगस्ट रोजी नागपूर येथील एम्स रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. प्रारंभी सोनेगाव नागपूर शहर पोलिसांत मर्ग नोंद झाली होती. घटनास्थळ हिंगणघाट हद्दीत असल्याने मर्ग डायरी पोलिसांकडे वर्ग करण्यात आली.

### अपघातात एक गंभीर

हिंगणघाट - अपघातात गंभीर जखमी झालेल्या ५४ वर्षीय राजेश पावडे यांचा नागपूर येथील एम्स रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्यानंतर त्यांची मर्ग डायरी हिंगणघाट पोलिसांकडे वर्ग करण्यात आली. निशाणपुरा परिसरातील राजेश कृष्णाजी पावडे असे मृताचे नाव आहे.२२ ऑगस्ट रोजी रात्री साडेआठ वाजता खासगी काम आटोपून दुचाकीने घरी परतताना त्यांचा वाहनावरील ताबा सुटला. नाधबोज चौकाजवळ रस्त्यालगतच्या नालीत पडल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी विविध रुग्णालयांत दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने अखेर नागपूर येथील एम्समध्ये हलविण्यात आले. उपचार सुरू असताना डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेची सुरुवातीची नोंद सोनेगाव नागपूर शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती.

# वृद्ध, विधवा, दिव्यांग, अनाथ, परितत्त्यांना संजय गांधी योजनेचा आधार

**वर्धा/जनमाध्यम**

समाजातील विविध घटकांसाठी संजय गांधी योजनेंतर्गत अर्थसहाय्याच्या विविध योजना राबविण्यात येते. दिव्यांग, वयोवृद्ध, विधवा, अविवाहित महिला, परितत्त्या, अनाथ मुलांसाठी या योजना अतिशय उपयुक्त ठरल्या आहे. आर्वी येथे गणोशोत्सवात या योजनांची जनजागृती करण्यात आली.

विविध शासकीय योजना गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभाग, जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने लोकसंवाद उपक्रम आयोजित करण्यात येत आहे. त्याअंतर्गत स्टेशन वार्ड आर्वी येथील शिवशक्ती गणेश मंडळ येथे संजय गांधी योजनांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट, मंडळाचे अध्यक्ष डॉ.विनय देशपांडे, अनील जोशी, जिल्हा माहिती कार्यालयाचे दिलीप बोंडसे, आर्वी तहसिलचे महसूल सहाय्यक धर्मेंद्र बाळसराफ आदी उपस्थित होते.

**माहिती व जनसंपर्क विभागाचा लोकसंवाद कार्यक्रम**

६५ वर्षावरील वृद्ध, महिला व पुरुष, विधवा, अविवाहीत महिला, परितत्त्या, घटस्फोटीत महिला, दिव्यांग, १८ वर्षाआतील अनाथ मुले व मुली इत्यादींसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य योजनेंतर्गत संजय गांधी निराधार, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन व दारिद्रय रेषेखालील व्यक्तींकरीता इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेंशन, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत दिव्यांग व्यतिरिक्त इतर सर्व लाभार्थ्यांना दरमहा अनुदान १ हजार ५०० रुपये तसेच दिव्यांग लाभार्थ्यांना दरमहा २ हजार ५०० रुपये त्यांच्या आधारलिंग बँक खात्यात डीबीटीद्वारे शासनस्तरावरुन वितरीत करण्यात येते. या योजनेचा लाभ शासन निर्णयातील निकषानुसार पात्र लाभार्थ्यांनी तसेच दिव्यांग महिला व पुरुषांनी घ्यावा, असे आवाहन लोकसंवाद कार्यक्रमातून तहसिल कार्यालय आर्वीच्याच्यावतीने करण्यात आले. संजय गांधी योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्जदार दारिद्रय रेषेखालील असणे आवश्यक आहे. अर्जदार दिव्यांग असल्यास युडीआयडी कार्ड, विधवा महिला असल्यास पतीचे मृत्यु प्रमाणपत्र, घटस्फोटीत असल्यास न्यायालयीन आवश्यक कागदपत्र, अनाथ असल्यास अनाथ प्रमाणपात्र, अत्याचारीत महिला असल्यास जिल्हा शल्य चिकित्सक, महिला व बाल विकास अधिकारी व पोलिस प्रमाणपत्र कागपदपत्रे आवश्यक असल्याचे महसूल सहाय्यक धर्मेंद्र बाळसराफ यांनी सांगितले. कार्यक्रमाला शिवशक्ती गणेश मंडळाचे सदस्य, परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### खरांगणा येथे जुगारावर पोलिसांची कारवाई

**वर्धा**-खरांगणा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या जुगारावर पोलिसांनी कारवाई करीत एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला. ही कारवाई २३ सप्टेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास मौजा मसीद परिसरात करण्यात आली. तिलकराज बादल नामक व्यक्तीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई करण्यात आल्याची नोंद आहे.पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे संबंधित ठिकाणी कारवाई करण्यात आली. तेथे जुगाराचा प्रकार सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी पंचनामा करून आवश्यक कारवाई केली. प्रकरणी संबंधित कलम १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची नोंद खरांगणा पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. कारवाईदरम्यान नेमका किती मुद्देमाल जप्त करण्यात आला याबाबत उपलब्ध अहवालात स्पष्ट माहिती नमूद नाही.

# सर्पदंशाने गणेश धारपुरे यांचे निधन

## आ.सुमित वानखेडे यांनी कुटुंबीयांची भेट घेऊन केले सांत्वन



**आर्वी/जनमाध्यम**

कारंजा तालुक्यातील नांदुरा येथील रहिवासी आणि भारतीय जनता पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते गणेश धारपुरे यांचे सर्पदंशामुळे निधन झाले. त्यांच्या आकस्मिक निधनाने नांदुरा परिसरावर शोककळा पसरली असून धारपुरे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.गणेश धारपुरे हे भाजपचे सक्रिय कार्यकर्ते म्हणून परिसरात परिचित होते. पक्षाच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता.घटनेची माहिती मिळताच आर्वी विधानसभा मतदारसंघाचे आ.सुमित वानखेडे यांनी नांदुरा येथील धारपुरे यांच्या निवासस्थानी भेट दिली. त्यांनी कुटुंबीयांची आस्थेने विचारपूस करून त्यांचे सांत्वन केले.गणेश धारपुरे यांच्या निधनाने एक सहकारी आणि सक्रिय कार्यकर्ता गमावल्याची भावना उपस्थित भाजप कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. स्व. गणेश धारपुरे यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो आणि कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याचे बळ मिळो, अशी श्रद्धांजली यावेळी अर्पण करण्यात आली.

# सातबारा नसला तरी महिला शेतकरी म्हणून मिळणार ओळख

## ग्रामसभेत महिलांचा सहभाग वाढविण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

शेतीत राबणाऱ्या महिलांच्या कष्टाला आजवर मालकी हक्काची आणि शेतकरी म्हणून अधिकृत ओळखीची जोड मिळाली नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी महिला शेतकरी सन्मान कायदा महत्त्वाचा ठरणार असून त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महिलांनी ग्रामसभेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषद विदर्भ विभागाच्या वेबिनारमध्ये करण्यात आले.

वेबिनारमध्ये सुवर्णा दामले यांनी कायद्याची पार्श्वभूमी मांडली. सातबारा नसलेल्या महिलांनाही शेतकरी म्हणून ओळख मिळणार असल्याचे माधुरी खडसे यांनी स्पष्ट केले. शेतीसोबत मासेमारी, वनउपज, पशुपालन, कुक्कुटपालन, मधमाशी पालन, गांडूळ खत निर्मिती आणि भाडेतत्त्वावरील शेती करणाऱ्या महिलांचाही कायद्यात विचार करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

भीम रासकर यांनी २ ऑक्टोबरच्या ग्रामसभेत महिला शेतकरी गौरव ग्रामसभा घेण्याचा आणि गावागावात जनजागृती करण्याचा आग्रह धरला. लता भिसे यांनी विमा, सुरक्षितता, सहकार क्षेत्रातील प्रतिनिधित्व आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील महिलांचा सहभाग याबाबत प्रश्न उपस्थित केले.

सीमा कुलकर्णी यांनी कायद्याचा प्रचार आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी कृषी विभागाची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. सुनीता बागल आणि विभूती पटेल यांनी महिला केंद्रित समित्या, जेंडर बजेट आणि जनजागृती अभियानाची गरज व्यक्त केली.

# महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मूल्यवर्धन व बाजारपेठेशी जोडण्यास चालना

**वर्धा/जनमाध्यम**

फलोत्पादन क्षेत्रातील शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या व मूल्यसाखळीतील विविध घटकांना सक्षम करून शेतमालाला अधिक चांगली बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत तसेच आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्याने महाराष्ट्र ॲग्रोबिझनेस नेटवर्क प्रकल्प राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील पात्र शेतकरी, उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था व मूल्यसाखळीतील संबंधित घटकांनी या प्रकल्पांतर्गत उपलब्ध असलेल्या प्रशिक्षण, क्षमता बांधणी, वित्तीय सहाय्य, मूल्यवर्धन व बाजारपेठ जोडणीच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रकल्पांतर्गत शेतमालाच्या उत्पादनापासून ते काढणीनंतरचे व्यवस्थापन, प्रक्रिया, मूल्यवर्धन, साठवणूक, वाहतूक व विपणन या संपूर्ण मूल्यसाखळीला बळकटी देण्यावर भर देण्यात येत आहे.

प्रकल्पामध्ये शेतकरी उत्पादक संस्था यांची क्षमता वाढविणे, फलोत्पादन पिकांच्या मूल्यसाखळीचा विकास करणे, काढणीनंतरचे व्यवस्थापन व शेतमालाची गुणवत्ता सुधारण्यासाठी सुविधा निर्माण करणे, प्रक्रिया व मूल्यवर्धनाला प्रोत्साहन देणे, शेतकरी उत्पादक संस्था व मूल्यसाखळीतील पटकांना वित्तीय सहाय्य उपलब्ध करून देणे,

शेतमालासाठी देशांतर्गत तसेच निर्यात बाजारपेठेच्या संधी वाढविणे, आधुनिक तंत्रज्ञान व उत्तम कृषी पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देणे, शेतमालातील काढणीनंतरचे नुकसान कमी करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस सहाय्य करणे या बाबीचा समावेश करण्यात आला आहे.

प्रकल्पामध्ये सुरुवातीला डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, हिरवी व लाल मिरची तसेच फुलपिकांचा समावेश करण्यात आला होता.

त्यानंतर आंबा, काजू, लिंबू व पडवळ या पिकांचा समावेश करण्यात आला आहे. या टप्प्यात द्राक्षे, पपई, हळद, अंजीर, शेवगा, टोमॅटो, आले व फणस या आणखी ८ पिकाचा समावेश करण्यात आला आहे. पायाभूत सुविधा,

वित्तीय व संस्थात्मक सहाय्याचा विस्तार तसेच फलोत्पादन पिकांच्या निर्यातीला चालना देण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे, असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.

# लोकार्पणाचा थाटमाट पण पत्रकारांना वाटाण्याच्या अक्षता

## सात कोटींच्या कामाची पोलखोल होऊ नये म्हणून पत्रकारांना टाळले का, अंतोरा आरोग्य केंद्राच्या कार्यक्रमावरून पत्रकार संघटनांचा संताप

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

आष्टी तालुक्यातील अंतोरा येथे तब्बल सात कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीचे लोकार्पण मोठ्या थाटामाटात करण्यात आले. पालकमंत्री खासदार,आमदार आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती असलेल्या या सोहळ्यात मात्र स्थानिक पत्रकारांना निमंत्रण न दिल्याने पत्रकार संघटनांनी प्रशासनाला धारेवर धरले आहे.



ग्रामीण भागातील आरोग्य शिक्षण रस्ते पाणी आणि प्रशासनातील त्रुटी सातत्याने जनतेसमोर आणणाऱ्या स्थानिक पत्रकारांनाच शासकीय आरोग्य केंद्राच्या लोकार्पणातून बाहेर ठेवण्यात आल्याने या प्रकारामागे नेमके कारण काय असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

**लोकार्पण करताना पत्रकारांना का टाळले**

या इमारतीच्या बांधकामापासून आरोग्य सुविधांपर्यंत अनेक बाबी जनतेच्या हिताशी संबंधित आहेत. अशा वेळी स्थानिक पत्रकार उपस्थित राहून वस्तुस्थिती मांडतील अशी अपेक्षा असताना त्यांनाच कार्यक्रमापासून दूर ठेवण्यात आले. पत्रकारांनी आरोग्य केंद्राची पाहणी करून बांधकाम आणि सुविधांची चिरफाड करू नये म्हणूनच त्यांना निमंत्रण टाळण्यात आले का असा संशय पत्रकार संघटनांनी व्यक्त केला आहे.विशेष म्हणजे जिल्ह्यातील वरिष्ठ मान्यवरांना निमंत्रित करण्याची खबरदारी घेण्यात आली. मग स्थानिक पत्रकारांनाच निमंत्रण देताना प्रशासनाची यंत्रणा का थांबली असा थेट प्रश्न उपस्थित होत आहे.

**पत्रकार संघटनांचा प्रशासनाला इशारा**

क्रांती भूमी आष्टी तालुका पत्रकार संघटना आणि व्हॉइस ऑफ मीडिया यांनी या प्रकाराचा तीव्र निषेध नोंदवला. तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांमार्फत प्रशासनाला निवेदन देण्यात आले. शासकीय कार्यक्रमांमध्ये स्थानिक पत्रकारांना समान आणि सन्मानपूर्वक वागणूक द्यावी. भविष्यात अशा प्रकाराची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी प्रशासनाने स्पष्ट भूमिका घ्यावी अशी मागणी करण्यात आली.यावेळी पत्रकार युसुफ शेख अवधूत शेंद्रे शिवाजी चांदिवाले प्रमोद भोजने प्रवीण करोले ॲड राहुल गजरे समीर पठाण यांच्यासह पत्रकार उपस्थित होते.

**लोकार्पण झाले आता प्रश्नांची उत्तरे कोण देणार**

सात कोटींच्या आरोग्य केंद्राचा लोकार्पण सोहळा झाला. फीत कापली गेली. मान्यवरांनी भाषणे केली. मात्र ज्या पत्रकारांनी या इमारतीच्या कामाची आणि आरोग्य सुविधांची वस्तुनिष्ठ माहिती जनतेसमोर आणायची होती त्यांनाच कार्यक्रमापासून दूर ठेवण्यात आले. त्यामुळे लोकार्पणापेक्षा पत्रकारांना डावलण्याची चर्चा आष्टीत अधिक रंगली आहे. प्रशासनाने या प्रकाराचे कारण स्पष्ट करावे अशी मागणी आता जोर धरत आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २९९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# ट्रॅफिक जाममध्ये अडकलेल्या रुग्णवाहिकेला मोकळा करून दिला रस्ता

## -शोभायात्रेत दाखवली संवेदनशीलता आणि तत्परता

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर शहरातील श्री भक्त बिहारी संस्थान येथून प्रसिद्ध आमिनाथ संस्थान पर्यंत स्व.रतनकुमारजी चौधरी यांच्या कुटुंबियांकडून भव्य दिव्य पारंपरिक फुलडोल महोत्सव शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते .टक्कर चौक परिसरात राष्ट्रीय हायस्कूल मधील विद्यार्थिनीचे लेझिम पथक आकर्षणाचे केंद्र ठरले. यावेळी टक्कर चौक परिसरात नागरिक, भाविक भक्त,महिला मंडळी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.यादरम्यान



अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयाकडे एका रुग्णाला उपचारासाठी घेऊन जाणारी एक रुग्णवाहिका ट्रॅफिक जाम मध्ये असल्याची माहिती अचलपूर पोलिस स्टेशनचे अधिकारी, पुलडोल शोभायात्रेतील सदस्य आणि राष्ट्रीय विद्यालयाचे शिक्षकांना मिळाली.त्यानंतर तत्काळ अचलपूर पोलिस स्टेशनचे अधिकारी, सदस्य आणि राष्ट्रीय विद्यालयाचे शिक्षक वर्गाने तत्काळ तो रस्ता मोकळा करून दिला.रस्त्यावर असलेली वाहने बाजूला करून दिली .यामुळे ती रुग्णवाहिका अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयाकडे रवाना झाली.अचलपूर पोलिस स्टेशनचे अधिकारी, पुलडोल शोभायात्रेतील सदस्य आणि राष्ट्रीय विद्यालयाचे शिक्षक - मंडळींनी दाखवलेली संवेदनशीलता आणि तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अचलपूर शहरातील अनेक मुख्य रस्ते आजही अरुंद आहे .यामुळे वाहतूक कोंडी ची समस्या उद्भवते. यामुळे अचलपूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी रस्त्याचे रुंदीकरण होणे गरजेचे आहे.

## नावात बदल

**जूने नाव जयश्री राजेश राठी**

**नवीन नाव जया राजेश राठी**

राहणार मोर्शी, हे दोन्ही नाव एकाच व्यक्तीचे आहे.

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९
९४२२१२०४०६**

## जाहीर नोटीस

आज जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **डॉ.सुचिता महेश गांधी, रा.संजीवनी हॉस्पिटल, रामदास पेठ, तिलक पार्क जवळ, अकोला, ता.जि. अकोला** यांनी **अस्मिता श्रीकृष्ण दंडे, रा.नंदा मार्केट मागे,राजापेठ, अमरावती, ता.जि.अमरावती** यांचे मालकीची व ताब्यातील मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन**

नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण विकास कचेरीचे कक्षेतील व ग्रा.प.चे हददीतील मौजा-रेवसा, प्रगणे-नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती येथील शेत गट नं.९५ (सर्वे नं.४१) (७/१२ प्रमाणे शेत गट नं.९५/अ) एकूण क्षेत्रफळ ६ हे २८ आर पैकी २ हे ५० आर जमीनीतील सहायक संचालक नगर रचना महानगरपालिका अमरावती यांचे दि.१७.०२.२०२२ रोजीचे आदेश क्र. अकृषक/मौ.रेवसा/ता.जि.अम./सन १५/संसनर-अम/३५८ नुसार लेआउट मंजूर व वि.तहसिलदार साहेब, अमरावती यांनी त्यांच्या फाईलावरील ज्याचा रा.मा.क्र.एनएपी-३४/रेवसा-३०१/२०२१-२२, नि.ता. ०२.०३.२०२२ नुसार लेआउट कन्हर्शन मंजुर झालेल्या जागेतील प्लॉट नं.१५ (पंधरा) ज्याचे एकुण क्षेत्रफळ ५३८८.६७ चौ.फुट (५००.६२ चौ.मि.) ज्याची चर्तुःसिमा -

पुर्वेस - लेआउट मधील प्लॉट नं. ४६
पश्चिमेस - लेआउट मधील रोड
उत्तरेस - लेआउट मधील प्लॉट नं. १६
दक्षिणेस - लेआउट मधील रोड

सबब वरील वर्णन केलेल्या मालमत्ते बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध, कर्ज, गहाण, बोझा, बक्षीस, वारसा हक्क, इत्यादी कोणत्याही प्रकारे हितसंबंध, पुर्वीचा करार, व्यवहार अथवा आक्षेप असल्यास त्यांनी खालील दिलेल्या पत्त्यावर ही जाहीर नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांचे आंत लेखी पुराव्यासहीत समक्ष संपर्क करावा व लेखी पोच घ्यावी. अन्यथा वरील मुदतीनंतर माझे पक्षकार मालमत्तेचे खरेदीखत नोंदवून घेतील.त्यानंतर कोणाचाही कुठल्याही प्रकारची हरकत अगर उजर चालणार नाही. कृपया आम जनतेने याची नोंद घ्यावी.

करिता सदरची जाहीर नोटीस.

**दिनांक - २४/०९/२०२६**
**अमरावती**

**सही /-**
**ॲड.प्रज्वल उपासे**
**मो.नं.- ९५२७२०४४३४**

## जाहीरनामा

या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नाव श्री / श्रीमती /कु. नगमापरवीन शकिलखान पत्ता-कलालपुरा पथ्रोट यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र. २२ संगणक मालमत्ता क्र. ACH A00023602 जुना मालमत्ता क्र. २२०००२३३ नझुल शीट नं. - प्लॉट नं. - श्री / श्रीमती / कु. श्री. नझूल भोगवटदार सै.इस्माईल से. रसूल या नावाने असुन वरील अर्जदार यांनी यांनी श्री / श्रीमती /कु.नझूल भोगवटदार नगमापरवीन शकिलखान या नावाने फेरफार घेण्याकरिता / नाव बदलण्याम / नाव लावण्यास / नावामध्ये / क्षेत्रामध्ये / दुरुस्ती करण्याकरिता ( खरेदी, मृत्युपत्र, बक्षिसपन, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यालावाद्वारे ) कार्यालयामध्ये दिनांक ६/९/२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदती नंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

टीप / लक्षवेध :-
उपरोक्त मालमत्तेची चतुसिमा :-
पूर्व- बशीर खाँ यांचे घर
पश्चिम :- रहीम खाँ यांचे घर
उत्तर - गल्ली
दक्षिण : खुली जागा

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अचलपूर**

## जाहीरनामा

या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नाव श्री / श्रीमती /कु. श्री राजेंद्र प्रतापराव पखाले पत्ता-सरमसपुरा अचलपूर यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र. २६ संगणक मालमत्ता क्र. ACH A000024532 जुना मालमत्ता क्र. २६०००२४० नझुल शीट नं. १४ बी प्लॉट नं. २२५ श्री / श्रीमती / कु. श्री. प्रल्हाद रखुजी पखाले या नावाने असुन वरील अर्जदार यांनी यांनी श्री / श्रीमती /कु. श्री राजेंद्र प्रतापराव पखाले या नावाने फेरफार घेण्याकरिता / नाव बदलण्याम / नाव लावण्यास / नावामध्ये / क्षेत्रामध्ये / दुरुस्ती करण्याकरिता ( खरेदी, मृत्युपत्र, बक्षिसपन, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यालावाद्वारे ) कार्यालयामध्ये दिनांक ३१/८/२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदती नंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

टीप / लक्षवेध :-
उपरोक्त मालमत्तेची चतुसिमा :-
पूर्व- रस्ता
पश्चिम :- रस्ता
उत्तर - प्रल्हाद रखुजी पखाले यांचे घर
दक्षिण : रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अचलपूर**

## जाहीरनामा

या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नाव श्री / श्रीमती /कु. श्री राजेंद्र प्रतापराव पखाले पत्ता-सरमसपुरा अचलपूर यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र. 26 संगणक मालमत्ता क्र. ACH A000024533 जुना मालमत्ता क्र. २६०००२४१ नझुल शीट नं. १४ बी प्लॉट नं. २२४ श्री / श्रीमती /कु. श्री. प्रल्हाद रखुजी पखाले या नावाने असुन वरील अर्जदार यांनी यांनी श्री / श्रीमती /कु. श्री राजेंद्र प्रतापराव पखाले या नावाने फेरफार घेण्याकरिता / नाव बदलण्याम / नाव लावण्यास / नावामध्ये / क्षेत्रामध्ये / दुरुस्ती करण्याकरिता (खरेदी, मृत्युपत्र, बक्षिसपन, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यालावाद्वारे ) कार्यालयामध्ये दिनांक ३१/८/२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदती नंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

टीप / लक्षवेध :-
उपरोक्त मालमत्तेची चतुसिमा :-
पूर्व- रस्ता
पश्चिम :- रस्ता
उत्तर - बळीराम तांदुले यांचे घर
दक्षिण : नागोजी बळीराम राईकवार यांचे घर

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अचलपूर**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक २२
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर

### जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **अनीस खान आसीन खान** पत्ता हिरापुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२४ संगणक मालमत्ता क्र.**ACHA00032355** जुना मालमत्ता क्र.--------------- नझुल शिट क्र.**२६** प्लॉट नं.**०१** ही कर आकारणी नोंदवहीनुसार **सुनिता नरेंद्र फिसके** या नावाने असून वरील अर्जदार यांनी **अनीस खान आसीन खान** या नावाने फेरफार घेण्याकरिता या कार्यालयामध्ये दिनांक **१२/०८/२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

**पुर्वेस** - लेआउट मधील ६ मीटरचा रोड
**पश्चिमेस** - तुकडा नंबर ८५
**उत्तरेस** - लेआउट मधील ६ मीटरचा रोड
**उत्तरेस** - खुली जागा

शिक्का

**स्वा/-**
**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, अचलपूर**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.१९२९/२०२६**
**Pushpa Arun Kalmegh + 2**
**Versus NIL**
**पुढील ता.२९.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**Applicants**

1. **Pushpa Arun Kalmegh,** Age about 63 yrs. Occ.- Household
2. **Sonal Arun Kalmegh,** Age about 38 yrs. Occ.- Household,
3. **Dhiraj Arun Kalmegh,** Age about 36 yrs. Occ.- Labour
   All R/o. Near Hanuman Mandir, Shriram Nagar, Behind Rathi Nagar, Shivaji Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati- 444 603

--Versus--

Non-Applicant - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Arun Panjabrao Kalmegh** हे दिनांक **१७.११.२०२५** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **Pushpa Arun Kalmegh+2 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Pushpa Arun Kalmegh+2 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२२.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### वि.श्री.आर.आर.खामतकर,३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.१८४०/२०२६**
**सुषमा + २ वि.निरंक**
**पुढील ता.०५.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार**

1. **Sushma Ashok Bagade**
   Age about 59 yrs. Occ.- Retired
   R/o. House No. 168, Gajanan Township, Kathora Bk. Rahatgaon, Amravati, Tq. & Dist. Amravati
2. **Minal Ashok Bagade, @ Minal Namitkumar Waware (Name after marriage)**
   Age about 39 yrs. Occ.- Housewife,
   R/o. C/o. Gopal, flat No. X-1104, Jalvayu Tower, Sunny Endave Sector-125, Kharar, SAS, Punjab- 140301

विरुध्द

गैरअर्जदार - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Ashok Mahipatrao Bagade** हे दिनांक **१५.०२.२०१८** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **Sushma Ashok Bagade +2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Sushma Ashok Bagade +2** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.११.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### वि.श्री.आर.आर. खामतकर,३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.२०७७/२०२६**
**मनोज + १ वि.निरंक**
**पुढील ता.२८.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार**

1. **Manoj s/o. Madhukarrao Gondane,**
   Age about 50 yrs. Occ.- Service
   R/o. Near Hanuman Mandir, Songaon, Tq. Chandur Railway Dist. Amravati, Present Add. - At Parshav Residency, Plot No. 80, Masod Road, Rajura, Amravati
2. **Sima w/o. Narendra Suryavanshi, (Sima D/o. Madhukarrao Gondane )**
   Age about 45 yrs. Occ.- Household,
   R/o. W/o. Narendra Suryvanshi, At Pimpari Mukhtyarpur, Post- Pathrad Gole, Pathrot, Yavatmal, Tq. & Dist. Yavatmal

विरुध्द

गैरअर्जदार - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Madhukar Mahadevrao Gondane** हे दिनांक **१६.०७.२०२६** रोजी **राजुरा, अमरावती** येथे व **Goukarna Madhukar Gondane** हया दि.२३.०२.२०२३ रोजी राजुरा अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार **Manoj s/o. Madhukarrap Gondane+1** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Manoj s/o.Madhukarrap Gondane+1** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२३.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर

### जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **सुनिता विजय सदाफळे + ०२** पत्ता हिरापुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२४ संगणक मालमत्ता क्र.**ACHA00014341** जुना मालमत्ता क्र.**24000749** नझुल शिट क्र.**१४ डी** प्लॉट नं.**१९** ही कर आकारणी नोंदवहीनुसार **उत्तमराव गोविंदराव सदाफळे** या नावाने असून वरील अर्जदार यांनी **सुनिता विजय सदाफळे + ०२** या नावाने फेरफार घेण्याकरिता या कार्यालयामध्ये दिनांक **-०७/०८/२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

**पुर्वेस** - अमोल शेंद्रे यांचे घर
**पश्चिमेस** - गजानन निमजे यांचे घर
**उत्तरेस** - सुरेश पखाले यांचे घर
**उत्तरेस** - दौलत नंदनवार यांचे घर

शिक्का

**स्वा/-**
**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, अचलपूर**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
### वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.१९३५/२०२६**
**Balasaheb Pralhadrao Mohod + 1**
**Versus NIL**
**पुढील ता.२९.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**Applicants**

1. **Balasaheb Pralhadrao Mohod,** Aged about 63 yrs. Occ.- Labour,
   R/o. Ward No.2, At Digargauhan, Post. Pimpalvihir, Tq. & Dist. Amravati
2. **Gajanan Pralhadrao Mohod,** Aged about 62 yrs. Occ.- Labour,
   R/o.Ward No.2, At Digargauhan, Post. Pimpalvihir, Tq. & Dist. Amravati

--Versus--

Non-Applicant - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Pralhadrao Ramkrushnarao Mohod** हे दिनांक **१५.०८.२०२६** रोजी **अमरावती** येथे व **Bebibai Pralhadrao Mohod** हया दि. ०२.०३.२०१३ रोजी अमरावती येथे मयत झाल्या.**Balasaheb Pralhadrao Mohod+1 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Balasaheb Pralhadrao Mohod+1 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२२.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती
### वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांक १९४५/२०२६ पुढील तारीख : ३०.१०.२०२६

**Dwarkabai Madhukar Meshram M/o Hemant Meshram+ 2 Versus NIL**

### जाहिरनामा / सायटेशन

**Applicants 1) Dwarkabai Madhukar Meshram M/o Hemant Meshram, Aged 64 yrs, Occ-Household,2) Dipashri Hemant Meshram W/o Hemant Meshram,** Aged 40 yrs, Occ-Service,**3) Manasvi Hemant Meshram,** Aged 17 yrs, Occ-Education All 1 to 3, R/o Near Mankar Fiour Mill, Prashant Nagar, PO Rukhmini Nagar, Amravati Tq & Dist. Amravati

**==Versus== Non- Applicant NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Hemant Madhukar Meshram** हे दि. ११.०३. २०२२ रोजी अमरावती येथे मयत झाले. Dwarkabai Madhukar Meshram M/o Hemant Meshram+2 Versus NIL यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Dwarkabai Madhukar Meshram M/o Hemant Meshram+2 Versus NIL.** वरीलप्रमाणे सदर्हूमयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदर्हू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. २२.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती.**

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल / अर्ज कमांकः १३९/१९/२०२६

**सार्वजनिक न्यासाचे नाव नोंदणी क्रमांक** -विदर्भ आर्ट फाउंडेशन चांदुर बाजार ता. चांदुर बाजार जि. अमरावती

**बाबत अर्जदार-** श्री. मुकेशकुमार देवराव भोयर सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सहाय्यक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल / अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

**(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे का? आणि सदरचा न्यासाचा सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?**
**(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाची मालकीची आहे काय ?**
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)-** निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)-** निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफीयत विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०९/०९/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक न्याय शाखा**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अमरावती**

## दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
### वि. श्री. आर. आर. खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांक १९४६/२०२६ **बाबुराव व एक वि निरंक** पुढील तारीख १६.१०.२०२६

### जाहिरनामा / सायटेशन

**अर्जदार**-1- Baburao Ramaji Wasnik Aged 69 Years, Occu: Retd. R/o 30, New Ambedkar Nagar, Belpura, Rukhmini Nagar S. O. Amravati Tq. and Distt. Amravati 2- Dipashri Hemant Meshram w/o Hemant Meshram Aged 40 Years, Occu: Service R/o Near Mankar flour mill, Prashant Nagar, PO, Rukhmini Nagar, Amravati

**विरुध्द- गैरअर्जदार- NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत Shantabai Baburao Wasnik या दि. २७.०३.२००० रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार Baburao Ramaji Wasnik + 1 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE**प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा **Baburao Ramaji Wasnik + 1** वरीलप्रमाणे सदर्हू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदर्हू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २२.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**

## दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
### वि. श्री. एस.एस. चिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांकः १९५७/२०२६ पुढील तारीख - १७.१०.२०२६

**Sumangala Prabhakarao Patil+ 1 Versus NIL**

### जाहिरनामा / सायटेशन

Applicants-1) Sumangala Prabhakarrao Patil, Age 75 yrs, Occ-Housewife,2) Prabhat Prabhakarrao Patil, Age 51 yrs, Occ-Agriculturist, Both R/o Ambika Nagar Raoad, Near Moth Nagar, Prasad Colony, Amravati Tq & Dist. Amravati.3) Sapana Sajay Deshmukh, Age 53 Years, Occ- Housewife, R/o Namuna Galli No. 6, Badnera Road, Amravati, Tq & Dist. Amravati.4) Pragati Smeer Kubde, Age 44 yrs, Occ- Housewife, R/o 29 Congress Nagar Road, Congress, Nagar, Amravati, Tq & Dist. Amravati.

**==Versus==Non-Applicant NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Prabhakar Panjabrao Patil** हया **दि. ०८.०५. २०२६** रोजी अमरावती येथे मयत झाल्या. **Sumangala Prabhakarao Patil+ 1 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.त्यापेक्षा **Sumangala Prabhakarao Patil+ 1 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सबहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदई कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सबहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. २२.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**

## दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
### वि. श्री. आर. आर. खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्रमांक : १९१२/२०२६ पुढील तारीख १३. १०.२०२६**
**भारती व दोन वि निरंक**

### जाहिरनामा / सायटेशन

**अर्जदार-** १. Bharati Ramdas Raur Age-48 yrs, Occ- Household 2. Shrutika Ramdas Raut Age-23 yrs, Oce-Education 3. Rushikesh Ramdas Raut Age- 27 yrs, Occ- Education Applicant no. 1 to 3 All R/o Gadge Nagar, Shivaji Nagar, Amravati

**गैरअर्जदार- NIL- विरुध्द**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत Ramdas Bhauraoji Raut हे दि.३०.१२.२०२३ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार Bharati Ramdas Raut + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे।

त्यापेक्षा Bharati Ramdas Raut + 2 वरीलप्रमाणे सदु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सुबहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २१.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**

## जाहिर सूचना

सर्व आम जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्व आम जनतेस जाहीर नोटीस प्रेषीत करतो ती येणेप्रमाणेः

मौजा तारखेडा, प्रगणे बडनेरा, ता. जि. अमरावती येथील सर्व्हे नं.६/१ व सर्व्हे नं.६/२ मधील क्षेत्रफळ ५ हे. ८८ आर जमीनीतील सहाय्यक संचालक नगर रचना मनपा अमरावती यांचे पत्र क्र.अमनपा/संसनर/अभि-२२/१९९५ दिनांक ०९/०५/१९९६ नुसार लेआऊट मंजुर विद्यमान जिल्हाधिकारी साहेब अमरावती यांनी त्यांच्या फाईलावरील रे.के.नं. एन.ए.पी.३४/तारखेडा/६७/१९९५-९६, नि.ता. २८/०६/१९९६ नुसार कन्व्हर्शन मंजुर झालेल्या जय सियाराम या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जमीनीतील एकूण क्षेत्रफळ १९०५ चौ. फुट (१७७.०३ चौ.मी.) पैकी ९५५ चौ. फुट (८८.७५ चौ.मी.) प्लॉट नं.८८/ बी वाद मिळकतीचे क्षेत्रफळ १७७.०३ **चौ.मी. आहे याची चर्तुः सिमा खालीलप्रमाणे :-**

**पूर्वेस** :-याच प्लॉटचा उर्वरीत भाग
**पश्चिमेस** :- प्लॉट नं.८९/ए
**उत्तरेस** :- प्लॉट नं.८७/ए
**दक्षिणेस** :- सरकारी रस्ता

वरील चर्तुः सिमेमधील वर्णन केलेल्या घरासंबंधी माझे पक्षकार प्रविण मधुकर जोगी -वि- पंचफुला मधुकर जोगी व इतर यांच्यामध्ये विद्यमान ७ वे सहदिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती वि.दि.दा.क्र.१८४/२०२६ नुसार न्यायालयात वाद प्रलंबित आहे. सदर मालमत्तेमध्ये वादी व प्रतिवादी या दोघांचाही हक्क व कायदेशीर अधिकार आहे. त्यामुळे सदर मालमत्तेसंबंधी कोणीही इतरत्र खरेदी विक्री, कर्ज, गहान, बोजा, ताबा, हक्क, कुळ, वारसा यापैकी कोणत्याही प्रकारचा देवाण घेवाण करण्यात येवू नये अन्यथा सदरचा व्यवहार हा बेकादेशीर ठरेल व माझे पक्षकार यांच्यावरबंधनकारक राहणार नाही. तसेच योग्य व उचित कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची सर्व आम जनतेने नोंद घ्यावी.

करीता सदरची जाहीर नोटीस आम जनतेस सादर.

**दिनांक :- २४/०९/२०२६**

शिक्का

**ॲड. प्रमोद आर. राउत**
**मो.नं.८२०८२४४७१५**
**रा. रहाटगाव, अमरावती**

## संक्षिप्त




### संगीतमय पोषण आरतीचे आयोजन

**अंजनगाव बारी -** पोषण अभियानांतर्गत मालखेड (रेल्वे )येथे अंगणवाडी केंद्र क्रमांक ३८ च्या वतीने गणेश मंडळासमोर संगीतमय पोषण आरतीचे आयोजन करण्यात आले.सध्या ९ वे महापोषण अभियान सुरू असून, या अभियानाच्या माध्यमातून गावामध्ये आरोग्य, पोषण तसेच अंगणवाडी केंद्रामार्फत उपलब्ध होणाऱ्या विविध सेवांबाबत जनजागृती करण्यात येत आहे.कार्यक्रमाला गावच्या सरपंच लता पाटील, बीट पर्यवेक्षिका देवयानी दामेधर, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका, मुख्याध्यापक तसेच उर्दू शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. अंगणवाडी सेविका सुषमा चौकडे, मदतनीस रमा मेश्राम, मनीषा ढिवर, साजेदा शेख शब्बीर यांच्यासह अंगणवाडी कर्मचारी उपस्थित होते.यावेळी डॉक्टर,आशा सेविका,ए.एन.एम. तसेच गावातील मान्यवर मंडळींची उपस्थिती होती. पोषण अभियानाच्या माध्यमातून आरोग्यदायी जीवनशैली, मातृ-बाल आरोग्य, पोषण आहार आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली.



### कोंडेश्वर तलावात गणेश विसर्जनास पोलिसांचा सतर्कतेचा इशारा


**अंजनगाव बारी -** गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र कोंडेश्वर तलावातील पाणीपातळी घटल्याने तसेच मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे पोलिसांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाच्या सूचना जारी केल्या आहेत. पावसाचे प्रमाण कमी असल्याने यंदा तलावाची परिस्थिती वेगळी असून विसर्जनावेळी दुर्घटना होण्याची शक्यता लक्षात घेण्यात आली आहे.बडनेरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनमंत उरलागोंडावार यांनी अमरावती शहर व ग्रामीण भागातील संबंधित पोलीस ठाण्यांना आपल्या हद्दीतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे व नागरिकांना कोंडेश्वर तलावावर विसर्जनासाठी न पाठविण्याच्या सूचना दिल्या आहेत. आपापल्या हद्दीत उपलब्ध सुरक्षित ठिकाणी गणेशमूर्तींचे विसर्जन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.दरम्यान, एखादे गणेशोत्सव मंडळ कोंडेश्वर येथे विसर्जनासाठी येणार असल्यास त्याची पूर्वकल्पना बडनेरा पोलिसांना देणे आवश्यक असून, अशा मंडळांसाठी योग्य पोलीस बंदोबस्त ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. संभाव्य जीवितहानी टाळणे तसेच गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांकडून खबरदारी घेतली जात आहे.



### कस्तुरबा इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रथम

**अमरावती-**स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित, कस्तुरबा इंग्लिश स्कूलची इयत्ता १० वी ची विद्यार्थिनी परी जंगी जादू संकेत हिने जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला.क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत, जिल्हा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती व अमरावती शहर जिल्हा कुस्ती संघ, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल, तपोवन गेट, मोर्शी रोड, अमरावती येथे आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात ४६ किलो वजनी गटात परी जंगी जादूसंकेत हिने प्रथम क्रमांक पटकाविला असून तिची विभागीय स्तरावर निवड झाली आहे.शाळेच्या मुख्याध्यापिका साधना चंदेल यांनी या विद्यार्थिनीचे कौतुक करून अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तिला शाळेचे क्रीडा शिक्षक विकास रुईकर यांचे मार्गदर्शन लाभले.

### सर्पदंशाने अमृता पहुरकर हिचे निधन



**खामगाव-**गो.से. विज्ञान कला वाणिज्य महाविद्यालय खामगाव येथील इयत्ता अकरावी कला शाखेमध्ये शैक्षणिक सत्र २६- २७ करिता प्रवेशित अमृता पहुरकर हिचे २२सप्टेंबर रोजी पहूर जीरा येथे राहत्या घरी सर्पदंशाने अकस्मात निधन झाले. महाविद्यालयाच्या वतीने सदर विद्यार्थिनीला श्रद्धांजली अर्पण करण्यात आले श्रद्धांजलीपर संवेदना व्यक्त करताना प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर यांनी सांगितले की सदर विद्यार्थीनी हुशार, होतकरू व क्रीडा तसेच सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर होती. तिने विविध कार्यक्रमांमध्ये प्राविण्य संपादन केले होते.तसेच पहुरकर कुटुंबावर जो दुःखाचा डोंगर कोसळला त्यामधून सावरण्याची ईश्वर त्यांना शक्ती देवो असे मनोगत त्यांनी व्यक्त केले.

# आराधना संडे स्पेशल सेल; सहा तासांसाठी जवळपास निम्म्या किमतीत खरेदीची संधी

**अमरावती/ का.प्र.**

ग्राहकांच्या विशेष मागणीनुसार विदर्भातील प्रसिद्ध आणि विश्वासार्ह शोरूम 'आराधना' तर्फे उद्या, रविवार, २७ सप्टेंबर रोजी केवळ सहा तासांसाठी 'संडे स्पेशल सेल' चे आयोजन करण्यात आले आहे. या सेलमध्ये संपूर्ण कुटुंबासाठी विविध प्रकारचा नवीन स्टॉक जवळपास निम्म्या किमतीत उपलब्ध करून देण्यात आला आहे.

विदर्भातील ग्राहक दरवर्षी या सेलची आतुरतेने वाट पाहतात. हा विशेष सेल वर्षातून एकदाच रविवारी आयोजित केला जातो.हा सेल दुपारी १२ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे.आराधना संडे स्पेशल

आराधना
होलसेल शॉपिंग मॉल

सेलमध्ये फॅन्सी डिझायनर साड्या, जयपुरी वर्क साड्या, पैठणी सिल्क साड्या आणि अँटिक वर्क साड्या जवळपास निम्म्या किमतीत उपलब्ध आहेत. यामध्ये किरकोळ दोष असलेल्या वस्तूंचाही समावेश आहे. या वस्तू थेट कारखान्यातून ग्राहकांपर्यंत पोहोचवल्या जात असल्याने त्या कमी किमतीत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

गृहिणी आणि महाविद्यालयीन तरुणींसाठी ड्रेस मटेरियल, सलवार सूट, रेडीमेड पंजाबी सूट, लेडीज पँट सेट आणि कुर्ती सेट निम्म्याहून कमी किमतीत उपलब्ध आहेत. आयोजकांच्या माहितीनुसार, रेमंड, रीड अँड टेलर आणि विमल यांसारख्या भारतातील नामांकित ब्रँड्सचे डिझायनर शर्टिंग, लाइनिंग, फॅन्सी चेक्स, स्ट्राइप्स आणि कॅज्युअल वेअर शर्टिंगदेखील निम्म्याहून कमी किमतीत उपलब्ध आहे.

याशिवाय, रेडीमेड जीन्स, कार्गो, ट्राउझर्स, शर्ट्स, टी-शर्ट्स, फॉर्मल शर्ट्स तसेच लहान मुलांसाठी फॅन्सी कपड्यांची विस्तृत श्रेणीही निम्म्याहून कमी किमतीत उपलब्ध करून देण्यात आली आहे.आराधना संडे स्पेशल सेल केवळ रविवारी दुपारी १२ ते सायंकाळी ६ या सहा तासांच्या कालावधीतच सुरू राहणार आहे. ग्राहकांची होणारी गर्दी आणि गैरसोय टाळण्यासाठी तसेच सेलचा पुरेपूर लाभ घेण्यासाठी आराधनाचे संचालक हबलानी बंधूंनी ग्राहकांना लवकर येण्याचे आवाहन केले आहे.

## मंजूर विमा परताव्यालाही विलंबाचा फटका; संत्रा उत्पादक शेतकरी प्रतीक्षेत!

### ट्रिगर कालावधी संपून चार महिने उलटले,विमा परताव्याची प्रतीक्षा

**अमरावती/ का.प्र.**

जिल्ह्यातील संत्रा बागायतदारांना २०२३-२४ व २०२४-२५ च्या हंगामातील हवामान आधारित संत्रा आंबिया बहार फळपीक विमा परतावा जमा करण्यात विलंब झाल्याच्या तक्रारी शासन दरबारी जमा आहेत.यंदा २०२५-२६ चा विमा परतावा मंजूर असतानाही अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केला नाही.२०२५-२६ वर्षामध्ये नोव्हेंबर महिन्यात सोम्पो यूनिवर्सल इन्शुरन्स कंपनीचा फळ पीकविमा शेतकऱ्यांनी काढला होता.संत्रा आंबिया बहार फळपीक विम्याचे ट्रिगर मे महिन्यात संपलेले असूनही आजवर जवळपास चार महिने होत आहे.२०२३-२४ चा विमा हा २०२५ च्या जानेवारीत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केला.

तसेच २०२४-२५ चा विमा हा नोव्हेंबरमध्ये जमा झाला.यंदा अल्प प्रमाणात आंबिया बहार असल्याने अनेक संकटाचा सामना शेतकरी करीत आहे.अमरावती जिल्ह्यातील एकूण ४८२२ संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी ४८४५ हेक्टर क्षेत्रासाठी अंदाजित ४ कोटी ११ लाख रुपये शेतकरी पिकविमा हिस्सा भरला.लागोपाठ दोन वर्षे



विमा परतावा खूप उशिरा मिळाल्यामुळे शेतकऱ्यांत नाराजीचा सूर आहे.राज्य व केंद्र सरकारने दखल घेऊन पिकविमा परतावा रक्कम जमा करावी जेणेकरून तो पुढील हंगामाचा नवीन विमा काढू शकेल.

**ट्रिगर कालावधी आणि विमा परतावा विलंब**

जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी वर्ष २०२५-२६ करिता १ डिसेंबर ते ३१ मे या कालावधीमध्ये नैसर्गिकरित्या होणारे नुकसान भरपाई मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी ८५००रु. प्रति हेक्टरी आणि गारपीट विमा २८०५ रु.याप्रमाणे एकूण रु.११३०५ प्रीमियम रक्कम सोम्पो युनिव्हर्सल इन्शुरन्स कंपनीकडे स्थानिक बँकांच्या माध्यमातून विमा सुरक्षा कवच नोंदविले होते.विमा हफ्ता रक्कम जमा करून व ट्रिगर कालावधी समाप्त होऊन चार महिन्यांचा वेळ उलटूनही विमा परतावा मिळण्यात विलंब होत असल्याने शेतकरी वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे.

येत्या ८-१० दिवसांत विमा धारकांच्या खात्यात परतावा जमा होईल.

**राहुल सातपुते,** जिल्हा कृषी अधीक्षक,अमरावती

ट्रिगर संपून चार महिने होत असून परतावा अद्याप जमा नाही,संत्रा उत्पादकांचा हा संघर्ष कधी संपणार?

**पुष्पक श्री.खापरे,**जिल्हा स्तरीय शेतकरी पिक विमा प्रतिनिधी

दरवर्षी शेतकऱ्यांना विमा परतावा उशिरा मिळतो.राज्य स्तरावरून यासंदर्भात नियोजन करण्यात यावे.

**अक्षय गुर्जर,** संत्रा उत्पादक,शिरसगाव कसबा

## विद्यार्थ्यांची पोलीस आयुक्तालयास शैक्षणिक भेट

**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर विधी विभागातील एल.एल.एम. प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी अमरावती शहर पोलीस आयुक्तालय येथे अभ्यास भेट दिली. या भेटी दरम्यान वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पोलीस उपायुक्त प्रांजली सोनवणे, एम.बी.घुगे यांनी प्रशासकीय कामकाजाची माहिती दिली. विधी अधिकारी अतुल विखार,पीयुष पाचकवडे,सारिका भोंगाडे यांनी विधी अधिका-यांचे कर्तव्य, सेवा, पोलिसांना मदत करणे, पी.आय.एल.आदी ज्वलंत मुद्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच पोलीस निरीक्षक सतिश पाटील, सहायक पोलीस निरीक्षक अनिकेत कासार यांनी सायबर




गुन्हे, डिजीटल अरेस्ट,सायबर फ्रॉड,चाईल्ड पोर्नोग्राफी याविषयी कायदेशीर बाबी समजावून सांगितल्या. ए.पी.आय. मेघाली गावंडे यांनी महिला तक्रार निवारण व समुपदेशनाबाबत माहिती दिली. विधी विभागप्रमुख डॉ.विजयकुमार चौबे, कार्यक्रम समन्वयक डॉ.कल्पना जावळे,मुरलीधर खोपडे यांच्या मार्गदर्शनात सदर उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या प्रसंगी विधी विभागाचे प्रा.राजकुमार कटकतलवारे, प्रा.तृप्ती रावत, प्रा.तेजस्विनी काळे, प्रा.हेमलता आत्राम, प्रा.अजय वानखडे, एल.एल.एम. चे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निराकरण करुन पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## गोंडविहीर तलाव येथे महाप्रसाद

**अचलपूर -** उत्साह आणि आनंदमय वातावरणामध्ये आगमन झालेल्या गणपती उत्सवानंतर आता आपल्या लाडक्या बाप्पांना निरोप देण्यासाठी मोठ्या श्रध्दाभावाने गणेश भक्त गोंडविहीर तलाव येथे उपस्थित होतात. भक्तांच्या सोयीसाठी यावर्षी डॉ. अश्लेष तिवारी द्विन सिटी हार्ट हॉस्पीटलच्या माध्यमातून दोन दिवसीय महाप्रसादाचे आयोजन २५ ते २६ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता पासून करण्यात येणार आहे.

या महाप्रसादाचा त्यांना लाभ व्हावा या हेतुने हा महाप्रसादाचा कार्यक्रम तिवारी फार्म हाऊसवर काळविट रोड गोंडविहीर येथे यंदाही आयोजित करण्यात आले.

## पोटे पाटील महाविद्यालयात प्रश्नमंजुषा



**अमरावती-**भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोगाच्या परिपत्रकानुसार पी. आर.पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायंसेस आयुर्वेद, अमरावती येथे ११ व्या आयुर्वेद दिना निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित देशमुख आणि शैक्षणिक प्रमुख डॉ. भार्गव टप्पे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.सदर स्पर्धेचे प्रभारी प्राध्यापक म्हणून डॉ. अनुपमा काळे, डॉ. पारुल नांदगावकर आणि डॉ.अंकिता कोरडे यांनी काम पाहिले. सदर प्रश्नमंजुषा स्पर्धा एलिमिनेशन राऊंड, रॅपिड फायर आणि बझर राऊंड अशा ३ फेऱ्यांमध्ये अत्यंत उत्साहात पार पडली. या स्पर्धेत प्रथम ते अंतिम वर्षातील सर्व व्यावसायिक वर्षांच्या एकूण १८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अग्निवेश संघाने प्रथम क्रमांक पटकावला यामध्ये कल्याणी वानखडे, इशिता डांगे आणि प्रेरणा रामटेके यांचा समावेश आहे.या कार्यक्रमासाठी सेक्रेटरी डॉ. मनोदय मोहोड आणि नोडल ऑफिसर डॉ. स्वाती धामणीकर तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात 'अन्न भेसळ ओळख, जागरूकता आणि प्रतिबंध' विषयावर एकदिवसीय कार्यशाळा

**अमरावती/ का.प्र.**

मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयातील गृहशास्त्राच्या रसायनशास्त्र विभागाच्या वतीने 'अन्न भेसळ ओळख जागरूकता आणि प्रतिबंध' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील डॉ. नीलिमा कळंबे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित पॉवर पॉइंट च्या माध्यमातून सादरीकरण करून अन्न भेसळाचे आरोग्यावर होणारे घातक परिणाम व त्यावरील प्रतिबंधात्मक उपायांवर सविस्तर माहिती दिली.डॉ. नीलिमा कळंबे आणि त्यांच्या ६ विद्यार्थ्यांच्या जम्मू मधील शरयू बाखडे, वेदिका



खाजोने, प्राशिका कांबळे, वेदांती मोंढे, खुशाली विलायतकर आणि सोनू प्रजापती यांनी दैनिक वापरातील पदार्थांमधील भेसळ ओळखण्याच्या सोप्या चाचण्यांचे प्रत्यक्ष सादरीकरण केले.

दूध-डिटर्जंट आणि पाण्याचा वापर ओळखणे,तूप - स्टार्च किंवा डालडा/वनस्पती तेलाची भेसळ तपासणे,हळद- कृत्रिम रंग आणि लेड क्रोमेटची तपासणीमिरी,(काळी मिरी)- पपईच्या सुकलेल्या बियांची भेसळ ओळखणे,लाल तिखट - विटांची पावडर आणि कृत्रिम रंगांची उपस्थिती तपासणे, इत्यादी कृतींचे सादरीकरण केले. या विद्यार्थिनींनी ही किट DBT STAR प्रकल्प अंतर्गत तयार केलेली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. ग्राहक जागरूकता ही घरापासूनच सुरू होते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी या चाचण्या शिकून आपल्या कुटुंबात व समाजात जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले.या कार्यक्रमास IQAC समन्वयक डॉ. डी. आर. बांबोळे, डॉ.एस.आर.कुबडे, डॉ.प्राची भांबुरकर, श्रेयस काळमेघ आणि डॉ.शीतल देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे नेटके संचालन आणि प्रास्ताविक कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. रुपाली एस. तळेगावकर यांनी केले. कार्यशाळेच्या शेवटी उपस्थितांच्या शंकांचे निरसन करण्यात आले व उपस्थितांचे आभार मानले.

## महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात व्यसनमुक्ती वर प्रबोधन पर व्याख्यान उत्साहात

**अमरावती/ का.प्र.**

अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित स्थानिक महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच नशा मुक्ती वर प्रबोधन पर व्याख्यान झाले. या प्रसंगी प्रमुख वक्ते अतुल रेळे शिक्षक,गाडगे महाराज आश्रम शाळा नागरवाडी हे तर अध्यक्ष स्थान प्राचार्य डॉ मीनल भोंडे यांनी भूषविले. अतुल रेळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना व्यसनाचा संबंध संस्कृतीशी असल्याचे स्पष्ट केले भारतीय लोक पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधानुकरण करण्याच्या नादात आपली संस्कृती विसरत चाललेले असून अधिकाधिक तरुण मौजमजा म्हणून मित्रांच्या संगतीत व्यसन करतात आणि पुढे व्यसनाची सवय त्यांना जडून आयुष्य उध्वस्त करते असे प्रतिपादन केले. गाडगेबाबांच्या जीवनातील अनेक दाखले देऊन आई-वडिलांच्या परिस्थितीची व परीश्रमाची खरी जाणीव असणारा युवक कधीच व्यसनाधीन होत नाही. यावेळी अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांनी जात व भाषेच्या पलीकडे जाऊन आपण जो मित्रत्वाचा भाव आपल्या सहकाऱ्यांशी जपतो तीच खरी व्यसनमुक्ती होय अशा शब्दात व्यसनमुक्तीचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे संचालन, प्रास्ताविक,पाहुण्याचा परिचय प्रा.डॉ.गजानन काळे, रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी तर उपस्थिताचे आभार महिला रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बबीता येवले यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन प्राध्यापक डॉक्टर गजानन काळे रासेयो कार्यक्रम अधिकारी व प्रा डॉ श्रीधर धाकुलकर, संचालक शारीरिक शिक्षण विभाग यांनी केले.कार्यक्रमाला मोठ्या संख्येने स्वयंसेवक विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# दुर्गम मेळघाटात धारणी पोलिसांची सतर्कता; गणेशोत्सव काळात चोख बंदोबस्त

**मेळघाट/ वार्ताहर**

मेळघाटातील दुर्गम आणि विस्तीर्ण भौगोलिक क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था राखणे हे पोलिस प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. धारणी पोलीस ठाण्याच्या अखत्यारित धुळघाट रेल्वे स्थानकापासून धारणी मुख्यालय सुमारे ६० किलोमीटर, धुळघाट रेल्वे स्थानकापासून कुटुंगा-रांगू व्हॅली परिसर सुमारे १०० किलोमीटर, तर मांगिया ते भोकरबर्डी परिसर सुमारे ५० किलोमीटरपर्यंतचा दुर्गम भाग येतो.

एवढा मोठा आणि दुर्गम भूभाग सांभाळताना पोलिसांना सतत सतर्क राहून कर्तव्य बजावावे लागते. सध्या संपूर्ण मेळघाटात गणपती बाप्पाच्या आगमनामुळे उत्साहाचे वातावरण आहे. गावागावात गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली असून दहा दिवसांचा गणेशोत्सव आता अंतिम टप्प्यात आला आहे.आगामी एक-दोन दिवसांत विविध गावांमध्ये गणेश विसर्जन होणार असल्याने हा काळ पोलिस प्रशासनासाठी महत्त्वाचा आहे.

धारणी पोलीस ठाण्याच्या अखत्यारितील एवढा मोठा आणि दुर्गम परिसर उपलब्ध मनुष्यबळाच्या मदतीने सांभाळणे हे निश्चितच आव्हानात्मक काम आहे. पोलिस प्रशासनाच्या मदतीसाठी गृह रक्षक दलाचे सुमारे ३० ते ३५ कर्मचारी देखील तत्परतेने कार्यरत आहेत. अमरावती जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक आदरणीय कदम साहेब, संबंधित डी.वाय.एस.पी.अधिकारी तसेच धारणीचे डी.वाय.एस.पी. आदरणीय गरुड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली धारणीचे कर्तव्यदक्ष ठाणेदार अवतारसिंग चव्हाण साहेब यांच्या नेतृत्वात पोलीस अधिकारी, सब-इन्स्पेक्टर, मेजर, पोलीस कॉन्स्टेबल तसेच गृह रक्षक दलाचे जवान संपूर्ण परिसरावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

दुर्गम गावांपर्यंतचे अंतर,भौगोलिक अडचणी आणि मर्यादित मनुष्यबळ या सर्व परिस्थितीतही गणेशोत्सव शांततेत पार पडावा यासाठी पोलिस प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे.

गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर विविध ठिकाणी सतर्कता ठेवण्यात आली असून कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज आहे.एवढ्या मोठ्या आणि दुर्गम परिसराची जबाबदारी उपलब्ध मनुष्यबळ तसेच गृह रक्षक दलाच्या सहकार्याने समर्थपणे सांभाळणे हे निश्चितच कौतुकास्पद आहे. धारणी पोलीस ठाण्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि गृह रक्षक दलाचे जवान आपले कर्तव्य अत्यंत सतर्कतेने बजावत आहेत

# दुष्काळाबाबत मदतीचा आदेश काढणार

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## अमरावती विभागात सर्व जिल्ह्यात दुष्काळाची झळ

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती विभागात सर्व जिल्ह्यात दुष्काळाची झळ पोहचली आहे. यामुळे पिके संकटात आली आहेत. शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून या भागाचा दौरा केला आहे. शेतकऱ्यांना तातडीने मदत व्हावी, यासाठी दुष्काळाच्या संहितेच्या ट्रिगर एक नुसार देण्यात येणाऱ्या मदतीचा आदेश उद्याच काढण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.




वाशिम येथील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी (दि.२४) विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिय येरेकर, वाशिमचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्यासमवेत अमरावती विमानतळ येथे चर्चा केली. त्यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांना दुष्काळाची मदत करण्यासाठी केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य शासनाकडून तातडीने मदत देण्यात येईल. तसेच केंद्राच्या मदतीसाठी आवश्यक असणारे पंचनामे आदी प्रक्रिया करून मदतीसाठी प्रस्ताव पाठवण्यात येईल. शेतकऱ्यांना मदतीचा आदेश तातडीने काढणे गरजेचे आहे. यातून काही भाग वगळला गेलेला असण्याची शक्यता असल्याने तिसऱ्या ट्रिगरमध्ये वगळलेल्या भागाचा समावेश करण्यात येईल. सर्वच भागात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ असल्याने (पान २ वर)

### ■ शेतकऱ्यांना मदत दिवाळीपूर्वी-

सर्वदूर पिकांची परिस्थिती सारखीच असल्यामुळे राज्य शासनाने मदतीचे धोरण आखले आहे. शेतकऱ्यांना करण्यात येणारी ही मदत दिवाळीपूर्वी मिळेल, याचे नियोजन केले जाईल.राज्य शासनाने कर्जमाफी केली असून कर्जाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे. कर्जमाफी मिळालेल्या शेतकऱ्यांना बँकांना नियमाप्रमाणे कर्ज द्यावेच लागेल. त्यासोबतच शेतमालाची शासकीय दराने खरेदी केली जाईल. यासाठी लवकरच नोंदणी सुरू केली जाईल. जिल्हा शासकीय रुग्णालयात लागलेल्या आगीचा अहवाल सार्वजनिक केला जाणार आहे. अहवालावरून राजकारण होऊ नये म्हणून हा अहवाल सार्वजनिक केला नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आ.संजय खोडके यांचा भातकुली तालुक्यात पाहणी दौरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मंत्री, खासदार, आमदार व लोकप्रतिनिधींनी नुकसानग्रस्त भागांचा दौरा करून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन वस्तुस्थितीची पाहणी करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले आहेत. या पार्श्वभूमीवर विधान परिषद आमदार संजय खोडके यांनी गुरुवारी दिनांक २४ सप्टेंबर रोजी भातकुली तालुक्यातील भातकुली, निंबा व कवठा बहाळे परिसरातील नुकसानग्रस्त सोयाबीन व कापूस पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली.



यावेळी आमदार सुलभा खोडके, कृषी विभागाचे संबंधित अधिकारी तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


अमरावती जिल्ह्यात पावसाअभावी दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, जिल्ह्यात सरासरीच्या तुलनेत सुमारे ५० टक्केच पाऊस झाल्याने खरीप हंगामातील विविध पिकांवर (पान २ वर)

## अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न

# आरोपीला ५ वर्षे सश्रम कारावास

### पोक्सो न्यायालयाचा निकाल

**अमरावती/प्रतिनिधीः-** अल्पवयीन मुलीला चॉकलेटचे आमिष दाखवून घरात बोलावून तिच्यावर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न केल्याच्या प्रकरणात न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत पाच वर्षे सश्रम कारावास आणि पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंडाची रक्कम न भरल्यास आरोपीला आणखी तीन महिने साधा कारावास भोगावा लागणार आहे. हा निकाल २४ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक २, अमरावती येथे सुनावण्यात आला. सुमित उर्फ बाप्या उर्फ विक्की उर्फ भद्दु सुरेंद्र सहारे (वय २२, रा. यशोदानगर क्रमांक १, अमरावती) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.



फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यानुसार, ११ नोव्हेंबर २०१६ रोजी दुपारी साडे बारा वाजताच्या सुमारास अल्पवयीन मुलगी आरोपीच्या घरासमोरील मैदानावर खेळत होती. त्यावेळी आरोपीने तिला चॉकलेटचे आमिष दाखवून आपल्या घरात बोलावले. तिच्यासोबत असलेल्या बालमित्रालाही त्याने घरात बोलावले. दोघे चेंडू खेळत असताना चेंडू बाहेर गेल्यानंतर आरोपीने बालमित्राला बाहेर पाठविले. त्यानंतर आरोपीने अल्पवयीन मुलीसोबत गैरवर्तन केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला होता. तसेच हा प्रकार कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले होते. घटनेनंतर (पान २ वर)

# गणेश विसर्जनासाठी अमरावतीत ३४२२ पोलिसांचा बंदोबस्त

### -संवेदनशील भागांत रुट मार्च, १४ सीआर मोबाइल व १० दामिनी पथके तैनात

**अमरावती/प्रतिनिधीः-** गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस आयुक्तालयाने कडेकोट बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. २५ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या कालावधीत होणाऱ्या गणेशमूर्ती विसर्जनासाठी शहरात तब्बल ३ हजार ४२२ पोलीस अधिकारी, कर्मचारी व होमगार्डचा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. मिरवणूक मार्ग, विसर्जनस्थळे, बाजारपेठा, गर्दीची ठिकाणे तसेच मिश्र व संवेदनशील वस्त्यांवर पोलिसांची विशेष नजर राहणार आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या



मार्गदर्शनाखाली विसर्जन मिरवणूक मार्ग आणि विसर्जनस्थळांची पाहणी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शहरातील संवेदनशील व मिश्रवस्तीच्या भागांसह प्रमुख बाजारपेठा आणि गर्दीच्या ठिकाणी पोलिसांकडून रुट मार्च घेण्यात आला.

**३ डीसीपी, ५ एसीपींसह मोठा फौजफाटा-** विसर्जन बंदोबस्तासाठी ३ पोलीस उपायुक्त, ५ सहायक पोलीस आयुक्त, २५ पोलीस निरीक्षक, ७० सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक आणि १ हजार ७५० पोलीस अंमलदार तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय आरसीपी व क्यूआरटी प्लाटून, एक एसआरपीएफ कंपनी व (पान २ वर)

# शेतीसाठी उजव्या कालव्याचे पाणी सोडा

## राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तिवसा तहसीलदारांना निवेदन



**तिवसा/प्रतिनिधीः-** अत्यल्प पावसामुळे यंदा शेतातील पिके संकटात सापडली आहे.तिवसा तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक आधार द्यावा व शेतीसाठी उजव्या कालव्याचे पाणी सोडा अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या(शरदचंद्र पवार गट) वतीने तिवसा तहसीलदार यांना एका निवेदनाद्वारे करण्यात आली.

यंदा खरीप हंगामात पावसाळ्यात अत्यल्प पाऊस आल्यामुळे शेतात उभी असणारी तूर,सोयाबीन, कपाशी, संत्रा, मोसंबी इत्यादी पिके हे पाण्या अभावी नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. कारण सदरच्या पिकांना आता पाण्याची तीव्र आवश्यकता आहे. त्यामुळे जर आता पाणी येणार नाही (पान २ वर)

# बेलोरा परिसरात दोन बिबट्यांचा वावर

### -शेतकरी आणि मजुरांमध्ये दहशत -वनविभागाने तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी

**बेलोरा/प्रतिनिधीः-** चांदूर बाजार पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या बेलोरा येथील रस्ता, वाठोंडा जंगल आणि नदी परिसर या तिन्ही जंगलाच्या भागात गेल्या १५ दिवसांपासून दोन बिबट्यांचा सतत वावर पाहायला मिळत आहे. शेतात काम करणारे मजूर आणि शेतकऱ्यांना या बिबट्यांचे वारंवार दर्शन होत असल्यामुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

या दोन्ही बिबट्यांनी आतापर्यंत कोणत्याही माणसावर हल्ला केलेला नाही. शेतात माणूस दिसताच ते बिबटे पळून जातात, मात्र रोजच्या या दर्शनामुळे मजुरांनी शेतात कामावर जाण्यास नकार दिला आहे. त्यामुळे शेतीची कामे ठप्प पडण्याची (पान २ वर)

# क्रीडा विभागाच्या योजनांचा लाभ घ्या - उपजिल्हाधिकारी दुर्गा देवरे

## -श्री बजरंग गणेशोत्सव मंडळात 'लोकसंवाद'



**अमरावती/प्रतिनिधीः---** घरातच क्रीडा विषयक वातावरण व त्यातून सुरु झालेला प्रवास, पुढे विविध स्पर्धांमधील यश ते उपजिल्हाधिकारी पदाची जबाबदारी असा प्रेरणादायी प्रवास उलगडतांना उपजिल्हाधिकारी दुर्गा देवरे यांनी क्रीडा क्षेत्रात कार्यरत सर्व घटकांनी क्रीडा विभागाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन येथील पटवीपुरा स्थित श्री बजरंग गणेशोत्सव मंडळात आयोजित लोकसंवाद कार्यक्रमात केले.

खेलो (पान २ वर)

## मानेवर चाकू मारून युवती जखमी, आरोपी फरार

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** तू माझ्यासोबत का बोलत नाही या कारणावरून अभिषेक बाविस्थळे या युवकाचा एका १९ वर्षीय युवती सोबत वाद झाला. या वादात अभिषेक बाविस्थळे याने एका लहान चाकूने युवतीच्या गळ्यावर वार मारून तिला जखमी केले. घटनेनंतर युवक फरार झाला. हि घटना आज (दि.२४) दुपारी नांदगाव खंडेश्वर येथील मुंगसाजी चौकामधील अभ्यासिकेजवळ घडली. जखमी युवतीवर ग्रामीण रुग्णालय नांदगाव खंडेश्वर येथे प्रथमोपचार करून अमरावती येथे पाठविण्यात आले. वृत्त लिहेपर्यंत गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू होती. घटनेची चौकशी ठाणेदार आनंद पिंटूरकर व त्यांचे सहकारी करीत आहे.



# गणेश विसर्जन मिरवणुकीत काळया पट्टया बांधून निषेध



### एकच वाद्य वाजविण्याच्या सूचनेवर पूर्णानगरातील गणेश मंडळांची नाराजी

**आसेगाव पूर्णा/प्रतिनिधीः-** पूर्णानगर येथील सार्वजनिक गणेश मंडळांनी विसर्जन मिरवणुकीत वाद्यांबाबत देण्यात आलेल्या सूचनांचा निषेध नोंदवित गुरुवारी तोंडाला काळ्या पट्ट्या बांधून व काळे कपडे परिधान करून शांततापूर्ण मिरवणूक काढली. प्रशासनाच्या (पान २ वर)

## मंगळवारचे 'रोजगार महाकुंभ' तूर्तास स्थगित

### निवडणूक आचारसंहितेमुळे निर्णय

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक २०२६ जाहीर झाली आहे. यामुळे संपूर्ण अमरावती विभागात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, कौशल्य विकास विभागामार्फत जिल्ह्यात मंगळवार, दि. २९ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेले 'रोजगार महाकुंभ २०२६' व त्याअंतर्गत होणारे सर्व रोजगार मेळावे तात्पुरते स्थगित करण्यात आले आहेत.

आचारसंहितेच्या नियमांमुळे हा कार्यक्रम तूर्तास पुढे ढकलण्यात आला आहे. येत्या काळात रोजगार मेळाव्याची नवीन तारीख योग्यवेळी स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व नोकरी इच्छुक उमेदवार, विविध व्यावसायिक उद्योजक, कंपन्या तसेच

# राजाराम जाधव यांच्या दोन साहित्यकृतींचा रविवारी प्रकाशन सोहळा

### -पत्र परिषदेत दिली माहिती



**अमरावती/प्रतिनिधीः-** जीवनातील खडतर प्रवासात विविध टप्प्यांवर भेटलेल्या आणि प्रेरणा देत दिशा दाखविणाऱ्या व्यक्तिमत्त्वांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याच्या भावनेतून शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर राजाराम जाधव यांनी (पान २ वर)

# नेरपिंगळाईच्या मानाच्या गणपतीची भावपूर्ण विसर्जन मिरवणूक



### जल्लोष, भक्ती, लोटांगण, अन्नदान आणि सामाजिक सलोख्याचा अविस्मरणीय संगम

**लेहेगाव/प्रतिनिधीः-** वर्षभर ज्या क्षणाची भक्त आतुरतेने वाट पाहतात, तो गणरायाला निरोप देण्याचा क्षण आला आणि संपूर्ण नेरपिंगळाई भावनांनी दाटून आली. गुरु गंगाधर स्वामी मठाच्या मानाच्या गणपतीची विसर्जन मिरवणूक अत्यंत भक्तिमय, उत्साहपूर्ण आणि शांततेत पार पडली. 'गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या!' या जयघोषाने नेरपिंगळाईचा आसमंत दुमदुमला. बाप्पाला निरोप देताना अनेकांच्या डोळ्यांत अश्रू होते, तर मनात पुढच्या वर्षीच्या आगमनाची आस होती.

मानाच्या गणपतीच्या दर्शनासाठी महिला, तरुण, आबालवृद्धांसह हजारो भाविकांनी गर्दी केली होती. रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून भाविकांनी गणरायाचे दर्शन घेतले. गणरायाच्या निरोपाच्या या सोहळ्यात (पान २ वर)

## शहरात प्रतिबंधात्मक कलम ३७ (१) व (३) लागू

**अमरावती** : शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला असून सदर आदेश आज दि. २४ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्ती विरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे प्रभारी पोलीस आयुक्त यशवंत सोळंके यांनी सांगीतले.



# घरगुती गॅस सिलेंडरमधून ऑटोमध्ये बेकायदेशीर रिफिलिंग

## नांदगाव खंडेश्वर येथे स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** घरगुती वापरासाठी असलेल्या एलपीजी सिलेंडरमधून ऑटो रिक्षांमध्ये बेकायदेशीररीत्या गॅस रिफिलिंग करणाऱ्या पाच जणांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली. नांदगाव खंडेश्वर येथील बहिरम बाबा टेकडीजवळ, चांदूर रेल्वे रोडवर गुरुवारी २४ सप्टेंबर रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत चार ऑटो रिक्षांसह एकूण १२ लाख ३१ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना पोलिसांना याबाबत गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार तहसील कार्यालयातील अधिकारी फाल्गुन कास्ते व पंचांसह पथकाने बहिरम बाबा टेकडीजवळ छापा टाकला. यावेळी शेख जमीर शेख अल्लाउद्दीन (वय ३०) हा घरगुती वापराच्या एलपीजी सिलेंडरमधून इलेक्ट्रीक मोटारच्या सहाय्याने ऑटो रिक्षामध्ये गॅस रिफिलिंग करताना आढळून आल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याचप्रमाणे अल्तमश खान शब्बीर खान (वय २३), अब्दुल कय्युम शेख मेहबुब (वय ४२), रविंद्र गोवींदराव (पान २ वर)